



# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार ४ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# पाक-अफगाण-बांगलादेशातून २०२४ पर्यंत आलेले अल्पसंख्याक भारतात राहू शकतील

## CAA अंतर्गत केंद्राचा निर्णय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने बुधवारी अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तानमधील अल्पसंख्याकांना दिलासा दिला जे ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत भारतात आले होते. आता हे निर्वासित (हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन) पासपोर्टशिवाय भारतात राहू शकतील.नागरिकत्व सुधारणा कायद्याअंतर्गत (CAA) केंद्राने पासपोर्ट नियमांमध्ये बदल केले आहेत. गृह मंत्रालयाने एक आदेश जारी केला आहे की जरी या समुदायातील लोक वैध पासपोर्ट किंवा कागदपत्रांसह आले असले आणि त्यांची वैधता संपली असली तरीही त्यांना राहण्याची परवानगी दिली जाईल. यापूर्वी २०१४ पर्यंत आलेल्या लोकांना परवानगी होती.

केंद्र सरकारने ११ मार्च २०२४ रोजी देशभरात CAA लागू केला. या वर्षी मे महिन्यात पहिल्यांदाच CAA अंतर्गत १४ लोकांना भारतीय नागरिकत्व देण्यात आले.

**नेपाळ आणि भूतानच्या नागरिकांना व्हिसाची आवश्यकता नाही-** आजच्या आदेशात केंद्राने स्पष्ट केले की, नेपाळ आणि भूतानच्या नागरिकांना भारतात प्रवास करण्यासाठी किंवा राहण्यासाठी पासपोर्ट आणि व्हिसाची आवश्यकता राहणार नाही, जर ते सीमा मार्गाने भारतात प्रवेश करतील. ही व्यवस्था पूर्वीप्रमाणेच सुरू राहील.तथापि, जर नेपाळी किंवा भूतानचा नागरिक चीन, मकाउ, हाँगकाँग किंवा पाकिस्तानमधून भारतात आला तर त्याच्याकडे वैध पासपोर्ट असणे आवश्यक असेल.

भारतीय नागरिकांना नेपाळ किंवा भूतान सीमेवरून भारतात ये-जा करण्यासाठी पासपोर्ट किंवा व्हिसाची आवश्यकता नाही परंतु जर ते नेपाळ किंवा भूतान व्यतिरिक्त इतर कोणत्याही देशातून (चीन, मकाउ, हाँगकाँग आणि पाकिस्तान वगळता) भारतात परतले तर त्यांना वैध पासपोर्ट दाखवावा लागेल.भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलातील कर्मचा-यांच्या कुटुंबातील सदस्यांना भारतात कर्तव्यावर




येताना किंवा बाहेर पडताना पासपोर्ट किंवा व्हिसाची आवश्यकता नाही (जर सरकारी वाहतुकीने प्रवास करत असाल तर). ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी धार्मिक कारणास्तव छळ झाल्यानंतर पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांगलादेशमधून भारतात आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन समुदायाच्या लोकांना नागरिकत्व दिले जाउ शकते. या तीन देशांतील लोकच नागरिकत्वासाठी अर्ज करू शकतात. भारतीय नागरिकांवर होणारा परिणामः सीएएचा भारतीय नागरिकांशी काहीही संबंध नाही. भारतीयांना संविधानानुसार नागरिकत्वाचा अधिकार आहे. सीएए किंवा कोणताही कायदा तो हिरावून घेउ शकत नाही.

**अर्ज कसा करावा:** CAA अंतर्गत, नागरिकत्वासाठी अर्ज ऑनलाइन करावा लागतो. अर्जदाराला तो भारतात कधी आला हे सांगावे लागते. तुमच्याकडे पासपोर्ट किंवा इतर प्रवास कागदपत्रे नसली तरीही तुम्ही अर्ज करू शकता. या अंतर्गत, भारतात राहण्याचा कालावधी ५ वर्षांपेक्षा जास्त ठेवण्यात आला आहे. या कायद्याव्यतिरिक्त, नागरिकत्व मिळविण्यासाठी हा कालावधी ११ वर्षांपेक्षा जास्त आहे. नागरिकत्व सुधारणा विधेयक २०१६ (CAA) २०१६ मध्ये सादर करण्यात आले. हे विधेयक १९५५ च्या कायद्यात काही बदल करण्यासाठी होते. १२ ऑगस्ट २०१६ रोजी ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आले. समितीने ७ जानेवारी २०१९ रोजी आपला अहवाल सादर केला. नागरिकत्व सुधारणा विधेयक (CAB) ९ डिसेंबर २०१९ रोजी गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत सादर केले. ११ डिसेंबर २०१९ रोजी राज्यसभेत त्याच्या बाजूने १२५ आणि विरोधात ९९ मते पडली. १२ डिसेंबर २०१९ रोजी त्याला राष्ट्रपतींची संमती मिळाली.

## 17 वर्षांनंतर अरूण गवळीची कारागृहातून सुटका

**नागपूर :** दहशतवादातून राजकारणाकडे वळण घेणारा कुख्यात गँगस्टर अरुण गवळी १७ वर्षांनंतर नागपूर सेंट्रल कॅरागृहातून बाहेर आला. २८ ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयाने त्याला बेल मंजूर केली. नागपूर कारागृह प्रशासनाने आवश्यक कायदेशीर औपचारिकता पूर्ण



केल्यानंतर, गवळी दुपारी सुमारे १२.३० वाजता बाहेर आले. नागपूर पोलिसांच्या सुरक्षेत गवळी नागपूर विमानतळावर पोहचला तेथून तो मुंबईसाठी रवाना झाला.सन २०१२ मध्ये, विशेष एमसीओसीए न्यायालयाने गवळीला शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसंडेकर यांच्या हत्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा ठोठावली; त्यासह १७ लाख रुपये दंडही आकारण्यात आला होता.गवळीला २००७ मध्ये शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसंडेकर यांच्या हत्या प्रकरणात गवळीला आजीवन कारावासाची शिक्षा झाली होती. २८ ऑगस्टला न्यायाधीश एम एम सुंदरेश आणि न्यायाधीश एन कोटिश्वर सिंह यांनी गवळीला जामीन मंजूर केला. एप्रिल २०२४ मध्ये, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २००६ मधील राज्य पुनर्मुक्ती धोरणाच्या आधारे गवळीला मुदतपूर्व सुटका मिळावी, असे आदेश दिले, कारण ते ६५ वर्षांचे आहे आणि त्यांनी १४ वर्षांचा तुरुंगवास पूर्ण केला असल्याने ते पात्र होते. मात्र जूनझ्रजुलै २०२४ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय स्थगित करत, पुढील सुनावणीसाठी विषय पुढे ढकलला.

## ओबीसी उपसमितीच्या अध्यक्षपदी बावनकुळे

**मुंबई :**मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा शासन आदेश मंगळवारी जारी करण्यात आला. यानंतर




आज (दि. ३) राज्-य मंत्रिमंडळ बैठकीत ओबीसी समाजासाठीही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. ओबीसींच्या प्रश्नाबाबत एका उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. ओबीसींच्या प्रश्नाबाबत उपसमितीमध्ये सहा मंत्री असतील. ही उपसमिती ओबीसी समाजाच्या प्रश्-नांसंदर्भात ही उपाययोजना सुचवण्याचे काम करणार आहे. ओबीसींच्या प्रश्नाबाबत एका उपसमितीची स्थापना करण-या निर्णय आज राज्-य मंत्रिमंडळ बैठकीत घेण-यात आला.ओबीसींसाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ उपसमितीच-या अध्यक्षपदी चंद्रशेखर बावनकुळे असतील. तर छगन भुजबळ, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, अतुल सावे, दत्तात्रय भरणे असे सदस्य असतील, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. ओबीसींसाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ उपसमितीमध्-ये भाजपचे ४, शिवसेनेचे २, राष्ट्रवादीचे २ सदस्-य अहेत. ही उपसमिती ओबीसींच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीबाबत कार्यक्रम, योजनांबाबत ही समिती कामकाज करणार आहे.

## मराठा आंदोलनाप्रकरणी नऊ गुन्हे दाखल

**मुंबई** : गेल्या तीन दिवसांमध्ये मराठा आरक्षणासाठी करण्यात आलेल्या आंदोलनामुळे निर्माण झालेला अडथळा आणि रस्ता रोकोसह सार्वजनिक सुव्यवस्थेत बाधा आणल्याच्या आरोपावरून मुंबई पोलिसांनी तब्बल नउ गुन्हे दाखल केले आहेत. हे सर्व गुन्हे सोमवारी नोंदवण्यात आले असून, अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे गुन्हे बेकायदेशीर जमाव जमवणे आणि रस्ता रोको यासारख्या कलमांखाली नोंदवण्यात आले आहेत. काही ठिकाणी आंदोलनकर्त्यांनी जबरदस्तीने क्रिकेट क्लब ऑफ इंडिया परिसरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याचेही अधिका-याने सांगितले. या संदर्भात आझाद मैदान पोलीस ठाण्यात तीन, मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात दोन, तर एमआरए मार्ग, जे.जे. मार्ग, डोंगरी आणि कुलाबा येथील पोलीस ठाण्यांत प्रत्येकी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, हे सर्व गुन्हे सोमवारी नोंदवले असून, यात सहभागी सर्वांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र संबंधित कलमांमध्ये सात वर्षांपेक्षा कमी शिक्षा असल्याने अद्याप अटक करण्यात आलेली नाही, असे अधिका-यांनी सांगितले.

## मुंबई-नाशिक महामार्गावर भीषण अपघात; तिघांचा मृत्यू

**मुंबई :** मुंबई नाशिक महामार्गावर एका कारचा भीषण अपघात झालाय. यामध्ये तीन जणांचा मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी आहेत. अपघात इतका भंयकर होता की दोघांचा जागीच मृत्यू झाला, एका जणांने उपचाराला घेउन जाताना जीव सोडला.




दोन जणांवर जवळच्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती नाजूक असल्याची माहिती समोर येतोय. शहापूरमधील कसारा येथे काल रात्री हा अपघात झाला. मुंबईहून कारने निघाले होते, त्यावेळी हा भयंकर अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई नाशिक महामार्गावर कार चालकाचं नियंत्रण सुटल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला तर दोन गंभीर जखमी झाले आहेत. मंगळवारी रात्री मुंबईहून नाशिकच्या दिशेने जात असताना कारवर काळाने घाला घातला. शहापूर तालुक्यातील कसारा येथील ऑरेंज ह?टेलच्या समोर कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले होते. जखमी पैकी एकाचा रूग्णालयात घेउन जात असताना मृत्यू झाला. कसारा येथे अपघात झाल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. अपघातामुळे मुंबई-नाशिक महामार्गावर भयंकर वाहतूक कोंडी झाली होती. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहन बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. जखमींना तातडीने रूग्णलयात दाखल करण्यात आले. मृतदेह खर्डी येथील ग्रामीण रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आले आहेत. दोन जखमींवर सध्या जवळच्या सरकारी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी या अपघाताची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## 2500 रूपयांच्या आतील चप्पल, बुटांवर 5 टक्के कर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**संपूर्ण देशाचे आज आणि उद्या होत असलेल्या जीएसटी परिषदेकडे लक्ष लागले आहे. महागाईने होरपळलेल्या जनतेला जीएसटी कमी झाल्याने मोठा दिलासा मिळणार आहे. अशातच जीएसटी परिषदेबाबत महत्वाची बातमी येत आहे. जीएसटी कौन्सिलने २५०० रुपयांपर्यंतच्या पादत्राणे आणि कपड्यांवरील जीएसटी दर कमी करून ५ टक्के करण्यास मंजुरी दिली असल्याचे सांगितले जात आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ५६ व्या जीएसटी कौन्सिलने ५ टक्के स्लॅबमधील पादत्राणे आणि कपड्यांसाठीची मर्यादा १,००० रुपयांवरून २,५०० रुपये प्रति नग करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या अध्यक्षतेखाली आणि राज्यांच्या



अर्थमंत्र्यांच्या उपस्थितीत ही परिषद होत आहे. सध्या, १,००० रुपयांपर्यंतच्या पादत्राणे आणि कपड्यांवर ५ टक्के कर आकारला जातो. या मर्यादेपलीकडे, १२ टक्के वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) आकारला जातो. आता ५ टक्के हा कर स्लॅब २५०० पर्यंतच्या चप्पल आणि कपड्यांवर आकारला जाणार आहे. यामुळे शापिंग करणा-यांसह ही उत्पादने बनविणा-या कंपन्यांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. जीएसटी कौन्सिलने बुधवारी १२ आणि २८ टक्के स्लॅब रद्द करण्याचा आणि या स्लॅबमधून बहुतेक वस्तू अनुक्रमे ५ आणि १८ टक्के स्लॅबमध्यो हलवण्याचा निर्णय घेतला आहे.

## रोटी, पिझ्झा GST फ्री; आरोग्य-जीवन विम्यावर कर नाही

**नवी दिल्ली-** जीएसटी कौन्सिलच्या ५६ व्या बैठकीत १२ऽ आणि २८% कर स्लॅब काढून टाकण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे. ही माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी पत्रकार परिषदेत दिली.त्या म्हणाल्या की, सध्याची रचना सोपी करण्यासाठी, नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून म्हणजेच २२ सप्टेंबरपासून फक्त ५% आणि १८% हे दोन स्लॅब लागू केले जातील. यामुळे सुमारे १७५ वस्तू स्वस्त होतील. आरोग्य आणि जीवन विम्यावरील जीएसटी देखील रद्द करण्यात आला आहे.निर्मला सीतारमण म्हणाल्या की, दूध, रोटी, पिझ्झा ब्रेड, चेन्ना यासह अनेक अन्नपदार्थ जीएसटीमुक्त असतील. याशिवाय, सिमेंटवरील कर २८% वरून १८% पर्यंत कमी करण्यात आला आहे.याशिवाय, लक्झरी वस्तू आणि तंबाखू उत्पादनांवर ४०ऽ जीएसटी लावण्यात येईल. ही बैठक दोन दिवसांसाठी (३-४ सप्टेंबर) होणार होती, जी एकाच दिवसात संपली आहे.

कपडे आणि शूज स्वस्त होतीलः सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २५०० रुपयांपर्यंतच्या शूज आणि कपड्यांवरील जीएसटी दर ५% पर्यंत कमी केला जाउ शकतो, ज्यामुळे ग्राहकांसाठी या वस्तू स्वस्त होतील.एमएसएमई आणि स्टार्टअप्ससाठी जलद नोंदणी : सूक्ष्म, लघु आणि (पान २ वर)

## मराठा आंदोलन संपताच राज ठाकरे वर्षा बंगल्यावर

■ घेतले गणपतीचे दर्शन ■ मुख्यमंत्र्यांकडून स्वागत

**मुंबई/प्रतिनिधी :** काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरेंच्या निवासस्थानी गणपतीचे दर्शन घेतले होते. यानंतर मराठा आंदोलनामुळे मुंबईतील वातावरण तापलेले होते. यावेळी राज यांनी गेल्यावेळच्या आरक्षणाचे काय झाले ते शिंदेंना विचारा असा रोकडा सवाल केला होता. आता मराठा आंदोलन संपल्यानंतर राज ठाकरे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी दाखल झाले आणि गणपतीचे दर्शन घेतले आहे.



गेल्या काही महिन्यांपासून राज ठाकरे आणि शिवसेनेचे उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चा आहेत. मुंबई महापालिका निवडणूक डोळ्यासमोर आहे. अशातच शिंदे-फडणवीस यांच्या राज ठाकरेंसोबत भेटीगाठी वाढू लागल्याने पुन्हा चर्चांना उधाण आले आहे. लोकसभेला राज ठाकरे यांनी थेट भाजपला पाठिंबा दर्शविला होता, तसेच उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या बालेकिल्ल्यांत सभाही लावल्या होत्या. आता हेच राज ठाकरे महापालिका निवडणुकांसाठी उद्धव ठाकरेंसोबत जात आहेत. यातच या ना त्या (पान २ वर)

## माझ्या लेकराला पुन्हा उपोषण करायला लावू नका

*जरांगेंच्या मातोश्रींना अश्रु अनावर*


**मुंबई /प्रतिनिधी-** मनोज जरांगे पाटील यांना आता उपोषण करायला लावू नका. त्यांनी लय उपोषणं केली आहेत,



आता अवसान राहिले नाही. मनोज जरांगे पाटील यांनी मराठवाडा अन् महाराष्ट्रातील सर्वांना आरक्षण मिळवून दिले. माझ्या लेकराला पुन्हा उपोषणाला बसण्याची वेळ सरकारने आणू नये. माझ्या लेकाने २५ वर्षे आंदोलन केले. उपोषण केले. सरकारने आरक्षण द्यावे, असे मनोज जरांगे पाटील यांच्या मातोश्री म्हणाल्या. मनोज जरांगे पाटील यांच्या मातोश्री आरक्षणाच्या मागण्या सरकारने मान्य केल्यानंतर भावूक झाल्या होत्या. मनोज जरांगे पाटील यांच्या मातोश्रीला कुटुंबीयांनी भरवले पेढे मातोश्रीच्या डोळ्यांत अश्रू अनावर झाले. मराठा आरक्षण प्रश्न मनोज जरांगे पाटलांनी आझाद मैदानावरती उपोषण केले. (पान २ वर)

## जिओ एक महिन्याचा रिचार्ज फ्री देणार

**मुंबई :** रिलायन्स जिओने भारतात टेलिकॉम सेवा सुरु करून ९ वर्षे पूर्ण झाली आहेत. या कंपनीने पहिल्यांदा फोरजी लाँच करत आधीपासून दादागिरी करत असलेल्या सर्व कंपन्यांच्या तोंडचे पाणी पळविले होते. आता रिलायन्स जिओ या क्षेत्रातील दादा झाली असून रिचार्ज प्लॅन वाढवत चालली आहे. अशातच जिओ कंपनीने




९ वर्षे पूर्ण केल्यानिमित्ताने तसेच ५० कोटी ग्राहकांचा टप्पा पार केल्याच्या निमित्ताने सेलिब्रेशन सुरु केले आहे. या अंतर्गत जिओ आपल्या युजरना कोणताही प्लॅन असला तरी ३ दिवसांचा अनलिमिटेड डेटा देणार आहे. तसेच ज्या ग्राहकांकडे ४ जी फोन आहे त्यांनाही ३९ रुपयांच्या रिचार्जमध्ये अनलिमिटेड डेटा देणार आहे. ५ सप्टेंबर ते ७ सप्टेंबर या विकेंडला जिओ तीन दिवस अनलिमिटेड फाईव्ह जी इंटरनेट देणार आहे. ज्या ग्राहकांनी ४जी रिचार्ज केले आहे व ज्यांच्याकडे ५जी फोन आहे त्यांना हा लाभ मिळणार आहे. एवढेच नाही तर (पान २ वर)



# उद्योगांसाठी कर्ज योजनेचे अर्ज तातडीने निकाली काढा -जिल्हाधिकारी येरेकर



**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्र आणि राज्य शासनाकडून उद्योगांना चालना देण्यासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहे. यासाठी उद्योजकांनी केलेल्या अर्जावर शाखा स्तरावर कार्यवाही झाल्यानंतर तातडीने कर्ज मंजुर करावेत, तसेच कर्जाची रक्कम उद्योजकांनी उचल करावी, यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी आज (दि.३) अमरावती येथील भारतीय स्टेट बँकेच्या एमएसएमई शाखेला भेट देऊन कर्ज प्रकरण मंजुरीच्या प्रक्रियेची माहिती घेतली. यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निलेश निकम, शाखा व्यवस्थापक ललीत त्रिपाठी, रवीकुमार दालू आदी उपस्थित होते.

एमएसएमई शाखेतून पीएमईजीपी, सीएमईजीपी, कृषी, खादी ग्रामोद्योग आदी योजनांचे कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात येतात. कर्ज मागणी आलेल्या प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करावी. कर्ज प्रकरणांच्या प्रस्तावांची शाखा स्तरावर छाननी करावी करावी. केवळ मंजुरीसाठी बँकांनी प्रस्ताव एमएसएमई शाखेकडे पाठवावे. प्रामुख्याने एसबीआयकडे प्रलंबित प्रकरणांची संख्या अधिक असल्यामुळे अधिकचे मनुष्यबळ घेऊन प्रस्ताव मार्गी लावावेत. अर्ज निपटारा करण्यासाठी डिसेंबरची अंतिम मुदत ठेवून कार्यवाही करावी. बँकांनी कर्ज मंजुरीनंतर हे कर्ज उचल करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी उद्योगांना प्रोत्साहित करावे.

विविध योजनांमधून कर्ज देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून प्रोत्साहन देण्यात येत आहे. यात ३५ टक्क्यांपर्यंत सबसिडी देण्यात येत आहे. शासनाच्या योजनेतून कर्ज दिल्यामुळे एकप्रकारे हे कर्जाची हमी शासनाने घेतली आहे. त्यामुळे बँकांनीही कर्ज मंजुरीकरीता पुढे यावे. उद्योजक कर्जाची उचल करू शकतील, अशा कर्जांची प्रकरणे तातडीने मार्गी लावावीत. यामुळे उद्योग सुरू होण्यास मदत मिळेल, असेही जिल्हाधिकारी येरेकर यांनी सांगितले.

# बच्चू कडू यांच्या प्रयत्नांना यश; विभागीय PSI परीक्षा पुन्हा सुरू

## पोलीस शिपाई ते अधिकारी होण्याचा मार्ग मोकळा

**चांदूर बाजार/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्यातील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (PSI) या पदावरील कर्मचाऱ्यांना गतीमान पदोन्नतीची सुवर्णसंधी मिळवून देणारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा (LDCE) पुन्हा सुरू करण्यात आली आहे. यामुळे हजारो पोलीस विद्यार्थ्यांसाठी अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण करण्याचा मार्ग खुला झाला आहे. यापूर्वी शासनाने २५ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या निर्णयान्वये ही परीक्षा रद्द करून पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील भरतीचे प्रमाण ५०:२५:२५ (सरळसेवा: LDC: पदोन्नती) ऐवजी ५०:५० (सरळसेवा: पदोन्नती) असे बदलले होते. त्यामुळे सामान्य पोलीस विद्यार्थ्यांमध्ये मोठी नाराजी होती.

दरम्यान, अप्पर पोलीस महासंचालक (आस्थापना) व पोलीस महासंचालक यांच्या शिफारशीवरून शासनाने पुन्हा एकदा या निर्णयाचा पुनर्विचार केला. आणि आज अधिकृतरीत्या LDCE पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेऊन ५०:२५:२५ या जुन्या पद्धतीला मान्यता दिली आहे.

**बच्चू कडू यांचा निर्णायक पाठपुरावा-** या निर्णयामागे माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा महत्त्वाचा ठरला आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम, उद्धव ढवळे , महेश बडे आणि महाराष्ट्र कोअर कमिटीचे सर्व सदस्य यांनीही या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली.पोलीस विद्यार्थ्यांनी सांगितले की, 'बच्चू कडू व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून वारंवार पाठपुरावा करत राहिले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांशिवाय हा GR बदल घडणे अशक्य होते. आज त्यांच्या मुळे आमच्यासारख्या सामान्य पोलीस शिपायाला अधिकारी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.'

**पोलीस विद्यार्थ्यांचा आनंदोत्सव-** या निर्णयामुळे हजारो पोलीस विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. अनेक वर्षांपासून थांबलेली पदोन्नतीची संधी आता पुन्हा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उधाण आले आहे. बच्चू कडू यांचे परिश्रम, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचे सहकार्य आणि महाराष्ट्र कोअर कमिटीच्या एकजुटीमुळे LDCE पुन्हा सुरू झाली आहे. आजपासून पोलीस शिपाई ते PSI पदाचा मार्ग पुन्हा खुला झाला असून, हजारो विद्यार्थ्यांचे 'अधिकारी होण्याचे स्वप्न' पूर्ण होण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मोना सिंह ठाकूर हे एमआयडीसी परिसरातच राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पुढील तपास सुरू आहे.

### तनिष्क फ्रेंचायझीच्या नावाखाली

पोलिसांनी मध्यप्रदेशातील आगर मालवा जिल्ह्यातून अटक केली आहे. आरोपीचे नाव रामकिसन कनिराम सोळंकी (वय ३२, रा. चिखली सौध्या, शाजापूर, मध्यप्रदेश) असे आहे.

तक्रारदार प्रदीप शामराव कराळे (वय ६३) यांना तनिष्क कंपनीची फ्रेंचायझी मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. यासाठी आरोपीने विविध बँक खात्यांतून १ लाख ९९ हजार ९९९ रुपये मागवले. कराळेंनी ती रक्कम दिली; परंतु अनेक दिवस उलटूनही फ्रेंचायझी न मिळाल्याने संशय निर्माण झाला. संपर्क केल्यावर आरोपी टाळाटाळ करू लागला. शेवटी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच कराळे यांनी परतवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तांत्रिक तपासानंतर आरोपीची ओळख पटली. पोलिसांच्या पथकाने आगर मालवा जिल्ह्यातील बडोद येथे जाऊन रामकिसन सोळंकी याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून बँक पासबुक व धनादेश पुस्तिका जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय अधिकारी माधवराव गरुड व थानेदार सुरेश म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचारी दर्शन दिकोंडवार, अजीत राठोड, रोशन लाकडे, विनोद सुर्यवंशी यांनी केली.

## रोटी, पिझ्झा GST फ्री;

मध्यम उद्योग (एमएसएमई) आणि स्टार्टअप्ससाठी जीएसटी नोंदणीसाठी लागणारा वेळ ३० दिवसांवरून फक्त ३ दिवसांपर्यंत कमी करण्यात आला आहे.निर्यातदारांना स्वयंचलित परतावा : निर्यातदारांना आता स्वयंचलितपणे जीएसटी परतावा मिळेल. हा प्रस्ताव देखील मंजूर झाला आहे, ज्यामुळे त्यांचे काम सोपे होईल.आरोग्य विमा आणि जीवनरक्षक औषधे स्वस्त होतील : मनी कंट्रोलच्या अहवालानुसार, जीएसटी कौन्सिलने विमा प्रीमियम दर कमी करण्यास सहमती दर्शविली आहे, ज्यामुळे आरोग्य विमा खरेदी करणे स्वस्त होईल. यासोबतच, जीवनरक्षक औषधांवरील जीएसटी दर देखील कमी होण्याची अपेक्षा आहे.स्वयंचलित रिटर्न फाइलिंगचा प्रस्तावः सीएनबीसीच्या मते, जीएसटी कौन्सिलने स्वयंचलित रिटर्न फाइलिंग सिस्टम सुरू करण्याचा प्रस्ताव देखील ठेवला आहे, ज्यामुळे जीएसटीशी संबंधित नियमांचे पालन करणे आणखी सोपे होईल.लक्झरी इलेक्ट्रिक वाहनांवरील कर वाढणार : मनीकंट्रोलच्या अहवालानुसार, २० लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या लक्झरी इलेक्ट्रिक वाहनांवरील जीएसटी दर ५ऽ वरून १८ऽ पर्यंत वाढू शकतो. जर हा प्रस्ताव मंजूर झाला तर टाटा मोटर्स, महिंद्रा, टेस्ला आणि मर्सिडीज-बेंझ सारख्या कंपन्यांसाठी ते आव्हान बनू शकते. मनीकंट्रोलच्या अहवालानुसार, अधिकृत सूत्रांनी सांगितले आहे की सुमारे १७५ वस्तूंवरील जीएसटी दरात कपात केली जाउ शकते. यामध्ये अन्न घटक, बदाम, स्नॅक्स, तयार पदार्थ, जाम, तूप, लोणी, लोणचे, जाम, चटणी, ऑटोमोबाईल्स, ट्रॅक्टर, इलेक्ट्?निक्स, एसी आणि रेफ्रिजरेटर इत्यादींचा समावेश आहे.सूत्रांचे म्हणणे आहे की जर जीएसटी परिषदेने मंत्र्यांच्या गटाचा (जीओएम) दर कपातीचा प्रस्ताव स्वीकारला तर सर्व वस्तूंवरील सरासरी जीएसटी दर १०ऽ च्या खाली येईल, जो सध्या सुमारे ११.५ऽ आहे.

## मराठा आंदोलन संपताच

कारणाने गाठीभेटी वाढल्याने राज ठाकरेंच्या एकत्र येण्यावर उलट सुलट चर्चा रंगू लागल्या आहेत.

उद्धव ठाकरे शिवसेना आणि मनसे यांच्यातील युतीची अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. परंतू, स्थानिक पातळीवर एकत्र काम करण्याचे आदेश आहेत. तसेच निवडणुकीची तयारीही करण्याचे आदेश आहेत. यामुळे स्थानिक पातळीवर या जुन्या सहका-यांनी एकमेकांसोबत मिळते-जुळते घेण्यात सुरुवात केली आहे. शालेय अभ्यासक्रमात हिंदी सक्तीवरून हे दोन्ही पक्ष एकत्र आले होते. राज आणि उद्धव ठाकरेंनी सभाही घेतली होती.

### जओ एक महिन्याचा

१२०० रुपयांमध्ये २ महिन्यांचे नवीन जिओहोम कनेक्शन दिले जाणार आहे. यामध्ये १०००अ टीव्ही चॅनेल, ३० एमबीपीएस अमर्यादित डेटा, १२अ ओटीटी ॲप्सचे सबस्क्रिप्शन (जिओह टस्टार अ इतर), ४के स्मार्ट सेट टाप ब?क्स आदी दिले जाणार आहे. एवढेच नाही तर ज्या ग्राहकांनी गेले १२ महिने सलग ३४९ रुपयांचे रिचार्ज केलेले आहे, त्यांना १३ वा महिना मोफत दिला जाणार आहे. म्हणजे पुढच्या महिन्यात या ग्राहकांना ३४९ चे ५जी अनलिमिटेड प्लॅनसाठी रिचार्ज करावे लागणार नाहीय.

### माझ्या लेकराला पुन्हा

या उपोषणाची देखील सरकारने त्यांना त्यांच्या मागण्या पूर्ण करत त्यांच्याकडे जीआर सुपूर्द केला. यानंतर बीड जिल्ह्यामध्ये मोठा जल्लोष साजरा करण्यात आला. मनोज जरांगे पाटील यांचे जन्मभूमी असलेल्या मातोरी येथे त्यांच्या मातोश्री त्याचबरोबर त्यांच्या कुटुंबातील नातेवाईकांनी जल्लोष साजरा करत सरकारने आता पहिल्यासारखा दगा फटका करू नये असे म्हटले आहे. आम्ही सरकारचे आभार मानतो तर जरांगे पाटलांच्या मातोश्रीच्या डोळ्यात अश्रू अनावर झाले. यावेळी त्यांना पेढेही भरवण्यात आले.

## १ व १० वरिल उर्वरित

### तिवस्यात मुलासह आईची चाकूने

तर सुशीला वसंतराव डाखोरे (वय ६५) दोघेही रा.अशोकनगर तिवसा असे हत्या करण्यात आलेल्या मृतक मायलेकांची नावे आहे.तर रोहन सुधाकर अवझाड(वय २१,रा.अशोक नगर,तिवसा) असे हत्या करणाऱ्या आरोपी युवकाचे नाव आहे.मृतक व आरोपी हे दोघेही शेजारी आहेत.

मृतक अमोल डाखोरे याने दीड वर्षांपूर्वी आरोपी रोहन अवझाड याचे वडिल सुधाकर अवझाड यांची क्षुल्लक कारणावरून हत्या केली होती. त्यानंतर मृतक अमोल हा हत्येप्रकरणी कारागृहात होता.अलीकडेच तो जामिनावर नुकताच घरी परतला होता.त्याच्या घरी महालक्ष्मी उत्सव देखील साजरा झाला.हा कार्यक्रम पार पडत नाही तोच वडिलांच्या हत्येचा सूड घेण्याच्या भावनेतून तयारीत असलेल्या आरोपी रोहन ने अमोलचे घर गाठले व जोरदार वाद घातला. सकाळी भरदिवसा ११ वाजता अमोल सोबत घरात सुरू असलेल्या या वादाचे रूपांतर मारामारीत झाले.दोघांची ही झटापट घराबाहेर गल्लीत पोहचली असता मुलाला वाचविण्यासाठी घरातून पळत सुटलेली आई मधात पडली व यात आरोपी रोहनने हातातल्या चाकुने अमोल च्या छातीवर व मानेवर सपासप वार करीत जीवानिशी ठार केले तर याच झटापटीत मुलाला वाचविण्यासाठी गेलेल्या मृतकाच्या आईवर सुद्धा आरोपीने चाकूने वार केल्याने तिचा सुद्धा यात मृत्यू झाला. या भांडण व मारामारीची परिसरात आरडाओरड सुरू झाली असता विहिरीवर पाण्यासाठी गेलेल्या मृतकाच्या पत्नीने व मुलांनी घराच्या दिशेने धाव घेताच त्यांना अमोल हा रक्तबंबाळ अवस्थेत जागीच ठार झालेला दिसला.तर मृतक अमोलची आई सुद्धा गंभीर जखमी अवस्थेत खताच्या गंजीवर पडून आढळली.तिला तातडीने एका युवकाने प्रसंगावधान राखत दुचाकीवर बसवून रुग्णालयात नेले असता तिला डॉक्टरांनी मृत घोषित केले.घटनेत मृतकाचा मुलगा देखील जखमी झाला.घटनेची माहिती तिवसा पोलिसांना मिळताच पोलिसांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला तर घाबरलेली मृतकाची पत्नी मंगला अमोल डाखोरे यांनी पोलीस ठाणे गाठून याबाबत फिर्याद नोंदविली. पोलिसांनी आरोपी रोहन अवझाड याच्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला.घटनेनंतर आरोपी हा स्वतःच पोलीस ठाण्यात पोहचला व घटनेची कबुली दिली. याप्रकरणी पुढील तपास तिवसा पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

पतीच्या हत्येनंतर पत्नी व मुलामुलींनी घटनास्थळी एकच टाहो फोडला होता.याप्रकरणी पत्नी मंगला अमोल डाखोरे यांनी तिवसा पोलिसांत दिलेल्या फिर्यादिवरून पोलिसांनी आरोपी रोहन सुधाकर अवझाड याच्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

तिवसा येथे भरदिवसा घडलेल्या दुहेरी हत्याकांडामुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली.घटनेचे गांभीर्य लक्षात घेताच जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत,चांदुर रेल्वेचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार यांनी तिवसा पोलीस स्टेशन व घटनास्थळी भेट देऊन माहिती जाणून घेतली.

### पत्नीने प्रियकराच्या मदतीने

आले. फिर्यादी अशोक सुरत्ने यांच्या तक्रारीवरून पथ्रोट पोलिसांनी गुन्हा क्र. २०२/२५ दाखल करून आरोपींना अटक केली. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे समजते. त्यांच्यावर भारतीय दंड संहिता व अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**जिल्हा हादरला!-** तिवसातील दुहेरी खून आणि पथ्रोटमधील कौटुंबिक हत्याकांडामुळे जिल्ह्यात दहशतीचे वातावरण आहे. एका दिवसात दोन ठिकाणी खूनाच्या घटना घडल्याने कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी सतर्कता वाढवून पुढील तपास सुरू केला आहे.

### पाच देशी कट्टे, रिव्हॉल्वसह

ओटू (रा. नूर नगर) हा नवसारी ते लालखडी रिंगरोड परिसरात देशी कट्टे विक्रीसाठी उभा आहे. त्यानंतर पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने छापा टाकला. पोलिस पाहताच दोन्ही इसम पळण्याचा प्रयत्न करीत होते, पण पथकाने त्यांना पकडले. त्यांच्याकडून ४ देशी कट्टे (पिस्तूल),१ देशी रिव्हॉल्वर, ८ जिवंत काडतुसे असा एकूण १ लाख ५८ हजार किमतीचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी नागपुरीगेट पोलीस स्टेशनमध्ये आर्म्स अॅक्टच्या कलमानुसार आणि मपोका कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करून तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे व रमेश धुमाळ, तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस अधिकारी व कर्मचारी मिळून ३० हून अधिक जणांच्या पथकाने ही मोहीम राबवली. या कारवाईमुळे शहरातील अवैध शस्त्रविक्री करणाऱ्या टोळ्यांना मोठा धक्का बसला आहे.

### अचलपुरात १४१ वर्षांपासून सुरु

१४१ वर्षापासून अचलपूर शहरातील श्री भक्त बिहारी संस्थान येथून प्रसिध्द अमिनाथ संस्थान पर्यंत स्व. रतनकुमारजी मदनगोपालजी चौधरी यांच्या कुटुंबीयाकडून भव्य - दिव्य पारंपरिक फुलडोल महोत्सव शोभायत्रेचे आयोजन केले जाते.आज ३ सप्टेंबर रोजी भाद्रपद एकादशिला फुलडोल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. प्रसिध्द श्रीभक्त बिहारी संस्थान येथील राधा - कृष्ण देवाची फुलाने सजविलेल्या पालखीतून अमिनाथ संस्थान येथील नदी मध्ये जल विहार करून देव मंदिरात स्थापित केले. या फुलडोल साठी एक ते सव्वा टन झेंडू व विविध प्रकारची फुलाचा वापर केला जातो. विशेष म्हणजे देवडी येथील सत्यनारायण मंदिर येथून गोपाल झंवर कुटुंबियांकडून व जुना सराफा येथील शेंगर कुटुंबियांकडून फुलडोल चे आयोजन करण्यात आले . हे तिन्ही फुलडोल अचलपूर शहरातील बियाबानी चौकात एकत्र येतात . यावेळी भाविक - भक्तांना चहा ,पाणीचे वाटप करण्यात आले . प्रसिध्द शिव स्वर वाद्य पथक ,लेझिम पथक आकर्षणाचे केंद्र ठरले . यावेळी जागो - जागी नागरिक पालखीचे भव्य - दिव्य स्वागत करून पूजा ,दर्शन करतात .यावेळी अचलपूर नगर परिषद माजी नगराध्यक्ष विलास काशीकर, अनिल कुमार मदनगोपाल चौधरी ,संजय रतनकुमार चौधरी,शरद चौधरी, गोपाल झंवर, भाजपा शहाराध्यक्ष कुंदन यादव ,अनिल अग्रवाल,रवी अग्रवाल ,माजी नगरसेवक राजू शर्मा ,राजेश खोलापुरे , विनय चतुर,महेंद्र राठी ,गोविंद सिरोया,कचरू पटवारी, विष्णू पुरोहित ,बंटी ककरानिया, संजय धमेले ,माणिक देशपांडे ,हरिष पुरोहित ,सुनील झंवर, राष्ट्रिय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सर्वेश राठी ,राष्ट्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक संजय पोंदे, सागर गिरनाळे,आशूतोष मिश्रा,प्रमोद मिश्रा , संतोष नरेडी,डॉ.देवेंद्र अग्रवाल,पप्पू सिरोया ,श्रीकांत रावत ,शानु महाराज दीक्षित ,प्रमोद अग्रवाल , शंकर महाराज शर्मा ,गोपाल खोलापुरे,पवन बुंदेले, मुकेश अग्रवाल ,अरुण सुने,भूपेन पुरबगोला, मनोज भुजाडे, गिरधर चरपटे,पियूष कयाल, गोपाल महाराज जोशी , संतोष ठाकूर ,अमर सिरोया ,प्रदीप पुरोहित ,रोशन सिरोया, राम ठाकूर ,संदीप घीया , साकेत खंडेलवाल,जय श्रोती ,आशिष अग्रवाल, पूनित शर्मा, अंकूश जोशी, रुपेश मिश्रा,सचिन शर्मा,प्रीतम गोखले,पंकज गोखले,महावीर शर्मा, गौरव दीक्षित आदी पुरुष,महिला वर्ग ,तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते .

### केंद्र सरकारच्या आयात

आणखी कमी होऊन त्याचा फटका शेतकऱ्यांना बसणार आहे . ऑक्टोंबर मध्ये भारतीय शेतकऱ्यांचा कापूस बाजारात विक्रीला येण्यास सुरुवात होईल आणि नेमका याचवेळी मुक्त आयातीमुळे विदेशातील स्वस्त कापूस भारतीय बाजारात येऊन शेतकऱ्यांची मृत्यू घंटा वाजविणार आहे . यावर्षी सरकारने कापसाचे हमीभाव ७७१० रुपये ( मध्यम धागा ) व ८११० रुपये (लांब धागा ) प्रती क्विंटल जाहीर केले . स्वामीनाथन आयोगाच्या C2 +50% नुसार आज शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १००७५ रुपये भाव मिळणे अपेक्षित आहे . परंतु सरकारने जाहीर केलेले हमी भाव सुद्धा शेतकऱ्यांना मिळत नाही. गेल्या हंगामात प्रति क्विंटल सरासरी ६५०० रूपये शेतकऱ्यांच्या हातात पडलेले.सरकारची खरेदी यंत्रणा (CCI )अत्यंत तुटपुंजी आहे .गेल्या हंगामात एकूण कापसाच्या फक्त १३% कापूस CCI ने खरेदी केला. यामुळे शेतकऱ्यांनी ८७ % कापूस खुल्या बाजारात विकला व करोडो रूपयाचे नुकसान सहन केले. सरकारने घेतलेला कापूस आयात माफीचा निर्णय-कापड उद्योगातील बड्या भांडवलदारांच्या फायद्यासाठी असून यामुळे विदेशातील स्वस्त कापूस भारतातील कापड उद्योगाला प्राप्त होईल आणि भारतीय शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होणार असल्याचे किसान सभेचे राज्य कौंसिल सदस्य सुनिल मेटकर यांनी बोलतांना सांगितले.

शेतकऱ्यांच्या मागण्याचे निवेदन महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने तहसिलदार यांचे मार्फत पंतप्रधान यांचे नावे देण्यात आले. येत्या हंगामात शेतकऱ्यांचा संपूर्ण कापूस सरकारने हमीभावाने खरेदी करावा, C2 - 50% सुत्रानुसार हमी भाव जाहिर करावा ,कापूस उत्पादक भागात तालुकास्तरावर सरकारी कापूस खरेदी केंद्र सुरू करावे व ११ % आयात शुल्क माफीचा निर्णय त्वरीत मागे घ्यावा. ह्या मागण्या शेतकऱ्यांच्या वतीने निवेदनात करण्यात आल्या.

निवेदन देतांना किसान सभेचे राज्य कौंसिल सदस्य सुनिल मेटकर , संतोष सुरजुसे , किसान सभेचे तालुकाध्यक्ष हरिदास राजगिरे , तालुका सचिव विनोद तरेकर , नारायणराव भगवे , इस्माईल शहा, अविनाश कणसे , माधव ढोके , योगेश अवझाडे, राहूल चोपकर , वासुदेव चौधरी, संतोष कुकडे , संतोष बागडे , सचिन मेटकर , अरुणभाई शिंदे , ज्ञानेश्वर गावनेर , हनुमान शिंदे , दिप सावळे , प्रफुल देशमुख इत्यादी सह अनेक शेतकऱ्यांची उपस्थिती होती .

### मोरांगणा मार्गावर भीषण अपघात

होता. त्याचा मुलगाही याच भागात कार्यरत असल्याचे समजते.

बुधवारी सकाळी मुलानेच मृतदेह आपल्या वडिलांचा असल्याची खात्री केली. राजापेठ पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मदत कार्य सुरू केले. त्यानंतर पोलिस उपनिरीक्षक साळुंके व पथकाने घटनास्थळी धाव घेऊन जवळपास तासाभराच्या प्रयत्नांनंतर दोघांना बाहेर काढले. रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघातामुळे रस्त्याच्या कडेला असलेले घर, अंगणातील विटा, सायकल, नवीन दुचाकी, विहीर तसेच पथदिव्यांचे खांब यांचे मोठे नुकसान झाले. रात्रीच्या वेळी परिसरातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता; मात्र महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी सकाळी दुरुस्ती करून पुरवठा सुरळीत केला. खरांगणा (मोरांगणा) पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### राधे गणेशोत्सव मंडळाच्या

अनेक वर्षांपासून गणेशोत्सवा निमित्ताने दहा दिवस विविध सामाजिक उपक्रमाचे व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करीत असतात. नुकतेच मोफत आरोग्य तपासणी शिबीर पार पडले असून यात अस्थीरोग तज्ञ हाडांच्या तपासण्या, डोळे तपासण्या, स्त्रियांच्या विविध आजारांच्या तपासण्या, कान नाक घसा शुगर बी पी इत्यादी तपासण्या केल्या व रोगाचे निदान करून रुग्णांना औषध सुद्धा मोफत वाटप करण्यात आले. यावेळी डॉ.पंजाबराव देशमुख रुग्णालयाच्या डॉक्टरांनी सेवा दिली. यावेळी मंडळाचे प्रकाश मारोटकर, अक्षय हिवराळे, निलेश मारोटकर, प्रेम हिवराळे, आकाश मंगळे, श्रीकृष्ण कांबळे, जय , गजानन तायडे, सुरज गडलिंग, महेश वानखडे, भुमेश्वर गोरे, निलेश झिमटे, ओम रुमणे, सुभाष लोखंडे, किरण सावळे इत्यादी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### वाघाच्या हल्ल्यात वन

तर ,त्याला प्रेम कुठेही दिसला नाही. आकाशने जोर जोराने हाक मारली पण कोणताही प्रतिसाद त्याला मिळाला नाही. अंधार झाल्याने तो राजदेव बाबा कॅम्पकडे धावत सुटला. वनरक्षक व वरिष्ठांना त्याने घटनेची माहिती दिली. रात्री अकराच्या सुमारास वनरक्षक, वनपाल, वन परिक्षेत्र अधिका-यांसह कर्मचारी प्रेमच्या शोधात निघाले. पण प्रेम कुठेच मिळाला नाही. बुधवारी सकाळी पुन्हा प्रेम कास्देकरला शोधण्यासाठी मोहीम प्रारंभ करण्यात आली. त्यावेळी एका झुडपात प्रेम चा मृतदेह दिसला. त्याच्या शरीरावर वाघाने ओरबळल्याचे निशान तसेच एक हात नसल्याचे दिसून आले. सदर मृतदेह कंपार्टमेंट ९४४ मध्ये आढळला. मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. यावेळी वन विभाग सहाय्यक वनरक्षक प्राची उरडे, वनपरिक्षेत्र अधिकारी वनमजूर उपस्थित होते. घटनेची माहिती मिळाल्यानंतर आमदार केवलराम काळे हे सुद्धा घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आवश्यक दिशा निर्देश दिले. गावकऱ्यांनी वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

### भारत जनसंग्राम पक्षाला निवडणूक

च्या कलम २९-अ अंतर्गत 'भारत जनसंग्राम पक्ष' राजकीय पक्ष म्हणून नोंदणीकृत आहे. मात्र, २०१९ पासून झालेल्या लोकसभा किंवा कोणत्याही राज्य विधानसभेच्या निवडणुका किंवा पोटनिवडणुकांमध्ये या पक्षाने कोणताही उमेदवार उभा केलेला नाही. यामुळे, हा पक्ष कलम २९-अ च्या उद्देशांसाठी राजकीय पक्ष म्हणून कार्यरत नाही, असे आयोगाचे म्हणणे आहे.

या प्रस्तावावर कारवाई करण्यापूर्वी, निवडणूक आयोगाने पक्षाला आपली बाजू मांडण्याची संधी दिली आहे. पक्षाला ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत आपले लेखी म्हणणे, अध्यक्षांचे किंवा सरचिटणीसांचे प्रतिज्ञापत्र, आणि संबंधित कागदपत्रे मुख्य निवडणूक अधिकारी, कक्ष क्रमांक ६२४, ॲनेक्स, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई यांच्याकडे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, १० सप्टेंबर २०२५ रोजी मुंबईतील मंत्रालय येथील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष सुनावणी ठेवण्यात आली आहे. या सुनावणीला पक्षाचे अध्यक्ष, सरचिटणीस किंवा पक्षप्रमुख यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

पक्षाने दिलेल्या मुदतीपर्यंत कोणतेही उत्तर दिले नाही, तर पक्षाला या प्रकरणी काहीही म्हणायचे नाही असे गृहीत धरून पुढील योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी सांगितले आहे.

### एमआयडीसी परिसरात

मृत्यू दोन दिवसांपूर्वी


**INVITATION FOR TENDERS**
**DETAILED TENDER NOTICE (3rd Call)**
Regional Driving Training Center
Amravati. Tq. & Dist. Amravati.
(Reg. No. Maharashtra/674/19)

**Address – Sipna Shikshan Prasarak Mandal, Badnera Road, Amravati. Tq. & Dist. Amravati.**

Online lump sum tenders are invited by the President, Sipna Shikshan Prasarak Mandal, Amravati. For the following work from eligible Consultancy Firms. The Name of work, estimated cost, earnest money, security deposit, time limit for completion etc. are as under.

| Sr No. | Name of work | Earnest Money (Rupees) | Security Deposit (Rupees) | Time limit in Tender (Calendar Months) |
|---|---|---|---|---|
| 1 | Providing Services as Specified in Request for Proposal for Design development of Automation of Driving Test Track for Two-Wheeler, Light Motor Vehicle, Heavy Motor vehicle at Regional Driving Center (RDTC), Amravati (Maharashtra). | 10000/- | 10000/- | 12 Months Including Monsoon |

**: Scope of Work :**

**Engagement of a qualified consultant to assist Sipna Shikshan Prasarak Mandal with:**
1) Preparing the Detailed Project Report (DPR) for automation of driving tracks (LMV, HMV, Two-Wheeler) at RDTC. 2) Designing system architecture for hardware, software, integration, and control room setup. 3) Preparing technical specifications, Bill of Quantities (BoQ), and Request for Proposal (RFP) for selection of implementation vendor. 4) Providing bid evaluation support and recommendation for vendor selection. 5) Offering project management consultancy (PMC) during implementation phase (optional/additional scope). 6) Ensuring compliance with applicable standards and best practices.

**Eligibility Criteria for Consultant:**
1) Registered Consultancy Firm or Individual Consultant with experience in transport automation or track based testing infrastructure. 2) Minimum 2 similar consultancy assignments involving automation of vehicle test tracks, ADTTs, or RTO infrastructure (submit work orders or proof). 3) Minimum turnover of ₹10 lakhs per annum (last 3 years) OR equivalent consulting credentials. 4) Availability of qualified technical experts in automation systems, civil/electrical integration, and software systems (submit profiles). 5) Valid Registration, PAN, and IT returns for the last 3 years. 6. Self-declaration confirming: (a) No blacklisting by any government/semi-government organization. (b) No ongoing legal disputes affecting project delivery 7) Ability to deliver RFP, BoQ, and bid evaluation support within 60 days of work order issuance.

**Bidding Schedule**
1. Availability of Tender documents from 08/09/2025 to 10/09/2025 from 10.30 Am to 04.30 Pm. 2. Last date of submission of sealed tender 11/09/2025 up to 01.00 Pm. 3) Opening of Tenders 12/09/2025 at 05.00 Pm.
All rights to reject any one or all tenders are reserved with the undersigned. For more details please sspmamt@gmail.com

President/ Secretary
Sipna Shikshan Prasarak Mandal,
Amravati.


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २७८ ■ गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


## मोरांगण्यात भीषण अपघात नाल्याच्या पुलावर डंपर कोसळून २ ठार



**वर्धा जनमाध्यम :** वर्धा-आर्वी मार्गावरील मोरांगणा (खरांगणा) येथे मंगळवार दिनांक २ सप्टेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास अनियंत्रित डंपर उलटून भीषण अपघात झाला. या घटनेत चालक सुरेश बाबुलाल कुमार (रा. कोलूखेरी कला, राजस्थान, ह.मु. तरोडा) आणि वाहक दीपचंद (रा. कोलूखेरी कला, राजस्थान, ह.मु. तरोडा) या दोघांचा घटनास्थळी मृत्यू झाला.

आर्वी तालुक्यातील तरोडा येथून चुरी भरून येणारा डंपर आर.जे. १९ जी.जे. ३११२ हे वाहन चालकाचे मोरांगणा येथे वळणावर नियंत्रण सुटल्याने नाल्याच्या पुलाच्या भिंतीवर आदळला आणि उलटला. धडकेनंतर डंपरच्या केबिनमध्ये चालक व वाहक अडकले होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मदतकार्य सुरू केले. त्यानंतर पोलिस उपनिरीक्षक साळुंके व पथकाने घटनास्थळी धाव घेऊन जवळपास तासाभराच्या प्रयत्नांनंतर दोघांना बाहेर काढले. रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघातामुळे रस्त्याच्या कडेला असलेले घर, अंगणातील विटा, सायकल, नवीन दुचाकी, विहीर तसेच पथदिव्यांचे खांब यांचे मोठे नुकसान झाले.

रात्रीच्या वेळी परिसरातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता; मात्र महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी सकाळी दुरुस्ती करून पुरवठा सुरळीत केला. खरांगणा (मोरांगणा) पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### मतचोरीला चपराक, काँग्रेसची गर्जना

## वर्ध्यात आज आक्रोश दुचाकी रॅली

**वर्धा जनमाध्यम :** विविध मतदारसंघात मतचोरी झालेली असून, त्या घटनांचा निषेध करण्यासाठी व लोकशाही रक्षणाच्या उद्देशाने आज दिनांक ४ सप्टेंबर रोजी सकाळी वर्ध्यात काँग्रेस पक्षाच्या वतीने आक्रोश दुचाकी रॅली काढण्यात येणार आहेत.

काँग्रेस पक्षाच्या वतीने काढण्यात येणार दुचाकी रॅली ही सकाळी ९.३० वाजता आर्वी नाका चौकातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुतळ्यापासून सुरू होणार आहेत. कार्यकर्त्यांनी मोटारसायकलींवरून 'आपला हक्क- आपला आवाज' आणि 'मतचोरी बंद झाली पाहिजे' अशा घोषणाबाजी करणार आहेत. आयोजित दुचाकी रॅली ही काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मनोज चांदूरकर यांच्या उपस्थित होणार आहेत.'मतदारांचा हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी आणि भविष्य उज्ज्वल करण्यासाठी सर्वांनी सजग राहावे,'आयोजित रॅलीत युवक, कार्यकर्ते व स्थानिक नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी करण्यात आले आहे.

## वर्धा जिल्ह्यातील सात जलाशय फुल्ल

### -पाच जलाशयामधून पाण्याचा विसर्ग सुरू



**वर्धा जनमाध्यम :** यंदाचा पावसाळा वर्धा जिल्ह्यासाठी वरदान ठरला आहे. समाधानकारक पावसामुळे जिल्ह्यातील मोठे आणि मध्यम असे तब्बल सात जलाशय फुल्ल झाले असून त्यापैकी पाच जलाशयातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

जिल्ह्यात ११ जलाशय पैकी ७ जलाशयनी मागील वर्षाच्या सरासरीपेक्षा अधिक जलसाठ्याची नोंद झाली आहे. यामध्ये पंचधारा, पोथरा, डोंगरगाव, मदन, मदन उन्नई, धाम, लाल नाला आणि लघु प्रकल्प यांचा समावेश आहे. यापैकी पंचधारा, पोथरा, डोंगरगाव, मदन आणि वर्धा कार नदी प्रकल्प १०० टक्के क्षमतेने फुल्ल झाले आहेत.

जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील पाणीसाठ्यांची स्थिती समाधानकारक असल्यामुळे पुढील काही महिन्यांत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणारं नाही. यंदा साठवलेला पुरेसा जलसाठा पावसाळ्या नंतरच्या हंगामात पिकांसाठीही दिलासा ठरणार आहे.

**प्रकल्प जलसाठा**

-पोथरा प्रकल्प-१०० टक्के
-पंचधारा प्रकल्प-१००टक्के
-डोंगरगाव प्रकल्प-१०० टक्के
-मदन प्रकल्प-१००टक्के
-लाल नाला प्रकल्प-१००टक्के
-वर्धा कार नदी प्रकल्प-१००टक्के
-सुकळी लघु प्रकल्प-१००टक्के
-बोर प्रकल्प - ७२.५३ टक्के
-निम्न वर्धा - ६४.९५ टक्के
-धाम प्रकल्प - ८८.४२ टक्के


### निमित्त सावंगी मेघे गणेशोत्सवाचे

## आजची विशेष आरोग्य शिबिरे

**वर्धा जनमाध्यम-** सावंगी मेघे येथील गणेशोत्सवानिमित्त आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात आयोजित आरोग्य तपासणी शिबिरांमध्ये गुरुवार, दि. ४ रोजी हृदयरोग तपासणीसह कान नाक व घसारोग विभागात वारंवार भोवळ येणे, मेडिसिन विभागात संधिवात, न्यूरॉलॉजी विभागात स्मृतिभ्रंश, नेफ्रोलॉजी विभागात किडनी प्रत्यारोपण रुग्णतपासणी, न्यूरोसर्जरी विभागात पाठीच्या मणक्यांचे आजार, स्त्रीरोग व प्रसूती विभागात एन्डोस्कोपिक तपासणी, नेत्ररोग विभागात काचबिंदू तपासणी, अस्थिरोग विभागात आर्थ्रिटीस व व्यंगत्व, बालरोग विभागात सिकल सेल, मानसोपचार विभागात आत्महत्या प्रतिबंधात्मक उपचार, श्वसनरोग विभागात निद्रानाश उपचार, शल्यचिकित्सा विभागात कर्करोग पूर्वतपासणी तर मूत्ररोग बालकांचे मूत्रविकार आदी आजारांबाबत तपासणी करण्यात येणार आहे. नागरिकांनी या आरोग्यदायी शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन रुग्णालय समूहाचे संचालक डॉ. चंद्रशेखर महाकाळकर व सावंगी रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. अभय मुडे यांनी केले आहे.

## सोयाबीन पिक हातातून गेले, नुकसान भरपाई द्या

### -शेतकऱ्याची तहसीलदाराकडे निवेदनातून मागणी



**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील खंडाळा येथील सोयाबीन पिक फुल व शेंगा भरणाच्या अवस्थेत असताना एलोमोज्याक व हुमनी अळीच्या प्रादुर्भावा मुळे शेतकऱ्यांचे पूर्ण सोयाबीन पिक जमीनदोस्त व पूर्ण पणे गेले असून त्याची पाहणी करून भरीव मदत द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी तहसीलदाराकडे निवेदनातून केली आहे. खंडाळा येथील अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात सोयाबीन पिकाची लागवड केले असून त्या पिकावर एलोमोज्याक व हुमनी अळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे सोयाबीन पिवळे येऊन पूर्ण फुल गळ व शेगा गळती झाल्या आहे त्या मुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहे, प्रधानमंत्री पिक विमा हि योजना आणेवारी नुसार असून आमचे सोयाबीन पिक हे पूर्णपणे गेले असून त्याची पाहणी करून आम्हाला योग्य मोबदला देण्यात यावा.शासनाने अनुदावर दिलेल्या सोयाबीनवर सगळयात जास्त प्रमाणात ?लोमोज्याक व हुमनी अळीचा प्रादुर्भाव झाला आहे.शासनाने दिलेल्या सोयाबीन वरती जर हा रोग येतो तर खाजगी कंपनीच्या वानावर का येणार नाही म्हणून कृषी विभागाने या कडे लक्ष द्यावे आता सोयाबीन प्रती एकर ५० किलो होईल अशी परिस्थिती नाही.तरी शासनाने पंचानामे करून झालेल्या नुकसानीची आर्थिक भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी नायब तहसीलदार संजय काटपातळ यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदन देतेवेळी शेतकरी कैलास रणदिवे, संजय झाडे, प्रशांत झाडे, प्रफुल निनावे, पिंटू झाडे, अमोल पिचकाटे, मधुकर कुत्तारमारे आदी उपस्थित होते.

## तात्काळ पंचनामे करुन नुकसान भरपाईचा प्रस्ताव सादर करा

### - खा.अमर काळे यांचे पुरग्रस्त भागाची पाहणी नंतर प्रशासनास निर्देश



**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील आठ मंडळात जोरदार पावसाने न भूतो न भविष्यती असा आभाळ फाटल्यागत मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे या भागात नदी नाल्यांना पूर येऊन नदीपात्राबाहेर लोकांच्या शेतात मोठ्या प्रमाणात पाणी आले व सखल भागात सुध्दा पूरजन्य ?परिस्थिती निर्माण झाली. यात वाघोडी नाल्यावरील पुल वाहून गेला तर नरसापूर खडकी, सिरसोली, धाडी, साहूर, बोरगाव टूमणी तसेच कारंजा तालुक्यातील शेती पिकांसह खरडून नेली. सोयाबीनचे ? पिक हातातोंडाशी आले असतांना तसेच कापूस व इतर पिकांची परिस्थिती चांगली असतांना निसर्गाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावून नेला. खा.अमर काळे यांनी त्या सर्व परिस्थितीची माहिती घेऊन आज या भागात दौरा केला. त्यांनी या दौऱ्यात वाघोली नाल्यावरील वाहून गेलेला पुल, नरसापूर-खडकी सिरसोली, धाडी, बोरगाव टूमणी साहूर येथील पिके वाहून गेलेल्या शेतांची तसेच वाघोली येथील पुलाची तात्काळ दुरुस्ती करण्याचे निर्देश दिलेत. तसेच सोयाबीनवर आलेला करपा रोग व संत्रा, मोसंबी फळगळ याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

पाहणी केली. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाचे कोपाने असा हिरावून घेतल्याने खा. अमर काळे यांचे भेटीत शेतकऱ्यांशी चर्चा करतांना नकळतच शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले. शेतातील पिकांची व शेताची अवस्था पाहून शेतकऱ्यांच्या तोंडून शब्दही अबोल झाले होते. अशा या हवालदील शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न खा.अमर काळे यांनी केला. त्यांनी हा सर्व हृदय हेलावून टाकणारे दृश्य व शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रु पाहून तात्काळ त्यांनी प्रशासनाला फोन लावलेत व त्यांना तात्काळ पंचनामे करुन अहवाल शासनास सादर करावेत असे निर्देश दिलेत.या दौऱ्यात खासदार महोदया सोबत कृषी विभाग व महसुल विभागाचे स्थानिक अधिकारी तसेच कार्यकर्ते रवी गंजीवाले, प्रवीण खैरकार, राजू नागपुरे, सुरज ढोले, प्रसाद वरकड, सोनु माणिकपुरे, निलेश वानखेडे, दिलीप भाकरे, बाबाराव भिसे,? गजानन गायकवाड, अनिल नागपुरे, प्रवीण नागपुरे, पवन नागपुरे, निखिल भडके, जितू शेटे इत्यादी मंडळी उपस्थित होते.

## सोयाबीन पिकांवरील चारकोल रॉट रोगाचे व्यवस्थापन

**वर्धा जनमाध्यम :** सद्यस्थितीत सोयाबीन पिक काही ठिकाणी शेंगा लागण्याच्या व शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये आहे. या पिक वाढीच्या कालावधीत पिकाला सर्वात जास्त अन्नपुरवठा आवश्यक आहे. सद्यास्थितीत जिल्ह्यात काही भागामध्ये चारकोल रॉट म्हणजेच मुळकुज या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. तसेच पॅचेस मध्ये प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे या रोगाचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. असे आवाहन कृषि विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.चारकोल रॉट रोगाची लक्षणे – सुरवातीला शेताच्या काही भागामध्ये जेथे शेताचा उतार असेल अशा काही पॉकेटमध्ये झाडाची पाने जमिनीकडे झुकू लागतात व पिवळी पडतात परंतु झाडाची पाने गळून पडत नाही. आणि पिक पॅचेस मध्ये वाढण्याची प्रक्रिया सुरु होते. जर झाड उपटून मुळा बघितल्यास तर मुळाची साल अलगद निघून येते. आणि मुळे पांढरी पडतात ही प्राथमिक अवस्था आहे. परंतु त्यानंतर पिक पूर्णपणे वाळून मुळावर करड्या भुरकट रंगाची बुरशी दिसते. ही अवस्था झाल्यास झाड परत दुरुस्त होऊ शकत नाही. परंतु प्राथमिक अवस्थेत तापमानात वाढ असेल आणि सुरवातीला काही भागामध्ये जर पिक पिवळे पडत असेल तर उपाययोजना करावी.

सद्यस्थितीत अधूनमधून पाऊस पडला आहे त्यामुळे रोगाची तिव्रता कमी होण्यास मदत मिळेल. ज्यावेळी पाऊस पडला नसेल आणि पिकास पाण्याची आवश्यकता असेल अश्यावेळी शेतक-यांकडे ओलिताची सोय असल्यास एक संरक्षित ओलीत करावे. जर जमीन कोरडी असेल ओलावा नसेल तर मुळे अन्नद्रव्य शोषू शकत नाही. त्याकरीता २ किलो/लिटर ट्रायकोडर्मा २५ ते ३० किलो शेणखतात मिसळून शेतामध्ये फेकुन द्यावे. थायोफनेट मिथाईल ७० टक्के या आंतरप्रवाही बुरशीनाशकाची दोन ग्रॅम प्रति लिटरपाण्यामध्ये तेवढ्या भागामध्ये आळवणी केली तर हा रोग शेतामध्ये वाढणार नाही आणि रोगाची तीव्रता कमी करता येईल. कारण हे बुरशीनाशक आंतरप्रवाही असल्यामुळे लगेच पाने रंध्र व पिकाची मुळे याद्वारे शोषले जाते. असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

## गडद संदर्भांचा अन्वयार्थ मधील कविता समकाळाचा संयमित उदगार ! - डॉ. राजेंद्र मुंढे



**वर्धा जनमाध्यम :** गडद संदर्भांचा अन्वयार्थ या कवितासंग्रहातील कविता अष्टाक्षरी छंदातील कविता समकालातील आरोह अवरोवाचा संयमित स्वर असून मिथ आणि वास्तव याचे अनोखे दर्शन घडविते म्हणूनच गडद संदर्भाच्या अवतरणाचे संयमित रूप अवतरते', असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक डॉ. राजेंद्र मुंढे यांनी केले . ते कवी प्रशांत पनवेलकर यांच्या गडद संदर्भांचा अन्वयार्थ या कवितासंग्रह

प्रकाशन समारंभात भाष्य करताना बोलत होते . प्रकाशन विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्रीमान प्रदीप दाते यांच्या वर्धा येथील निवास स्थानी संपन्न झालेल्या या सोहळ्याला राष्ट्रभाषा प्रचार समितीचे प्रधान मंत्री डॉ. हेमचंद्र वैद्य, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. प्रदीप दाते, वि. सा.संघ शाखा कार्योपाध्यक्ष व ज्येष्ठ समीक्षक डॉ. राजेंद्र मुंढे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. महावीर पाटणी, शाखा सचिव सौ. रंजना दाते यांची प्रमुख उपस्थिती होती .

या कार्यक्रमात पनवेलकरांच्या कवितेवर अधिकृत भाष्य करताना डॉ. मुंढे म्हणाले की दामयमक व अष्टाक्षरी यात पनवेलकर यांची कविता रमली व ती छंदमय झाली आहे ती उत्तरोत्तर समयोचित व सामाग्रतेकते वाटचाल करीत जावी अशा शुभेच्छाही डॉ मुंढे यांनी या प्रसंगी त्यांना दिल्या. सदर काव्यसंग्रह निर्मितीसाठी परिश्रम घेतलेले प्रदीप दाते, राजेंद्र मुंढे यांचा मान्यवरांकडून सत्कार करण्यात आला. डॉ कोटेवार आपल्या भाषणात म्हणाले, की ' कविता ही अनुभवून समजते कारण कविता ही आनंद प्रदान करते. '

पनवेलकरांची कविता गूढ रम्य असून ती गुढतेच्या भावविश्वात वाचकाला घेऊन जाते असे उद्गार वि.सा. संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते यांनी काढले. तर कवितेकडे प्रेरणादायी म्हणून बघावे असे डॉ. हेमचंद्र वैद्य म्हणाले. अस्सल काव्यकृती ही सार्वकालिक व सर्वश्रुत असते , हे या काव्यसंग्रहात दिसते , असे निरीक्षण पत्रकार प्रशांत देशमुख यांनी नोंदविले. प्रा. शेख हाशम. गुणवंत डकरे, शाखेचे सहसचिव श्री. पद्माकर बाविस्कर, प्रा. डॉ राजेश देशपांडे, गौरी कोटंबकर व आकाश दाते इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

आभार प्रदर्शन सौ. दाते यांनी केले. या प्रसंगी स्मृतिदिन असलेल्या दिवंगत स्वाती पनवेलकर यांना एक मिनिट मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.हा सोहळा यशस्वी होण्यासाठी वि सा. संघ शाखा वर्धा सचिव सौ. रंजना दाते, आकाश दाते व सौ गौरी कोटंबकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

सर्व उपस्थितांचे स्वागत पनवेलकर यांनी सुताची माळ व काव्यसंग्रह देऊन केले.प्रशांत पनवेलकरांनी प्रास्ताविक केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व सौ. रंजना दाते यांनी केले तर प्रास्ताविक व मनोगत पनवेलकर यांनी व्यक्त केले.

## वर्ध्यात तांब्याच्या चोरीचा छडा - सहाजण ताब्यात, नागपूरचा भंगार व्यापारी अडचणीत



**वर्धा जनमाध्यम :** वसंत टॉकीज समोरील मोटार रिवाइडिंगचे दुकान फोडून तांब्याची तार चोरी करणाऱ्या टोळीला पोलिसांनी जेरबंद करून गुन्ह्यात वापरलेला ऑटो जप्त केला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या चमूने बुधवार ३ रोजी केली. मिळालेल्या माहितीनुसार, अशरफ अली मजर अली रा. हनुमान वार्ड यांच्या वसंत टॉकीज जवळ असलेल्या मोटर रिवाइंडिंगच्या दुकानातून अज्ञात चोरट्यांनी १ लाख ५० हजार रुपये किमतीचे १५ तांब्याचे बंडल चोरून नेले होते. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला.

या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा करीत होते. गोपनीय माहितीवरून सुनील उर्फ रॉकी शिंदे (२४), सुजल कुंबरे (१९) दोन्ही रा. बोरगाव टेकडी, अनिकेत उर्फ डीगो बडवाईक (२०) रा. तळेगाव (टालाटुले) व एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेऊन विचारपूस केली. त्यावेळी त्यांनी ही चोरी ऑटो चालक राजा कैतवास रा. बोरगाव टेकडी याच्या मदतीने केल्याचे कबुली दिली. तर चोरी केलेला मुद्देमाल आदिल शेख (२८), आरिफ मोहनोदिन शेख (३४) दोन्ही रा. नागपूर यांच्या मदतीने नागपूर येथील भंगार दुकानदार शिवकुमार शाहू याला विकल्याचे सांगितले. यावेळी पोलिसांनी या टोळीला जेरबंद करून या गुन्ह्यात वापरलेला ऑटो जप्त केला.

ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, प्रकाश लसुंते, पोलिस अंमलदार शेखर डोंगरे, सचिन इंगोले, प्रमोद पिसे, विकास मुंढे, सुगम चौधरी, शुभम राऊत, अरविंद इंगोले, राहुल अधवाल, सुमेध शेंद्रे, सायबर सेलचे अंमलदार दिनेश बोरकर, अंकित जिभे यांनी केली.

## १२ जुगाऱ्यांना अटक

**देवळी जनमाध्यम :** देवळी पोलिसांनी जुगार अड्ड्यावर छापा टाकूण १२ जुगाऱ्यांना अटक करून जुगारातील ४ लाख २९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई बुधवार ३ रोजी करण्यात आली. देवळी पोलिस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकला असता पोलिसांना मृगाल टाले (३२), स्वप्नील खडसे (४३), शुभम चौधरी (२५), रोशन खडसे (३८), पंकज कामतवार (३२), विलास शहाळे (४२), सुनील दोनोडे (४२), प्रथमेश खडसे (२५) सर्व रा. रोहणी, सूरज पेटकर (२२), आकाश सावसाकडे (२५), तेजस पेटकर (२३), गणेश ढोक (३५) सर्व रा. विजयगोपाल हे जुगार खेळताना आढळून आले.

## सामाजिक विकासासाठी ॲड, कोठारी पॅनलचा संकल्प : मंदिर समितीत नवे पदाधिकारी

**हिंगणघाट जनमाध्यम :** तालुयातील प्राचीन श्रीराम मंदिर देवस्थानच्या संचालक मंडळामध्ये २०१३ पासून धर्मदाय आयुक्त, वर्धा यांच्या न्यायालयमध्ये वाद सुरू होता. त्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी लागला. त्यानंतर ३ सप्टेंबर रोजी श्रीराम मंदिर देवस्थानच्या संचालक मंडळाची धर्मदाय



आयुक्त कार्यालयात निवडणूक पार पडली. या निवडणुकीत ॲड. सुधीर कोठारी यांचे पॅनल विजयी झाले. पॅनलचे दिगांबर चांभारे यांची अध्यक्षपदी तर व्यंकट पर्बत यांची उपाध्यक्षपदी म्हणून निवड झाली आहे. सचिव गजानन लाखे, सहसचिव सिद्धार्थ दारोंडे, कोषाध्यक्ष बळीराम नासर, देवराव लोखंडे यांच्यासह अन्य पाच अशा ११ सदस्यांची कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे.

यावेळी निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. सुधीर कोठारी यांनी स्वागत करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. मंदिराचा कारभार पारदर्शी व समाजोपयोगी तसेच गावाच्या विकासासाठी करण्यात यावा, अशी अपेक्षा ॲड. कोठारी यांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी मंदिराचे नवनिर्वाचित पदाधिकारी तसेच हिंगणघाट बाजार समितीचे संचालक डॉ. निर्मेश कोठारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी जिल्हाध्यक्ष गणेश चांभारे, माजी नगरसेवक पप्पू मोहता व अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.


## ग्रामपंचायत कार्यालय नरसिंगपुर ता.कारंजा घा. जि.वर्धा

कार्यालय ग्रामपंचायत नरसिंगपुर येथे विविध योजनेतून विकास कामे करिता पंजीबध्द कंत्राटदाराकडून खालील अटी व शर्ती च्या अधीन राहून निविदा मागविण्यात येत आहे. दिनांक ०४/०९/२०२५ ते ११/०९/२०२५ वेळ ५.०० वाजेपर्यत निविदा स्विकारण्यात येईल आणि दि.१२/०९/२०२५ ला निविदा उघडण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव योजनेचे नांव | तांत्रिक मान्यता क. | प्राकलन किंमत | निविदा फी | अनामत रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजा रानवाडी येथे जी.प.शाळेला वॉल कंम्पाउंड | TS No. 09/DE/15th F.C. /2025-26 | १,४०,०००/- | ५००/- | १०००/- | ९० दिवस |

**अटी व शर्ती :-**

१. कामाबाबतचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार ग्रामपंचायतला राहील.
२. कामाच्या गुणवत्तेची सर्व जबाबदारी कंत्राटदारांची राहील.
३. शासकीय नियमांनुसार विविध कपाती करण्यात येईल.
४. जिप कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी, आयकर रिटर्न आवश्यक राहील.
५. मंजूर कामावरील साहित्य व मंजुरची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

सरपंच
ग्रामपंचायत, नरसिंगपुर

सचिव
ग्रामपंचायत, नरसिंगपुर

# ओबीसी समाजासाठी उपसमितीची स्थापना ; राज्य मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय




**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा समाजाच्या आरक्षणासह इतर मागण्यांसाठी राज्य सरकारने उपसमितीची गठीत केली होती. या उपसमितीचे अध्यक्षपद मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना देण्यात आले. त्यात मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणानंतर सरकारने जीआर काढले आहेत. त्यामुळे ओबीसी समाजात नाराजी पसरली आहे. आता ओबीसी समाजासाठीही मंत्रिमंडळाने उपसमिती स्थापन करण्याला मान्यता दिली आहे.

मागील अनेक दिवसांपासून ओबीसी समाजासाठी उपसमितीची स्थापना करावी असा प्रस्ताव होता, २-३ कॅबिनेटमध्येही हा प्रस्ताव आला परंतु आज ३ सप्टेंबरला झालेल्या बैठकीत याला मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसींसाठी उपसमिती गठित करण्याला मंजुरी दिली. या समितीत महायुती सरकारमधील प्रत्येक पक्षातील २ सदस्य असतील अशी माहिती मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. तसेच ओबीसी समाजाच्या मागण्या असतील, त्यांच्या समस्या आणि काही उणीवा असतील, त्यांचे प्रश्न असतील त्याच्या सोडवणुकीसाठी ओबीसी उपसमिती काम करेल. जशी मराठा समाजासाठी उपसमिती होती, तशीच ओबीसी उपसमिती होती. छगन भुजबळ हे जुने जाणते नेते आहेत, त्यांची काही नाराजी असेल तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ते दूर करतील असं मंत्री गुलाबराव पाटील यांनी म्हटलं आहे.

### ◆ अनुसूचित जमातीतील नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आता केंद्राची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना

राज्यातील अनुसूचित जमातीतील इयत्ता नववी आणि दहावीत शिकणा-या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यनिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी आता केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात येणार आहे. या प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमधील अनुसूचित जमातीच्या नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. ही योजना व केंद्र सरकारच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेशी तुलना केली असता केंद्राच्या योजनेमध्ये शिष्यवृत्तीची रक्कम राज्याच्या योजनेपेक्षा अधिक मिळते. त्यामुळे या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यात शासकीय वसतीगृहात राहणा-या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारच्या योजनेतील लाभ दिल्यानंतरची रक्कम वगळून उर्वरित रक्कम वसतीगृह योजनेतून दिली जाणार आहे. ही योजना अनुदानित व शासकीय निवासी आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा तसेच नामांकित शाळा यांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

### ◆ गेटवे ऑफ इंडिया मेट्रो मार्गिका-११ प्रकल्पास मान्यता, २३ हजार ४८७ कोटी ५१ लाख रुपयांची तरतूद करणार

मुंबईतील आणिक डेपो - वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया मेट्रो मार्गिका-११ प्रकल्पास व त्यासाठी आवश्यक २३ हजार ४८७ कोटी ५१ लाख रुपयांच्या खर्चाच्या तरतुदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.मुंबई मेट्रो मार्गिका-११ ही मुंबई मेट्रो मार्गिका-४ (वडाळा-ठाणे-कासारवाडवली) चा विस्तार भाग आहे. या मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल दिल्ली मेट्रो रेल कार्पोरेशन कडून तयार करुन घेण्यात आला आहे. मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांच्यावतीने या प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे. या मार्गिकेचा ७० टक्के भाग हा भुयारी आहे. यात १३ भूमिगत आणि एक भू-समतल स्थानक उभारण्यात येणार आहेत. या १७.५१ किलोमीटर लांबीच्या प्रकल्पास पायाभूत सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीने यापुर्वीच मान्यता दिली आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडे ३ हजार १३७ कोटी ७२ लाख रुपयांचे समभाग आणि ९१६ कोटी ७४ लाक रुपयांचे बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य मिळविण्याकरिता विनंती करण्यात येणार आहे. प्रकल्पासाठी घेण्यात येणा-या कर्जाच्या परतफेडीची जबाबदारी स्वीकारण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

### ◆ नागपूर मेट्रोच्या टप्पा दोनच्या कर्जास मान्यता-

ठाणे शहरातील वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प, पुणे शहरातील पिंपरी-चिंचवड ते निगडी मेट्रो रेल्वे कारीडार, स्वारगेट ते कात्रज मेट्रो रेल्वे कारीडार, वनाज ते रामवाडी (मार्गिका क्र. २) च्या विस्तारीत मार्गिका वनाज ते चांदणी चौक व रामवाडी ते वाघोली (विठ्ठलवाडी) आणि पुणे मेट्रो मार्ग-४ (खडकवासला स्वारगेट हडपसर-खराडी) आणि नळ स्ट?प वारजे-माणिकबाग (उपमार्गिका) व नागपूर मेट्रो रेल्वे टप्पा-२ या मेट्रो रेल्वे प्रकल्पांसाठी आवश्यक कर्ज घेण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. ठाणे वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प, पिंपरी-चिंचवड ते निगडी मेट्रो रेल्वे कारीडार, स्वारगेट ते कात्रज मेट्रो रेल्वे कारीडार, वनाज ते चांदणी चौक व रामवाडी ते वाघोली मेट्रो कारीडार (विठ्ठलवाडी), पुणे मेट्रो मार्ग-४ (खडकवासला - स्वारगेट - हडपसर-खराडी) आणि नळ स्टॉप वारजे-माणिकबाग (उप मार्गिका) व नागपूर मेट्रो रेल्वे टप्पा-२ या मेट्रो रेल्वे प्रकल्पांना यापुर्वीच मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी घेण्यात येणा-या कर्जाची जबाबदारी स्वीकारण्यास तसेच त्यासाठी आवश्यक करार करण्यास आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पांना मंजूर केलेल्या मर्यादेत द्वीपक्षीय, बहुपक्षीय वित्तीय संस्था किंवा अन्य संस्थांमार्फत सुलभ व्याज दराचे कर्ज उपलब्ध करून घेता येणार आहे. त्यांना या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांची परतफेड करावी लागणार आहे. या कर्जाच्या अनुषंगाने आवश्यकता वाटल्यास शासन हमी देण्यास आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

### ◆ पुणे मेट्रोवरील बालाजीनगर, बिबवेवाडी या दोन नवीन स्थानकांना मंजूरी

पुणे शहरात स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गावर बालाजीनगर व बिबवेवाडी ही दोन नवीन स्थानके उभारण्यास आणि कात्रज मेट्रो स्थानकाचे दक्षिणेकडे सुमारे ४२१ मीटरने स्थलांतरण करण्यास व यासाठीच्या ६८३ कोटी ११ लाख रुपयांच्या खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-१ या एकूण ३३.२८ कि.मी च्या दोन मार्गिकांचा समावेश असलेल्या प्रकल्पाची महामेट्रोमार्फत अंमलबजावणी सुरू आहे.मार्गिका - १ पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट (लांबी १७.५३ कि.मी) (१४ स्थानके) (उत्तर-दक्षिण कारीडार) तसेच मार्गिका २: वनाज ते रामवाडी (लांबी ५५.७५ कि. मी १६ उन्नत स्थानके) (पश्चिम-पूर्व कारीड?ार) या मार्गांवर मेट्रो सेवा सुरु आहे. पुणे मेट्रो मार्ग-३ (हिंजवडी ते शिवाजीनगर) या २३.३ कि. मी. उन्नत लांबीच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पाची उभारणी सार्वजनिक खासगी सहभाग तत्वावर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गिकेवर बालाजीनगर व बिबवेवाडी येथे अतिरिक्त स्थानक उभारण्यात यावीत, अशी मागणी होत आहे. त्याबाबत लोकप्रतिनिधींकडून निवेदने प्राप्त झाली आहेत. तसेच, कात्रज मेट्रो स्थानक शेजारच्या पीएमपीएमएल बस स्थानकाशी जोडले जावे यासाठी त्याचे दक्षिणेकडे सुमारे ४२१ मीटरने स्थलांतरण करावे लागणार आहे. नवीन दोन मेट्रो स्थानके उभारणीमुळे आणि बोगद्याची लांबी अंदाजे ४२१ मीटर ने वाढविल्यामुळे येणा-या ६८३ कोटी ११ लाख रुपयांच्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली. यात महामेट्रोला पुणे महानगरपालिकेला २२७ कोटी ४२ लाख रुपये द्यावे लागणार आहेत. उर्वरित आवश्यक निधीसाठी कर्ज उभारणीस व अनुषांगिक करारांना बैठकीत मान्यता देण्यात आली.

### ◆ नागपूर शहराभोवती बाह्य वळण रस्ता, चार ठिकाणी ट्रक अण्ड बस टर्मिनल उभारणार

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नागपूर शहराभोवती बाह्य वळण रस्ता (आउटर रिंग रोड) व त्यालगत चार वाहतूक बेट (ट्रक अण्ड बस टर्मिनल) विकसित करण्याच्या प्रकल्पास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.नागपूर शहरामध्ये प्रवेश करणा-या अमरावती राष्ट्रीय महामार्ग, हिंगणा राज्यमार्ग, समृध्दी महामार्ग, हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग, उमरेड राष्ट्रीय महामार्ग, भंडारा राष्ट्रीय महामार्ग, भोपाळ राष्ट्रीय महामार्ग, काटोल राष्ट्रीय महामार्ग, जबलपूर राष्ट्रीय महामार्ग या सर्व महामार्गांना जोडणारा नागपूर शहराभोवतीचा सुमारे १४८ कि.मी. लांबीचा व १२० मी. रुंदीचा बाह्य वळण मार्ग व चार ठिकाणी ट्रक व बस टर्मिनल विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पास महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आला आहे. या बाह्य वळण रस्त्यामुळे समृध्दी महामार्ग व इतर जिल्ह्यांतून नागपूरकडे येणारी तसेच नागपूर शहरातून समृध्दी महामार्गाकडे होणारी अवजड वाहतूक रहिवासी क्षेत्राच्या बाहेरून परस्पर वळविणे शक्य होणार आहे. यामुळे शहरात उद्भवत असलेले वाहतूक कोंडीचे प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे.

बाह्य वळण मार्ग, ट्रक व बस टर्मिनल प्रकल्पासाठीच्या करारांसाठी लागणा-या मुद्रांक शुल्कात सुट देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी सुसाध्यता अहवालानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार आहे. प्रकल्पासाठी येणा-या १३ हजार ७४८ कोटी रुपये एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाच्या एकूण किंमतीपैकी भूसंपादनासाठी हुडको मार्फत ४ हजार ८०० कोटी रुपये इतके कर्ज उभारण्यास व या कर्जासाठी राज्य शासनाची हमी देण्यासही मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाकरिता उर्वरित आवश्यक रक्कम ८ हजार ९४८ कोटी इतका निधी राज्य शासनामार्फत अर्थसहाय्य म्हणून प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम पाहणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (नवि-१) यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीमध्ये विभागीय आयुक्त, नागपूर; व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन; आयुक्त नागपूर महानगरपालिका; जिल्हाधिकारी, नागपूर; मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर; अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर; सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, सह संचालक, नगर रचना, नागपूर हे सदस्य असतील तर महानगर आयुक्त नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे सदस्य सचिव असतील.

### ◆ मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन संकुलाच्या बांधकामासाठी ३ हजार ७५० कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता

मुंबईतील वांद्रे- पूर्व येथील उच्च न्यायालयाच्या नवीन संकुलाच्या बांधकामासाठी ३ हजार ७५० कोटी रुपयांची तरतूद करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथे शासकीय वसाहतीतील सुमारे ३०.१६ एकरवर उच्च न्यायालयाचे नवीन संकुल उभारले जाणार आहे. याठिकाणी उच्च न्यायालयाचे हायकोर्ट रुम, न्यायाधीशांची दालने आणि अन्य अधिकारी-कर्मचा-यांसाठीची दालने, सभागृह, ग्रंथालय याशिवाय न्यायाधीशांची निवासस्थाने, प्रशस्त वाहनतळ यांसह अनेकविध आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. हा महत्त्वपूर्ण प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आला असून तो वेळेत पूर्ण केला जाणार आहे.

## संक्षिप्त

### 238 लोकल गाड्यांच्या खरेदीसाठी 4 हजार 826 कोटी रुपयांस मंजुरी

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३ व ३अ (MUTP-3 & 3A) या प्रकल्पात वातानुकूलित २३८ लोकल (उपनगरीय रेल्वे) गाड्यांची खरेदी करण्यासाठी ४ हजार ८२६ कोटी रुपयांचा निधी रेल्वे बोर्ड व राज्य शासनाच्या हिश्श्यातून देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प राबविण्यात येत आहे. यातील टप्पा-३ (MUTP-3) व ३अ (MUTP-3A) या प्रकल्पातील २३८ उपनगरीय रेल्वे गाड्यांची खरेदी बाह्य कर्ज घेण्याऐवजी पूर्णतः रेल्वे व राज्य शासनाच्या निधीतून घेण्यास मान्यता देण्यात आली. यामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के म्हणजेच २ हजार ४१३ कोटी रुपयांचा हिस्सा राहणार आहे.

### पुणे ते लोणावळा दरम्यान तिसरी, चौथी उपनगरीय रेल्वे मार्गिका

पुणे ते लोणावळा दरम्यान तिसरी व चौथी उपनगरीय रेल्वे मार्गिका बांधण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत करण्यात येईल. सुमारे ६३.८७ कि.मी. लांबीच्या व १७ स्थानके असलेल्या या प्रकल्पासाठी सुमारे ५ हजार १०० कोटी रुपये खर्च येणार आहे. हा प्रकल्प पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उभारण्यात येणार आहे. पुणे-लोणावळा ब्राडगेज रेल्वे मार्गिका १९२७ पासून अस्तित्वात आहे. ही रेल्वे मार्गिका सन १९६० मध्ये दुहेरी रेल्वे मार्गिका करण्यात आली आहे. पुण्याच्या उपनगरांचा विस्तार झाल्यामुळे, सन १९८२ मध्ये उपनगरीय रेल्वे सेवा सुरू करण्यात आली.

### ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा 2025 चा निकाल जाहीर

ग्रंथालय संचालनालयाकडून जून २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.वर्ष २०२५ मध्ये राज्यातील २४ केंद्रांमधून एकूण १४६४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ८४५ विद्यार्थी उत्तीर्ण व ६१९विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. परीक्षेच्या निकालाची एकूण टक्केवारी ५८ इतकी आहे. राज्यात सर्वाधिक निकाल सिंधुदुर्ग केंद्राचा ९२ टक्के आहे. परीक्षेचा निकाल ग्रंथालय संचालनालयाच्या www.dol.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल. विद्यार्थ्यांना गुणपत्रिका त्यांच्या केंद्रांवर पाठविण्यात येत आहेत. ज्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिकेत काही त्रुटी असल्यास त्याची दुरुस्ती करायची असल्यास किंवा प्राप्त गुणांबाबत फेर गुण मोजणी करायची असल्यास त्यांनी प्रत्येक विषयास प्रत्येकी १० रुपये याप्रमाणे शुल्क व अर्ज संबंधित वर्ग व्यवस्थापक यांच्याकडे ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पाठवावेत, असे आवाहन ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

### संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात हजार रुपयांची वाढ

संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात एक हजार रुपयांची वाढ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या लाभार्थ्यांना दीड हजार रूपये अर्थसहाय्य दिले जात होते. आता ते अडीच हजार रुपये दिले जाईल.राज्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत निराधार पुरुष, महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, निराधार विधवा आदींना दरमहा पंधराशे रुपये अर्थसहाय्य दिले जाते. सध्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेत ४ लाख ५० हजार ७०० आणि श्रावणबाळ योजनेत २४ हजार ३ दिव्यांग लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांना आता दरमहा अडीच हजार रुपये अर्थसहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली. हे अनुदान ऑक्टोबर २०२५ पासून देण्यात येईल. यासाठी आवश्यक ५७० कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

### औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील राखेच्या वापरासंबंधी धोरणास मान्यता

महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात तयार होणा-या राखेच्या वापरासंबंधीच्या धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या सूचनेनुसार औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात तयार होणा-या राखेच्या वापराबाबतचे धोरण २०१६ मध्ये निश्चित करण्यात आले होते. केंद्र सरकारच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार सदर धोरणात बदल करणे प्रस्तावित होते. त्यानुसार या धोरणास मान्यता देण्यात आली. या धोरणाद्वारे राखेच्या १०० टक्के पर्यावरणपूरक पध्दतीने विनियोग कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

# जीआर मधून मराठा, ओबीसींची फसवणूक



**नागपूर/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणाचा प्रश्न खूप आधीच सुटायला हवा होता, मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना समाजामध्ये भांडण लावायची सवय आहे त्यामुळे आरक्षणासंबंधी निर्णय घेण्यास उशीर झाला. आरक्षणासंदर्भात ओबीसी समाजाचेही अधिकार अबाधित ठेवायचे आहेत आणि मराठा समाजाचे अधिकार आरक्षण देता आला पाहिजे. या आंदोलनातून स्पष्टता अजून बाकी असून २ सप्टेंबर रोजी मराठा आरक्षणासंबंधी जो जीआर सरकारने काढला त्यामुळे मराठा-ओबीसी समाजाची फसवणूक झाली असल्याची अशी भूमिका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी घेतली आहे.

मराठा आरक्षणासाठी आझाद मैदानावर जरांगे पाटील यांनी पाच दिवसांचे उपोषण केले. यानंतर जरांगे पाटील यांच्या ८ पैकी ६ मागण्या सरकारकडून मान्य करण्यात आल्या आहेत. यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी विजय झाला असल्याचे म्हणत गुलाल उधळला आहे. यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी नागपूरमध्ये संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यातील अनेक राजकीय विषयांवर भाष्य केले.

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मुळात हा आरक्षणाचा जो प्रश्न आहे हा राजकीय कमी किंवा हा सोशल इकानामिकल अशा प्रकारचा हा प्रश्न आहे. वेगळा देश जो निर्माण झाला त्या अनुषंगाने शोधण्याची आवश्यकता आहे. उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी असा परंपरा लाभली आहे, मात्र गेल्या काही काळात मोदी सरकार आल्यावर जे धोरण देशात राबवली जात आहेत या परिस्थितीने शासन केला आहे त्यामुळे उत्तम नोकरी मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती झाली आहे, असे मत हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्तकेले आहे. हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, जरांगे पाटलांनी आरक्षणाचा मुद्दा पुन्हा उचलला त्यांनी तळागाळातील मराठा समाजातील अपेक्षा अधोरेखित करीत असताना या मोहिमेचा नेतृत्व केले. मागच्यावेळी नवी मुंबईच्या वेशीवरून गुलाल उधळून आंदोलकांना वापस पाठवले आणि आरक्षण मिळाले अशी आवई ठोकल्या गेली आणि मराठा समाजाचे फसवणूक झाली, असा आरोप क?ग्रेस प्रदेशाध्यक्षांनी केला आहे. निवडणुका लागल्या त्यावेळी सात दिवसाच्या आत आरक्षण देउन असं देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासन दिले होते.

***ओबीसींच्या आरक्षणात वाढ आवश्यक-*** मराठा आणि ओबीसी या दोघांची फसवणूक झाल्याची दाट शक्यता कालच्या निर्णयाच्या माध्यमातून असू शकते त्यामुळे स्पष्टता आणणे फार आवश्यक आहे. या एकूण सर्व शासन निर्णयाच्या जी चर्चा ऐकतो त्याचा योग्य स्वरूपात निघू द्या आमची जी भूमिका आहे ती मराठ्यांना आरक्षण देण्याची आहे मात्र ओबीसींना २७ टक्के आरक्षण आहे या आरक्षणातही वाढ झाली पाहिजे ही काँग्रेस पक्षाची भूमिका आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले आहेत.

# नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सातव्या हप्त्याचा लाभ वितरित

**मुंबई/प्रतिनिधी :** नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सातव्या हप्त्याचा लाभ वितरित करण्यासाठी कृषी विभागातर्फे आज शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून लवकरच शेतक-यांच्या खात्यावर अनुदान जमा होणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. या योजनेंतर्गत ९२ लाख ३६ हजार शेतक-यांना लाभ होणार असून त्यासाठी एकूण १९३२. ७२ कोटी रुपये निधी मंजुर करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र शेतक-यांना प्रति वर्षी सहा हजार रुपये अनुदान देण्यात येते. केंद्र शासनाच्या या अनुदानामध्ये राज्य शासनातर्फे प्रति वर्षी आणखी सहा हजार अनुदान देण्यासाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविली जाते. या दोन्ही योजनेच्या माध्यमातून लाभार्थी शेतक-यांना प्रति वर्षी बारा हजार अनुदान मिळत असते. राज्याच्या नमो शेतकरी महासन्मना योजनेंतर्गत शेतकरी लाभार्थ्यांना



आतापर्यंत एकूण सहा हप्ते देण्यात आले आहेत. शासन निर्णयानुसार सातव्या हप्त्यामध्ये एप्रिल २०२५ ते जुलै २०२५ या महिन्यांचे अनुदान लाभार्थ्यांना भेटणार आहे. ज्या शेतकरी लाभार्थ्यांचा प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत समावेश आहे. त्या सर्वांना राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ मिळणार आहे.कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, 'राज्यातील सर्वसामान्य नागरिक व शेतक-यांना समोर ठेउन दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार काम करीत आहे. राज्यातील शेतक-यांना साथ देण्यासाठी कृषी विभाग सातत्याने काम करीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविली जाते. या योजनेचा सातवा हप्ता शेतक-यांना लवकरच मिळणार असून अतिवृष्टीमुळे अडचणीत असणा-या शेतकरी बांधवांना या योजनेचा फायदा होणार आहे. तसेच अतिवृष्टीमध्ये बाधित शेती पिकाचे पंचनामे अंतिम टप्प्यात असून इतर कार्यवाही पूर्ण झाल्यावर बाधित शेतक-यांना लवकरच मदत मिळणार आहे. ' असेही त्यांनी सांगितले.

# गोधणी येथील 692 हेक्टरवर उभारणी, साडे सहा हजार कोटींच्या कर्जास मान्यता

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत हिंगणा तालुक्यातील मौजे गोधणी (रिठी) व लाडगांव (रिठी) येथील सुमारे ६९२.०६ हेक्टरवर नवीन नागपूर अंतर्गत इंटरनॅशनल बिजनेस अण्ड फायनान्स सेंटर (आयबीएफसी) विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनास व खर्चाच्या तरतुदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी देवेंद्र फडणवीस होते. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्रकल्प उभारण्यासाठी सुसाध्यता अहवाल व त्यानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी ३ हजार कोटी रुपये व या जागेवर नवीन नागपूर विकसित करण्यासाठी अंदाजित ३ हजार ५०० कोटी असा एकूण ६ हजार ५०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पासाठी गृह निर्माण नागरी विकास महामंडळ लि. (त्त्छक्क्र) कडून ६ हजार ५०० कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यास व या कर्जास शासन हमी देण्यास मान्यता देण्यात आली आहे. नागपूर महानगर क्षेत्रामध्ये ज्ञानाधारीत उद्योगांना आकर्षित करता येईल, असे उत्पादन व सेवा क्षेत्रातील उद्योग व्यवसाय केंद्र निर्माण करणे, स्टार्टअप उभारणे, कार्पोरेट ऑफिसेस निर्माण करणे, या माध्यमातून शहराला वाणिज्य केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पांतर्गत एकात्मिक स्वरूपात उद्योग व्यवसाय केंद्रांना आवश्यक असणा-या पायाभूत सुविधा, स्मार्ट युटीलीटी सोल्यूशन, प्लग ॲन्ड प्ले आणि एक खिडकी मंजुरी व्यवस्था निर्माण केली जाणार आहे.

# कारखाने अधिनियमातील दुरूस्तीला मंत्रिमंडळाची मान्यता

**■ कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांची माहिती**

**■ कामगारांना अधिकचा आर्थिक लाभ मिळणार**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत कारखाने अधिनियम, १९४८ मधील काही तरतुदींमध्ये महत्त्वपूर्ण दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे कामगार आणि उद्योग क्षेत्रातील नियम सुलभ होउन पारदर्शकता वाढणार असल्याची माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिली. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले. या दुरुस्ती अंतर्गत कलम ५४ मध्ये कामगारांच्या कामकाजाच्या वेळेबाबत आता दिवसाला ९ तासांऐवजी १२ तास काम करण्याची तरतूद करण्यात आली आहे. कलम ५५ मध्ये विश्रांती कालावधीमध्ये बदल करून ५ तासांनंतर ३० मिनिटे आणि ६ तासांनंतर पुन्हा ३० मिनिटे विश्रांतीची तरतूद करण्यात आली आहे. यातील कलम ५६ मध्ये आठवड्याचे कामकाजाचे तास ४८ तासांवरून ६० तासांपर्यंत वाढविण्यात आले आहेत. तसेच कलम ६५ मध्ये कामगारांच्या अतिरिक्तवेळेबाबत (ओव्हरटाईम) आता कमाल मर्यादा ११५ तासांवरून १४४ तासांपर्यंत वाढविण्यात आली आहे. यामुळे कामगारांना अधिकचा आर्थिक लाभ मिळणार आहे. तसेच शासन मान्यतेशिवाय असा वेळेतील बदल कारखान्यांना परस्पर करता येणार नाही. त्याचबरोबर, आठवड्यात ४८ तास काम ही कालमर्यादा ओलांडता येणार नसल्याचेही कामगार मंत्री ?ड.फुंडकर यांनी सांगितले आहे.

कामगार मंत्री ?ड.फुंडकर यांनी सांगितले की, कामगारांकडून जास्तीचे काम घेतल्यास त्याचा पुरेपूर मोबदला आणि पगारी सुट्या देण्यासबंधीचे बदल यात सुचविण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या ड्ढठ्ठद्मड्ढ दृढ ड्डदृत्दढ़ ड्डद्बद्मत-दड्ढद्मद्म च्या धोरणा अंतर्गत देशात होणारे बदल लक्षात घेता कायद्यातील हे बदल उद्योग आणि कामगार या दोन्ही घटकांसाठी महत्वाचे आहेत. या बदलांमुळे उद्योग क्षेत्राला अधिक लवचिकता मिळेल तर कामगारांसाठीही पारदर्शक आणि नियोजित कामकाजाचे वातावरण उपलब्ध होणार आहे.

# 'पीएसआय' पदांसाठी विभागीय परीक्षा पुन्हा सुरू

**मुंबई/प्रतिनिधी ::** पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) पदांसाठी खातेअंतर्गत विभागीय परीक्षा पुन्हा सुरू करण्याची सूचना गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी एप्रिल २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मांडली होती. पूर्वी किमान पाच वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या पोलिस अंमलदारांना पोलिस उपनिरीक्षक पदासाठी २५ टक्के आरक्षणाच्या अंतर्गत विभागीय परीक्षा देता येत होती. या माध्यमातून अनेक पोलिस कर्मचा-यांना अधिकारी होण्याची सुवर्णसंधी मिळत होती. मात्र फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयानुसार ही परीक्षा बंद करण्यात आली होती.ही परीक्षा पुन्हा सुरू करण्याच्या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करीत राज्यमंत्री योगेश कदम यांनी मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा केली. याबाबत अधिकृत निर्णय घेण्यात आला आहे. साधारणपणे पोलिस कॉन्स्टेबलना सेवाकालाच्या शेवटच्या टप्प्यात पदोन्नतीद्वारे पीएसआय पद मिळते. अशावेळी त्यांना पीएसआय म्हणून फारतर दोन-तीन वर्षेच काम करता येते. परंतु विभागीय परीक्षेतून पीएसआय झालेल्या अधिका-यांना कमी वयातच पदोन्नती मिळाल्याने त्यांना पुढील २० ते २५ वर्षे पीएसआय किंवा त्यापेक्षा वरिष्ठ पदांवर कार्य करण्याची संधी मिळू शकते. यामुळे नव्या उमेदीचे, तरुण पीएसआय जोश आणि उर्जा घेउन कार्यरत होतील. या निर्णयामुळे राज्यातील मेहनती, अनुभवी तसेच तरुण पोलिस अंमलदारांसाठी पीएसआय पदाचा मार्ग पुन्हा खुला झाला आहे. अन्यथा, त्यांना अनेक वर्षे प्रतीक्षा करावी लागली असती. आता विभागीय परीक्षा त्यांच्या करिअरमध्ये प्रगतीसाठी नवे दार उघडेल. गृह राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, पोलिस दलातील मेहनती, कर्तव्यनिष्ठ आणि तरुण पोलिस अंमलदारांना अधिकारी म्हणून पुढे जाण्याची संधी मिळावी यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे. या शासन निर्णयामुळे पोलिस दलात नवे चैतन्य निर्माण होईल.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## आंदोलनामागील यश

'ज्याचा शेवट गोड, ते सारंच गोड' अशी मराठीत म्हण आहे. गेले पाच दिवस मुंबईत सुरू असलेल्या आंदोलनाबाबत अगदी तसेच म्हणता येईल. 'सगळ्या मागण्या मान्य केल्याशिवाय उठणार नाही' असा निर्धार करून उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे - पाटील यांनी परवापासून निर्जळी उपोषण सुरू केल्याने या ठिय्या आंदोलनाचे गांभीर्य चांगलेच वाढले होते. आंदोलकांची मोठी संख्या, त्यांनी वापरलेली दक्षिण मुंबई आणि गालबोट म्हणावं असे काही तुरळक, अनावश्यक प्रसंग घडल्याने हे आंदोलन म्हणजे 'जिवंत बॉम्ब' आहे, अशी चर्चा प्रशासनाच्या वर्तुळात सुरू झाली होती. दक्षिण मुंबईतल्या 'टिपिकल जनते'कडून तर अख्खी मुंबईच या बॉम्बवर बसली आहे; तो कधीही फुटू शकतो, अशा प्रकारची भीतीची भाषा सुरू झाली होती. ही भीतीच न्यायालयाच्या दालनांमध्ये काहींनी नेली आणि त्यातून न्यायालयाने आंदोलनाला व्यवस्थेचा बडगा उगारून शिस्तीत आणण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यातून अनावस्था प्रसंग उद्भवू नये, अशी सगळ्यांचीच इच्छा होती. त्यासाठी कालचा दिवस कसोटीचा होता. सरकारने योग्यवेळी पुढाकार घेऊन आंदोलनकर्त्यांचे समाधान केले आणि त्यामुळे एक मोठी चिंता मिटली असेच म्हणावे लागेल. एका बाजूला आंदोलनाच्या अवघड मागण्या आणि दुसऱ्या बाजूला आंदोलकांची वाढत चाललेली संख्या आणि त्याबरोबरच अस्वस्थता या कात्रीत सरकारवरचा दबाव वाढत होता. पण, मंत्रिमंडळ उपसमितीने ऐनवेळी घेतलेल्या कष्टाने सरकारला या कात्रीतून सोडवले. उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांना त्यामुळेच गुलालात नाहण्याची संधी मिळाली.आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रातील मराठ्यांचे होते, हे खरे. पण त्याला खरी ताकद दिली, ती मराठवाड्यातल्या गांवागांवातल्या मराठा ज्ञातीबांधवांनी. त्यांना आवश्यक 'शिदोरी' पोहोचवण्याचे काम मराठवाडा आणि मुंबईदरम्यानच्या जिल्ह्यातील मराठा संघटनांनी, विविध गटांनी केले. मुंबईतूनही शेवटच्या दोन-तीन दिवसांत चांगली मदत केली गेली. मराठवाड्यातल्या गांवागांवातून या आंदोलनासाठी सर्व तयारीनिशी गाड्या भरून आंदोलक आले, ते हैदराबाद गॅझेटचा निकष मान्य व्हावा या प्रमुख अपेक्षेपोटी. हैदराबाद गॅझेट गृहीत धरण्याचे मान्य झाले, की त्यातील नोंदी ग्राह्य ठरतील आणि त्यानुसार वंश परंपरागत हक्कही आपोआप सिद्ध होतील, ही त्यामागची साधी भावना होती. सरकारने दिलेले आश्वासन आणि तातडीने काढलेला शासन निर्णय (जीआर) पाहता मराठवाड्यातल्या बहुसंख्य मराठ्यांची ही मागणी मान्य झाली. सरकारी पातळीवर आतापर्यंत हैदराबाद गॅझेटमधील उल्लेख प्रमाण मानले जात नव्हते. गेल्या पाच दिवसांच्या आंदोलनाने स्वातंत्र्यपूर्व काळातील, निजामाच्या राजवटीतले हे गॅझेट आता अधिकृत आधार म्हणून मान्य झाले. आंदोलकांना आपल्या आंदोलनाचे हेच मोठे सार्थक वाटले. स्वतः जरांगे यांनीही याच मुद्द्याचे महत्त्व अधोरेखित करून आपले निर्जळी उपोषण सोडले. हैदराबाद गॅझेटनंतर आता सातारा आणि औंध या संस्थानांची गॅझेटही गृहीत धरली जावी, अशी मागणी आहे. टप्प्याटप्प्याने तीही मान्य होणार आहे. तसे झाले, तर आंदोलकांच्या दाव्यानुसार मराठवाड्याबरोबरच पश्चिम महाराष्ट्रातील मराठ्यांचाही मोठा प्रश्न सुटेल. त्यांची कुणबी नोंद सोपी होईल. ती झाली, तर इतर मागासवर्ग प्रवर्गातील सर्व सवलती त्यांना उपलब्ध होतील. सरकार जेव्हा असे धोरणात्मक निर्णय घेते, तेव्हा त्यात सर्वसाधारणतः मोठ्या प्रमाणावर असते. इच्छुक लाभार्थीला स्वतःला त्यासाठी पात्र म्हणून सिद्ध करावेच लागते. हे सिद्ध करणेच मोठे जिकिरीचे आणि वेळखाऊ आहे, अशी आंदोलकांची तक्रार होती. 'जो शेतकरी तो कुणबी' अशी सोपी व्याख्या केली, तर या व्याख्येत बसण्यासाठी जमिनीचा सातबारा हाच आधार ठरणार. पण, खरा गरीब आणि मागास तर शेतीत काम करणारा भूमिहीन शेतमजूर असतो. त्याला या व्याख्येत बसवण्यासाठी आधाराला काय घ्यायचे? हा प्रश्नही जरांगे - पाटील यांच्या उपोषणाने सोडवून घेतला. हैदराबाद गॅझेटच्या आधारे 'कुणबी', 'कुणबी मराठा' किंवा 'मराठा कुणबी' अशी जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी गाव पातळीवर समित्या गठीत केल्या जाणार आहेत. १३ ऑक्टोबर १९६७ पूर्वीचा, तेव्हांच्या निजामाच्या राज्यात वाडवडिलांचे वास्तव्य असल्याचा पुरावा मिळवला, तर ही नोंद शक्य होणार आहे. 'सगेसोयरे' या शब्दावरून झालेल्या वादालाही तिलांजली मिळाली, असे समजायला वाव आहे. कुळ किंवा नातेसंबंधात कोणाकडे कुणबी जातीचे प्रमाणपत्र असेल, तर त्याआधारे प्रतिज्ञापत्राद्वारे आता तशाच जात प्रमाणपत्राची मागणी करता येईल. या दोन्ही निर्णयांनी मराठा जातीसाठी कुणबी प्रमाणपत्र मिळवण्याच्या ठोस शक्यता उपलब्ध करून दिल्या आहेत, यात वादच नाही. आरक्षण आणि जाती आधारे मिळणारे भौतिक फायदे हा सध्या मोठा वादग्रस्त आणि संवेदनशील विषय आहे. मराठ्यांच्या 'कुणबी मागणी'ला इतर मागासवर्गीय समाजाचा पहिल्यापासून विरोध आहे. त्या वर्गातील काहीशे जातींना महाराष्ट्रात आपल्यात आणखी वाटेकरी नको आहेत. त्यामुळे, मराठ्यांनी आंदोलनातून जे पदरात पाडून घेतले, त्याला विरोध होईल, हेही गृहीत आहे. यापूर्वी प्रमाणे न्यायालयांत त्या विरोधात दादही मागितली जाईल. सरकारने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांनाही कदाचित आव्हान मिळेल. यापूर्वीच्या अनुभवावरून आंदोलकही त्याचा प्रतिवाद करण्यासाठी तयारीत असतीलच. 'मराठ्यांना आरक्षण'पासून 'मराठा आणि कुणबी एकच' द्वारा मागणी आता 'मराठा- कुणबी किंवा कुणबी-मराठ्यांना इतर मागासवर्गाच्या यादीत समाविष्ट करा' इथपर्यंत आली आहे. ती ज्या संघर्षातून आली, तो संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर आला आहे. यश दिसत असले, तरी 'संघर्ष संपला' असे म्हटले, तर ती घाई होईल.

# व्याज दर कपातीचा जागतिक परिणाम

**अमेरिकी फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांनी फेडरल रिझर्व्हच्या वार्षिक सभेत बोलताना व्याज दर कपातीच्या निर्णयाचे सूतोवाच केले. पत धोरणाची नियोजित बैठक १६ अणि १७ सप्टेंबर रोजी होणार असून यात व्याज दर कपातीचा निर्णय घेतला जाऊ शकतो. पॉवेल यांच्या मते, अमेरिकेत सध्या बेरोजगारीचे संकट आहे. शिवाय अलीकडच्या काळात कामगारांची मागणी आणि पुरवठा यात उल्लेखनीय घट नोंदली गेली आहे.**



प्रामुख्याने जुलै महिन्यात मागील वर्षाच्या महिन्याच्या तुलनेत रोजगाराची वाढ कमीच राहिली आहे. त्याचवेळी आगामी महिन्यातही कामगार कपातीची शक्यता आहे. अशावेळी व्याज दर कपातीचा निर्णय घेऊन दिलासा दिला जाऊ शकतो. पॉवेल यांच्या मते, अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शुल्क धोरणामुळे अमेरिकेत महागाईवाढीची शक्यता आहे. कारण, अनेक आवश्यक वस्तूंची निर्यात भारतासह अनेक देश अमेरिकेला करतात; पण शुल्कवाढीमुळे त्याची किंमत अनेक पटींनी वाढली आहे. पॉवेल यांनी शुल्कवाढीचा परिणाम हा स्पष्टपणे बाजारात दिसत असल्याचे म्हटले आहे; मात्र हा प्रभाव फार काळ टिकणार नाही, असाही आशावाद व्यक्त केला.

अर्थात, त्यांनी सध्याच्या शुल्कवाढ धोरणांमुळे महागाईचा भडका बराच काळ राहू शकतो, असेही सांगितले. परिणामी, रोजगार आणि महागाईसारख्या जोखमीला नियंत्रित करताना अडचणी येऊ शकतात. म्हणूनच धोरणात्मक व्याज दरात घट करण्याची गरज भासू शकते. वास्तविक गुंतवणूकदारांनी व्याज दर कपातीबाबत अगोदरपासूनच आशा व्यक्त केलेली होती; परंतु पॉवेल यांच्या ताज्या वक्तव्याने सप्टेंबरच्या फेडरल रिझर्व्हच्या बैठकीत धोरणात्मक व्याज दरात कपात होईल, हे आता स्पष्ट झाले आहे.

अध्यक्ष ट्रम्पदेखील फेडरल रिझर्व्हवर व्याज दरात कपात करण्यासाठी दबाव आणत आहेत, जेणेकरून अमेरिका विकासाच्या संथ गती किंवा मंदीच्या सावटाबाहेर येईल. फेडरल रिझर्व्हच्या मते, बेरोजगारीचा दर कमी आहे म्हणून आणि महागाईच्या शक्यतेपोटी धोरणात्मक व्याज दरात वाढ केली जाणार नाही; मात्र कामगार कपात केली जात असेल किंवा अन्य कारणांनी महागाई वाढत असेल, तर व्याज दर वाढविण्याचा विचार केला जाईल. पॉवेल यांनी दोन टक्के महागाई दराचे लक्ष्य निश्चित करण्यावर भर दिला आहे.

अमेरिकेची फेडरल रिझर्व्ह जगभरातील केंद्रीय बँकांची शिखर बँक मानली जाते. यामागचे सर्वात मोठे कारण म्हणजे, अमेरिकी डॉलर हा जगातील सर्वात सक्षम चलनापैकी एक मानला जातो आणि सामरिक तसेच आर्थिक दृष्टिकोनातूनही अमेरिका जगातील सर्वात प्रबळ देश आहे. त्यामुळे फेडरल रिझर्व्हच्या पावलावर पाऊल टाकत जगभरातील केंद्रीय बँका कामकाज करतात; पण सर्व देशांची आर्थिक स्थिती वेगवेगळी असल्याने काही वेळा काही देशांच्या केंद्रीय बँका फेडरल रिझर्व्हपेक्षा वेगळा निर्णय घेतात. काही अपवाद सोडला, तर भारताने देखील फेडरल रिझर्व्हने घेतलेल्या निर्णयाला अनुसरूनच निर्णय घेतले आहेत. फेडरल रिझर्व्हची सध्याची भूमिका पाहता जगभरातील प्रमुख देशांच्या केंद्रीय बँका आगामी पतधोरण आढावा बैठकीत धोरणात्मक व्याज दर 'जैसे थे' ठेवू शकतील किंवा व्याज दरात कपात करू शकतात.

भारताच्या पत धोरण आढावा समितीने सहा ऑगस्टच्या पतधोरण बैठकीत रेपो रेट ५.५० टक्के कायम ठेवला, तर त्याचवेळी स्थायी ठेव सुविधा (स्टँडिंग डिपॉझिट फॅसिलिटी) दर ५.२५ टक्के आणि मार्जिनल स्टँडिंग फॅसिलिटी ५.७५ टक्के दराच्या पातळीवर राहिला आहे. एनडीए आणि आरबीआय विकास दरात वेग आणू इच्छित आहेत आणि त्यासाठी रेपो रेट 'जैसे थे' किंवा कमी करणे गरजेचे आहे. आरबीआयने पतधोरण आढावा बैठक २०२५-२६ साठी ग्राहक मूल्य निर्देशांक (सीपीआय) चलनवाढीच्या ३.१ च्या स्तरावर राहण्याचा अंदाज बांधला. तो अंदाज मागील अंदाजाच्या तुलनेत कमीच आहे आणि प्रत्यक्षात जीडीपीचा विकास दर हा अंदाजाला ६.५ टक्के ठेवू शकतो आणि ही बाब आरबीआयच्या महागाई व्यवस्थापनाबात असणारी सजगता दाखविणारी आहे.

आरबीआयच्या मते, वैयक्तिक पातळीवरचा खर्च आणि सरकारी भांडवली खर्चामुळे देशांतर्गत विकासात मवाळपणा आला आहे. मात्र भूराजनीतिक तणाव अणि जागतिक स्तरावरील व्यापारी तणावामुळे विकासात अडथळे येत आहेत; मात्र आरबीआय यावरही नियंत्रण मिळवण्यात यश मिळवेल, अशी आशा आहे. अमेरिकेत धोरणात्मक व्याजदर कमी करण्याचा प्रस्ताव आणण्यामागे प्रमुख कारण म्हणजे, अमेरिकेतील संभाव्य आर्थिक मंदीची शक्यता, व्यापार स्पर्धा, फेडरल रिझर्व्हच्या दृष्टीने महागाई आणि रोजगार संकटाची वाढती शक्यता ही कारणे आहेत. अमेरिकेत अजूनही विकासाची गती कमीच आहे आणि त्यात वेग आणण्यासाठी धोरणात्मक व्याज दर कमी करणे आवश्यक आहे. व्याज दरात कपात केल्याने कर्जाला मागणी वाढेल आणि आर्थिक घडामोडींना चालना मिळेल.

अमेरिकेप्रमाणेच चीनमध्येदेखील उत्पादन, विक्री आदींचा विकास दर अपेक्षेपेक्षा कमीच आहे. त्याचवेळी जीडीपीचा विकास दर २०२४ मध्ये पाच टक्के होता आणि तो आता २०२५ मध्ये ३.९५ टक्के राहण्याची शक्यता आहे. चीनमध्ये जुलै महिन्यात महागाईचा दर शून्य टक्के राहिला आणि तो सप्टेंबर २०२२ मध्ये २.८ टक्के होता. २०२४ मध्ये चीनची सरासरी वार्षिक चलनवाढ २.८ टक्के राहिलेली आहे. विकास दरात वेग आणण्यासाठी चीनची राष्ट्रीय बँक 'पीपल्स बँक ऑफ चायना'ने कर्जाच्या व्याज दरात कपात केली आहे.

या माध्यमातून विकास दरात वेग आणायचा आहे. शिवाय चीन सुशासनाच्या समस्येचादेखील मुकाबला करत आहे. परिणामी, परकी गुंतवणूकदार चीनमध्ये येण्यास टाळाटाळ करत आहेत, तर काहीजण भारताकडे जात आहेत. सांख्यिकी कार्यालय युरोस्टेटच्या जुलैच्या आकडेवारीनुसार युरोपीय संघात २०२४ मध्ये जीडीपीचा विकास दर एक टक्के राहिला, तर तो २०२३ मध्ये ०.७ टक्के होता. त्याचवेळी २०२५ मध्ये युरो झोनमध्ये महागाई दर दोन टक्के होता. युरोपीय संघात हा दर २.३ टक्के राहिलेला दिसून येतो. ब्रिटनमध्ये चलनवाढीचा दर जुलै २०२५ मध्ये ३.८ टक्के राहिला आहे, तर जून २०२५ मध्ये ३.६ टक्के होता. त्याचवेळी विकास दर २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीत ०.३ टक्के, तर २०२५ च्या पहिल्या तिमाहीत ०.७ टक्के राहिला आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने २०२५ साठी जागतिक आर्थिक विकासाचा अंदाज कमी करत तो २.८ टक्के केला आहे. त्याचवेळी २०२६ या काळात तो तीन टक्के राहण्याचा अंदाज सांगितला गेला आहे. २०२५ मध्ये अमेरिकेत १.८ टक्के दराने विकास होण्याची शक्यता असून तो अंदाज अपेक्षेपेक्षा खूपच कमी आहे. विकसनशील अर्थव्यवस्थेच्या विकास दरातदेखील घट होण्याची शक्यता आहे. २०२५ मध्ये विकसनशील देशांचा विकास दर ३.७ टक्के राहू शकतो आणि तो जागतिक सरासरीच्या २.८ टक्क्यांपेक्षा अधिक आहे.

**अभिजित कुलकर्णी**

## भारत,रशिया व चीन मैत्री

चीन मध्ये एका परिषदेनिमित्त भारत चीन व रशिया यांच्या राष्ट्रप्रमुखांची एक बैठक नुकतीच पार पडली अमेरिकेच्या ट्रम्प यांनी नुकतेच जे वाढीव आय्यात शुल्क चीन व भारत या देशावर लावले आहे त्याची छाया या चर्चेवर होती रशिया भारताचा अनेक दशके मित्र आहे. भारत हा सध्या ५४ लाख बॅरल तेल आयात करत असून त्यापैकी रशियाकडून आयात तेलाचा वाटा ३६ टक्के आहि. अमेरिकेने भारतावर ५० टक्के आयात शुल्क लावले आहे. अमेरिकेचे म्हणणे आपण रशियाकडून तेल मोठ्या प्रमाणावर आयात करतो.या परिषदेमध्ये या विषयावर चीन व भारत यांची चर्चा सुद्धा झाली आज भारताची चीनला निर्यात १४.२५अब्ज डॉलर्स एवढी आहे तर चीनकडून आयात ११३.५ अब्ज डॉलर्स एवढी आहे. २०२४-२५ दरम्यान एकूण व्यापार तूट ९९.२ अब्ज डॉलर्स एवढी आहे याचाच अर्थ आजमितीला तरी व्यापाराच्या बाबतीत चीन खूपच पुढे आहे.आज चीन बरोबर आपले सीमावाद यासंबंधी वाद आहेत. सीमावाद त्वरित सुटला पाहिजे.त्यासंबंधी चीन काही ठोस बोलत नाही. चीन बरोबर व्यापार तर वाढलाच पाहिजे या बरोबर सीमावादाची सुद्धा सोडवणूक झाली पाहिजे. आजपर्यंत चीन चे धोरण नेहमीच संशयी वृत्तीचे राहिले आहे. भारताने सावधगिरीने पाऊले टाकून सीमावाद सोडविला पाहिजे

**शांताराम वाघ**

## अमेरिकेला शह देण्यासाठी युती

चीनच्या शांघाय शहरात नुकतीच एक आंतरराष्ट्रीय शिखर परिषद पार पडली. या शिखर परिषदेत अनेक राष्ट्रांचे प्रमुख उपस्थित होते मात्र सर्वांचे लक्ष होते ते जिनिपिंग, पुतिन आणि मोदी या चीन, रशिया आणि भारत या देशांच्या राष्ट्र प्रमुखांकडे. जिनिपिंग, पुतिन आणि मोदी हे तीन नेतेच या शिखर परिषदेत केंद्रस्थानी होते त्याचे कारणही तसेच होते अमेरिकेने भारत आणि चीनवर टाकलेल्या टॅरीफ बॉम्ब नंतर होणारी ही पहिलीच शिखर परिषद होती. चीन आणि भारतावर टाकलेल्या टॅरीफ बॉम्बमुळे चीन आणि भारताचे अमेरिकेशी असलेले संबंध बिघडले आहेत तर रशियाने युक्रेनशी सुरू असलेले युद्ध थांबवावे यासाठी पुतिन आणि ट्रम्प यांच्यात झालेली बैठक फिस्कटली त्यामुळे या दोन्ही देशात देखील तणाव निर्माण झाला त्या पार्श्वभूमीवर ही शिखर परिषद खूप महत्वाची मानली जात होती.

अमेरिकेला शह देण्यासाठी ही परिषद आयोजित केली असे मानले जात होते त्यामुळे या शिखर परिषदेतून अमेरिकेला कोणता इशारा दिला जाईल. या शिखर परिषदेनंतर अमेरिकेने भारतावर टीका केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड टीम यांचे व्यापार विषयक सल्लागार आणि भारताचे विरोधक असलेले पीटर नवारो यांनी शांघाय सहकार्य परिषदेच्या निमित्ताने मोदी, पुतिन आणि जिनिपिंग यांची झालेली भेट त्रासदायक असल्याचे म्हंटले आहे. भारताने चीन आणि रशिया सोबत नव्हे तर अमेरिका, युक्रेन आणि युरोप सोबत असायला हवे असे त्यांनी म्हटले आहे.

**श्याम ठाणेदार**



**दक्षिण महाराष्ट्रातील सातारा, कोल्हापूर आणि सांगली हे जिल्हे एकेकाळी औद्योगिक प्रगतीसाठी देशात आदर्श मानले जात होते. साखर कारखाने, दूध सहकारी चळवळ, कोल्हापूरचे फाऊंड्री व टेक्स्टाईल उद्योग, सांगलीची हळद-द्राक्षे यामुळे हा भाग राज्याच्या औद्योगिक नकाशावर ठळकपणे दिसत होता. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. शासन नवी मुंबई, विदर्भ, मराठवाडा येथे नवे विमानतळ, बंदरे आणि उद्योगधंद्यांच्या घोषणा करत आहे. पण आधीपासून उभारलेल्या औद्योगिक वसाहतींना पायाभूत सुविधाही न मिळाल्याने त्या धापा टाकायला लागल्या आहेत.**

# विकसित उद्योगांची संकटांशी झुंज

राज्यात गुंतवणूक वाढत असल्याच्या घोषणा करत असताना दक्षिण महाराष्ट्रातील विकसित उद्योग मात्र अनेक संकटांनी झुंजत आहे. त्यात अमेरिकन टॅरिफमुळे कोल्हापूर, इचलकरंजी, सांगलीच्या उद्योगाला जोराचा झटका बसण्याची चिन्हे आहेत. अशा काळात शासनाचा किंवा उद्योग विभागाचा या उद्योजकांशी सुसंवाद आहे असे म्हणण्याचे धाडस कोणीही करणार नाही. हे सत्यच आहे की, दक्षिण महाराष्ट्रातील उद्योग व्यवसाय हे सरकारी मदतीपेक्षा या भागातील नेतृत्वाच्या दूरदृष्टीमुळे निर्माण झालेले आहे. कोल्हापुरात राजर्षी शाहू महाराजांसारख्या द्रष्ट्या राजाने या भागाला विकासाची दृष्टी दिली. प्रचंड औद्योगिक प्रगतीचे स्वप्न दाखवले आणि आपल्या हयातीत त्याची सुरुवात करून दिली. औंधसारख्या भागात प्रतिनिधींनी राबवलेल्या धोरणाने किर्लोस्करवाडीची जडणघडण झाली. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर यशवंतराव चव्हाण यांनी कृषी औद्योगिक संस्कृती या भागात विकसित केली आणि स्वयंप्रेरणेने तसे कार्य करण्यास इच्छुक असणाऱ्या स्वातंत्र्य सैनिक तसेच युवा उद्योमशील अशा राष्ट्रवादी विचाराच्या युवकांना अशा उद्योगांची पायाभरणी करण्याची जबाबदारी सोपवली. सहकाराच्या जोडीने इथे साखर कारखानदारी, सूत गिरणी, बँक, दूध संघ आणि शिक्षण संस्था असे सहकाराचे जाळे उभे राहिले, पुढे कुक्कुटपालनापासून कृषी मालक प्रक्रियेपर्यंतचे अनेक उद्योग छोट्या छोट्या शेतकरी कुटुंबातील लोकांनी उभे केले. इचलकरंजीत अशाच पद्धतीने वस्त्रोद्योगाचे जाळी निर्माण झाले. पण आजची स्थिती या सर्व उज्ज्वल इतिहासावर काजळी बसवणारी आहे. तरीही काही मंडळींच्या धडपडीमुळे आजही दक्षिण महाराष्ट्र आपले अस्तित्व राखतोय.

साताऱ्याला कोयना प्रकल्प आणि साखर उद्योगांचा वारसा आहे. कराड आणि साताऱ्यात दुग्ध व अन्नप्रक्रिया क्षेत्रात क्षमता आहे. कोल्हापूरमध्ये फाऊंड्री, टेक्स्टाईल आणि ऑटोमोबाईलचे मोठे केंद्र उभे राहिले आहे. येथे उद्योगांची विविधता आहे. सांगलीत एमआयडीसीमध्ये संरक्षण दलासाठी लागणाऱ्या वस्तूंपासून वाहन उद्योगातील छोटे पार्ट आणि कापड उद्योगात गती घेतलेली आहे. पूर्वी साखर कारखान्या पाठोपाठ हळद, द्राक्षे व ज्वारीवर आधारित लघुउद्योगांनी ओळख मिळवली. आज अनेक कारखाने कर्जात आहेत, फाऊंड्री उद्योग कच्च्या मालाच्या महागाईने व पर्यावरणीय अटींनी दबलेले आहेत, तर सांगलीत वीज आणि डिजिटल नेटवर्कचा अभाव आहे. फलटण एमआयडीसी गेली पाच वर्षे जमीन व पर्यावरण मंजुरीच्या फेऱ्यात अडकले आहे. कोल्हापूरच्या शिरोली एमआयडीसीमध्ये वीज आणि पाणीटंचाई ही कायमची समस्या झाली आहे. सांगलीच्या कुपवाड औद्योगिक वसाहतीत रस्ते व ड्रेनेजसारख्या मूलभूत सोयींचा अभाव असून उद्योजकांचा उत्साह कमी झाला आहे. अशा रखडलेल्या प्रकल्पांमुळे रोजगारनिर्मिती थांबली आहे. एमआयडीसीच्या नव्या वसाहतींच्या घोषणा सातारा, कोल्हापूर व सांगलीसाठी झाल्या आहेत. कागल-हातकणंगले एमआयडीसीमध्ये टाटा टेक्नॉलॉजीज आणि ह्युंदाईचे प्रकल्प मंजूर झालेत, ज्यामुळे हजारो रोजगार निर्माण होतील अशी अपेक्षा आहे. सांगलीत फूड प्रोसेसिंग पार्क, कराड एमआयडीसीमध्ये लघुउद्योग प्रोत्साहनाच्या योजना कागदावर आहेत. पण व्यवहारात या योजनांना संथ गती आहे. नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळ, विदर्भात मोठे औद्योगिक हब, मराठवाड्यात नवीन उद्योग आणि दुसरीकडे दक्षिण महाराष्ट्रात आधीपासून वसवलेल्या वसाहती दुर्लक्षित - हा विसंवाद ठळक आहे. उद्योजक स्पष्टपणे सांगतात, आम्हाला विमानतळ वा बंदर नको, पण आधीच्या वसाहतींना साधे रस्ते, पाणी, वीज द्या. करसवलती, जीएसटीत सूट, जमीनवाटप जलद व पारदर्शक पद्धतीने व्हावे. प्रकल्प मंजुरीसाठी खऱ्या अर्थाने 'एक खिडकी योजना' लागू व्हावी. तसेच स्थानिक युवकांसाठी आयटीआय व पॉलिटेक्निक केंद्रांचा विस्तार व्हावा, कौशल्याधारित प्रशिक्षण मिळावे. महाराष्ट्राचे जीएसटी संकलन २०२३-२४ मध्ये २.५ लाख कोटी रुपये झाले. त्यात मुंबई, पुणे, ठाणे यांनी तब्बल ६५% वाटा उचलला. पश्चिम महाराष्ट्राचा वाटा ५-७% म्हणजे १२-१५ हजार कोटी रुपये आहे. एकेकाळी राज्याला औद्योगिक गती देणारा हा भाग आज मागे राहिल्याचेच हे आकडे सांगतात. आज राज्य शासन एका भागाला – मुंबई, पुणे, विदर्भ – मोठी झेप देत असताना, पूर्वी पुढारलेल्या पश्चिम महाराष्ट्राकडे दुर्दैवाने दुर्लक्ष होत आहे. सध्या वसलेल्या औद्योगिक वसाहतींना जर साधी पायाभूत सुविधा दिली नाही, तर त्या वसवलेल्या वसाहती ओस पडत जातील. दक्षिण महाराष्ट्राच्या उद्योगांमध्ये अद्यापही क्षमता आहे, फक्त शासनाच्या ठोस धोरणाची, पारदर्शक अंमलबजावणीची आणि मूलभूत सुविधांच्या विकासाची गरज आहे. अन्यथा एकेकाळी राज्याच्या औद्योगिक प्रगतीला गती देणारा हा भाग, उद्या केवळ इतिहासापुरता उरेल. दक्षिण महाराष्ट्राला पुन्हा औद्योगिक नकाशावर आणण्यासाठी काही उपाय आवश्यक आहेत. ते म्हणजे कोल्हापूर व सांगली येथे लॉजिस्टिक हब, महामार्ग व रेल्वे जोडणी. फूड प्रोसेसिंग, आयटी व नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना करसवलती व अनुदान.पीपीपी मॉडेलवर रखडलेले प्रकल्प पूर्ण करणे. साखर उद्योगांचे आधुनिकीकरण करून इथेनॉल व बायोगॅस प्रकल्पांना प्रोत्साहन देणे. स्थानिक तरुणांना उद्योगासाठी तयार करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रांची स्थापना करणे होय.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# राष्ट्रसंत मोरारीबापूंची रामकथा पर्व सोहळ्याची जय्यत तयारी

## यवतमाळात ६ ते १४ सप्टेंबर दरम्यान रामकथा पर्व

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : दारव्हा मार्गावरील चिंतामणी खासगी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात ६ ते १४ सप्टेंबर या कालावधीत राष्ट्रसंत मोरारीबापूंच्या रामकथा पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन सोहळा ६ सप्टेंबर रोजी दुपारी २.३० वाजता शोभायात्रेद्वारे होणार असून, सायंकाळी ४ ते रात्री ७.३० व शनिवारीनंतर रोज सकाळी ९.३० ते दुपारी १.३० या वेळेत रामकथा पार पडणार आहे.

डॉ. विजय दर्डा, राजेंद्र दर्डा व दर्डा परिवार यजमान असून विविध समित्यांच्या सहकार्याने सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे.

कार्यस्थळ समिती अतुल मांगुळकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असून भोजन, आवास-निवास, वाहतूक, सुरक्षा, आरोग्य, प्रसिद्धी आदींसाठी स्वतंत्र समित्या नियुक्त आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी एस.टी. महामंडळाच्या १८ विशेष बसगाड्या तसेच नाममात्र शुल्कावर ऑटो व्यवस्था करण्यात आली आहे.

आरोग्य विभाग व संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या सहकार्याने आरोग्य तपासणी शिबिर, सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांकडून शुगर, बी.पी., ईसीजी तपासणी तसेच दोन रुग्णवाहिका व इर्मजन्सी सुविधा उपलब्ध राहणार आहेत. नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड सोहळास्थळीच देण्यात येणार असून त्यासाठी रेशन व आधारकार्ड आवश्यक आहे.

सोहळ्याच्या उद्घाटनास पालकमंत्री संजय राठोड, मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, इंद्रनील नाईक, खासदार संजय देशमुख, तसेच जिल्ह्यातील अनेक आमदार उपस्थित राहणार आहेत. ऐतिहासिक व अविस्मरणीय ठरणाऱ्या या रामकथा पर्वासाठी नागरिकांनी वेळेपूर्वी स्थळग्रहण करावे व खाद्यपदार्थ, पाण्याची बाटली सोबत आणावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मराठा आरक्षणासाठी मराठा बांधवासह मुस्लिम बांधवावर गुन्हा दाखल

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - मराठा समाजाला आरक्षण मिळावे याकरिता मनोज दादा जरांगे पाटील यांनी मुंबई येथे उपोषण करून सर्व महाराष्ट्राचे लक्ष वेधले होते आणि त्यांना साथ देत महाराष्ट्रातला समस्त मराठा समाज हा मुंबईमध्ये दाखल झाला होता.

त्यांच्याच समर्थनात 1/9/2025 सोमवार रोजी महागाव येथे तालुक्यातील मराठा बांधवांनी नागपूर तुळजापूर महामार्गावर रस्ता रोको आंदोलन केले होते यात तालुक्यातील समस्त मराठा बांधव सह इतर समाज बांधव सुद्धा उपस्थित होते मराठा समाजाला आरक्षण मिळावे याकरिता या आंदोलनात फुलसावंगी येथील मुस्लिम कार्यकर्त्यांनी सुद्धा त्यांची उपस्थिती दर्शविली होती या आंदोलनामध्ये संपूर्ण महाराष्ट्रात मुस्लिम समाज हा मराठा समाज यांच्या सोबत उभा राहतांना दिसला ज्या पद्धतीने मदत करता येईल त्या पद्धतीने मुस्लिम बांधवानी मदत केली. आणि याच अनुषंगाने एक खारीचा वाटा म्हणून मुस्लिम बांधवानी सुद्धा मराठा बांधवांसह महागाव येथे रस्ता रोको आंदोलन केले.आणि याच रस्ता रोको आंदोलनात मराठा बांधवासह मुस्लिम बांधवावर सुद्धा गुन्हा दाखल झाला.

आज फुकट काहीच मिळत नाही जे काही मिळवायचे आहे ते संघर्षातूनच मिळवावे लागते त्यामुळे समाज असे कितीही गुन्हे अंगावरती घ्यायला तयार आहे तर यामध्ये शैलेश कोपरकर,शिवाजीराव देशमुख, उदय नरवाडे,नितीन नरवाडे, अमर नरवाडे, शिवाजी नरवाडे, तेजस नरवाडे, सुरेश देशमुख, विशाल पवार, संदीप ठाकरे, आशिष देशमुख, गोविंदराव देशमुख, हंसराज मोरे, समाधान राऊत, नितीन नरवाडे,अमोल नरवाडे, स्वप्निल अडकिने, प्रवीण ठाकरे, गोलू नरवाडे, प्रवीण नरवाडे, बबनराव गावंडे, राहुल वानखेडे, अविनाश नरवाडे,पंकज देशमुख, आणि गजानन देशमुख, तर यामध्ये आवर्जून एक नाव दिसत आहे ते म्हणजे फुलसावंगी येथील आमचे मुस्लिम बांधव कयाम भाई नवाब यांचे हे मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी आंदोलनामध्ये सहभागी झाले त्यांच्यावरती सुद्धा गुन्हा दाखल झाला कयाम नवाब भाई यांचे योगदान महागाव तालुक्यातील मराठा समाजाच्या नक्की लक्षात राहील.

# गणेशोत्सवाचा उत्साह; पोलीस, प्रशासन यंत्रणाही अलर्ट मोडवर!

## ४४२ सार्वजनिक गणेशोत्सव ; शहरात रविवारी विसर्जन



जनमाध्यम प्रतिनिधी

पोलिस आता २४ तास कॅमेऱ्यांद्वारे नजर ठेवून असल्याने शहरवासीयांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करून गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद उत्सव शांततेत व मंगलमय वातावरणात साजरा करावा. - सेवानंद वानखडे, पोलिस निरीक्षक, शहर पोलिस स्टेशन पुसद.

### असा राहणार आहे बंदोबस्त

पुसद शहरातील गणेश विसर्जन मिरवणूक रविवारी (दि.७) आहे. ग्रामीण भागातील गणेश विसर्जन ४ व ६ सप्टेंबर रोजी होणार आहे. ईद-ए-मिलादचा जुलूस ५ सप्टेंबर रोजी आहे. जुलूस व गणेश विसर्जनवेळी उपविभागीय पोलिस अधिकारी हर्षवर्धन बी.जे. शहराचे ठाणेदार सेवानंद वानखडे, वसंतनगरचे ठाणेदार सतीश जाधव, ग्रामीणचे ठाणेदार सुरेंद्र राऊत, खंडाळाचे ठाणेदार विनीत घागे, वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक निलेश शेंबडे आदींच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात राहील. पोलिसांचे ११ अधिकारी, शहरचे ४१ कर्मचारी, एसआरपीएफची एक कंपनी, स्ट्राइकिंग फोर्स एक कंपनी, एक आरसीपी पथक, ६५ गृहरक्षक दलाचे जवान आदींसह राखीव फोर्स तैनात आहे.

पुसद - गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद उत्सवासाठी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्ताची तयारी केली असून यंदा पुसद शहरात १०८, तर तालुक्याच्या ग्रामीण भागात ३३४, असे एकूण ४४२ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे स्थापन झाली आहेत. गणेशोत्सव निर्विघ्न पार पाडण्यासाठी डझनभर अधिकाऱ्यांसह विविध राखीव तुकड्या तैनात असून, पोलिस यंत्रणा अलर्ट मोडवर आहे.

गावांत एक गाव एक गणपती ही संकल्पना राबविण्यात आली असून ग्रामीण भागातील ६५ गावांत "एक गाव एक गणपती" ही संकल्पना राबविण्यात आल्याने काही प्रमाणात पोलिसांवरील ताण कमी झाला आहे. पुसद तालुक्यात चार पोलिस ठाणी असून, शहर पोलिस ठाण्यांतर्गत यंदा १२८ पैकी शहरात ७३, तर ग्रामीण भागात ५५ सार्वजनिक गणेश मंडळांनी स्थापना केली आहे. तालुक्यातील भाटंबा व नंदपूर (मोहा) या दोन गावांत एक गाव-एक गणपती संकल्पना राबविण्यात येत आहे. पुसद ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत एकूण १८६ सार्वजनिक गणेशोत्सव असून, २९ गावांमध्ये ही संकल्पना राबविण्यात येत आहे. शहरातील वसंतनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत एकूण ६५ सार्वजनिक गणेश मंडळांची स्थापना केली असून, यामध्ये शहरातील ३५, तर ग्रामीण भागातील ३० गणेश मंडळे सामील आहेत. यापैकी वरूड व सेवादासनगर या दोन गावांत "एक गाव एक गणपती" ही संकल्पना राबविण्यात आली आहे. तालुक्यातील खंडाळा पोलिस स्टेशनच्या हद्दीत एकूण ६३ सार्वजनिक गणेश मंडळांनी स्थापना केली असून, ३२ गावांमध्ये "एक गाव-एक गणपती" ही संकल्पना राबविण्यात येत आहे. गणेशोत्सव निर्विवादपार पाडण्यासाठी पोलिस यंत्रणेने जय्यत तयारी केली आहे. संवेदनशील व गर्दीच्या ठिकाणी अधिकाऱ्यांसह विविध कंपनींची कुमक तैनात आहे. याशिवाय शहरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे देखरेख, नियमित गस्त आणि वाहतूक व्यवस्थेसाठी स्वतंत्र नियोजन केले आहे.

# वाहतूक विभागाला बॅरिकेट्स भेट, श्री लक्ष्मीनारायण पतसंस्थेचा उपक्रम

जनमाध्यम प्रतिनिधी




वणी - परिसरातील वाहतूक दिवसेंदिवस वाढत आहे.विविध ठिकाणी रस्त्याचे काम असते, यामुळे परिसरात अनेकदा वाहतुकीची समस्या निर्माण होते. ही बाब लक्षात घेऊन श्री लक्ष्मीनारायण पतसंस्थेच्या अध्यक्षा संगिता खाडे व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय खाडे यांच्या माध्यमातून वणी वाहतूक उपशाखेला 10 बॅरिकेट्स भेट देण्यात आले.यावेळी अप्पर पोलिस अधिक्षक अशोक थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती.

कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास रस्ते बंद करणे, सण उत्सवाच्या वेळी वाहतूक वळवणे, प्रातःपथावर असलेले क्षेत्र दर्शवणे, अपघातांचा धोका कमी करणे, वाहनांना सुरक्षितपणे मार्ग दाखवणे इत्यादी साठी बॅरिकेट्सची गरज भासते. वणी वाहतूक उपशाखेकडे बॅरिकेट्सची कमतरता लक्षात घेऊन संगिता खाडे यांच्या माध्यमातून १० बॅरिकेट्स भेट देण्यात आले. मंगळवारी २ सप्टेंबर रोजी संध्याकाळी एका छोटेखानी कार्यक्रमात हे बॅरिकेट्स वाहतूक शाखेकडे वितरीत करण्यात आले. यावेळी अप्पर पोलिस अधिक्षक अशोक थोरात यांनी पतसंस्थेचे आभार मानले.कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश दळवे, ठाणेदार गोपाळ उंबरकर, पोलीस उपनिरीक्षक वाहतूक विभाग विजय महाले यांच्यासह पुरुषोत्तम आवारी, प्रकाश धवळे, संदीप कांबळे, वैभव डंभारे, गणेश लडके, तेजराज बोढे, कविता चटकी, वंदना धगडी, शारदा ठाकरे, निशा गौरकार, सुनिता बोढे, चेतन मांडवकर, अनुराग आयतवार, सचिन ढवस, कैलास खिरटकर यांच्यासह वाहतूक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# पावसामुळे नाल्याला पूर येऊन शेतक-यांचे लाखोचे नुकसान

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - तालुक्यातील रिधोरा येथे २९ ऑगस्ट रोजी मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने नाल्याला मोठ्या प्रमाणात पुर आल्याने येथील शेतकऱ्यांचे कपासी व तुर पिक खरडून नेल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

सदर रिधोरा येथील शेतकरी अविनाश बबनराव जवादे हा अल्पभूधारक शेतकरी असून यांच्या शेतात पुराचे पाणी शिरल्याने यांच्या शेतातील कपाशी व तूर पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे यामध्ये या शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे दिसून येत आहे. तर गावालगत असलेल्या नाल्याला रात्रीच्या वेळेस मोठ्या प्रमाणात पाणी आले असल्याने हे पाणी सुद्धा काही लोकांच्या घरात शिरले आहेत सदर 29 ऑगस्ट रोजी आलेल्या मुसळधार पावसामुळे नाल्यालगत असलेल्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे येथील शेतकऱ्यांकडून सांगितल्या जात आहे. सदर नाल्यालगत असलेल्या शेताची संबंधित अधिकाऱ्यांनी मोक्का पाहणी करून नुकसान भरपाई देण्याची मागणी येथील शेतकऱ्यांकडून होत आहे. सदर विहीरगाव येथील तलाव ओव्हर फ्लो होऊन वाहत असल्याने रिधोरा , विहीरगाव येथील नाल्यालगत असलेल्या घरांना धोका निर्माण होऊ शकतो ? याबाबत सुद्धा संबंधित अधिकारी यांनी नाल्यालगत असलेल्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात यावा अशी मागणी रिधोरा, विहीरगाव येथील नागरिकांकडून होत आहे.

# वीस मिनिटांच्या पावसाने जिल्हाधिकारी कार्यालय जलमय ; नागरिकांचा रोष उसळला

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - जिल्ह्यात सर्वत्र पावसाने जोर धरला असून अनेक तालुके जलमय झाले आहेत. शेतकऱ्यांच्या डोळ्यात या अतिवृष्टीने पाणी आले आहे. अशा परिस्थितीत नागरिकांचे संकट सोडवणाऱ्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातच आज पावसाचे पाणी साचून राहिल्याने गैरसोयीचे चित्र पाहायला मिळाले.

बुधवार, ३ सप्टेंबर रोजी दुपारी सुमारास एक वाजता यवतमाळ शहरात अवघ्या वीस मिनिटांची जोरदार सर झाली. परंतु या अल्पावधीतच जिल्हाधिकारी कार्यालयाचा संपूर्ण परिसर जलमय झाला. जिल्हाधिकारी कार्यालयात दररोज शेतकरी, महिला व नागरिक विविध समस्या घेऊन मोठ्या अपेक्षेने येतात. मात्र, कार्यालय परिसरात पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा न झाल्याने सर्वांनाच त्रास सहन करावा लागला. ग्रामीण भागातून आलेल्या शेतकरी व महिलांना या परिस्थितीत अधिक हालअपेष्टा भोगाव्या लागल्या. जिल्ह्यातील सर्वात महत्वाच्या शासकिय इमारतीतच पाण्याचे व्यवस्थापन नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. "ज्यांच्या दारात लोकं आपलं दुःख हलकं करण्यासाठी येतात, त्यांच्या दारातच जर अशी अवस्था असेल, तर शहरातील झोपडपट्ट्या वा ग्रामीण भागातील परिस्थिती किती बिकट असेल, याची कल्पनाच करवत नाही. साध्या शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यांचीही अवस्था वाईट आहे," अशी भावना प्रा. पंढरी पाठे यांनी व्यक्त केली. पावसाळ्याचा हंगाम सुरु असताना जिल्हाधिकारी कार्यालयासारख्या महत्वाच्या इमारतीत पाण्याचा निचरा न होणे हे प्रशासनाच्या निष्क्रियतेचे द्योतक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# वेचक

### सहस्त्रकुंड धबधबा बघण्यासाठी आलेल्या पर्यटकाची कार नाल्यात वाहून गेली



ढाणकी - सहस्त्रकुंड धबधबा हा ओसंडून वाहत असताना याचा सुंदर रूप बघण्यासाठी मराठवाडा आणि विदर्भ मधून दूर दुरून पर्यटक पाहण्यासाठी गर्दी करत आहे. असेच एक पर्यटक सहस्त्रकुंड धबधब्याच्या सुंदर रूप आपल्या आठवणीत साठवून घेण्यासाठी पुसद इथून आपल्या कुटुंबासमवेत आले असता. 1 सप्टेंबर च्या संध्याकाळी सातच्या सुमारास मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने सहस्त्रकुंड जवळी मार्गावरील नाल्यावर पूर आला.पुराच्या पाण्याचा अंदाज न आल्याने सदर वाहन चालकाने कार पुराच्या पाण्यात टाकली असता पाहता पाहता कार वाहून गेली. कार मध्ये , सर्व रा पुसद येथील असल्याची माहिती असून. सुदैवाने कार वाहत जाऊन काठाला अडकल्याने कारमधील सगळे सुखरूप बाहेर आले. मात्र कार पुराच्या पाण्यात वाहून गेली. आज सकाळी क्रेनच्या सहाय्याने सदर कार काढण्यात आली असून. अशी घटना पुन्हा घडू नये म्हणून पर्यटकाकडून या रस्त्यावरील सगळे पूल उंच करण्याची मागणी होत आहे.

### खेतानी फाउंडेशनच्या सातत्यपूर्ण मागणीचा मोठा यश




पांढरकवडा : येथे शववाहिनी उपलब्ध यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री मा. संजय भाऊ राठोड यांच्या माध्यमातून पांढरकवडा येथे शववाहिनी उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील यवतमाळ, पुसद, दिग्रस, आर्णी, दारव्हा आणि पांढरकवडा या ठिकाणीच शववाहिनी देण्यात आलेल्या आहेत. यातील पांढरकवडा येथील शववाहिनी ही विशेषतः खेतानी फाउंडेशनच्या मागणीमुळे उपलब्ध झाली आहे. समाजातील गरजा व नागरिकांच्या अडचणी ओळखून सतत पाठपुरावा करणाऱ्या खेतानी फाउंडेशनचे हे एक मोठे यश आहे. नागरिकांना आता या सुविधेमुळे दिलासा मिळणार असून, खेतानी फाउंडेशनच्या या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### आयातीमुळे कापूस उत्पादक शेतकरी संकटात

राळेगाव : यवतमाळ जिल्हा हा 'कॉटन सिटी' म्हणून प्रसिद्ध असून राळेगाव तालुका कापसाची मोठी बाजारपेठ आहे. मात्र, नुकत्याच केंद्र सरकारने कापूस आयातीवरील 11 टक्के शुल्क हटवून आयातीची मुदत 31 डिसेंबरपर्यंत वाढविल्याने स्थानिक शेतकऱ्यांचे गणित कोलमडले आहे. गेल्या काही वर्षांत बियाणे, मजुरीचे दर वाढल्याने कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत. यावर्षी अतिवृष्टीचा फटका बसला असून गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव होण्याची भीती आहे. अशातच स्वस्त विदेशी कापूस बाजारात आल्यास स्थानिक कापसाला योग्य भाव मिळणे कठीण होणार आहे. सीसीआयकडून खरेदी सुरू होण्यास विलंब होतो तसेच अनेक अटी-शर्तींमुळे शेतकऱ्यांना आपला कापूस तात्काळ विकता येत नाही. परिणामी शेतकऱ्यांना कमी दराने व्यापाऱ्यांना कापूस विकावा लागतो. शेतकरी अरविंद वाढोनकर म्हणाले, "आधीच तालुक्यातील शेतकरी आत्महत्येच्या गर्तेत आहेत. अशा निर्णयामुळे कापसाला भाव मिळणार नाही." नंदकुमार गांधी यांचे मत आहे, "देशातच तीस लाख गाठी शिल्लक असताना आयातीची आवश्यकता नव्हती. हा निर्णय म्हणजे शेतकऱ्यांच्या कंबरड्यावर घाव आहे." तर प्रदीप ठुने यांनी सरकारच्या धोरणांवर टीका करताना सांगितले, "प्रत्येक निर्णय शेतकऱ्यांच्या मरणाचे कारण ठरत आहे." कापड उद्योगाला लाभ होईल, पण कापूस उत्पादक शेतकरी मात्र मोठ्या संकटात सापडतील, अशी खंत व्यक्त होत आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयात अनुकंपा तत्वावरील उमेदवारांचा मेळावा

यवतमाळ - राज्य शासनाच्या 150 दिवसांच्या विशेष सुधारणा कार्यक्रमांतर्गत अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र असलेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यासाठी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत आज विविध विभागांकडे अनुकंपा तत्वासाठी यादीवर असलेल्या उमेदवारांचा मेळावा जिल्हाधिकारी कार्यालयातील बळीराजा चेतना भवन येथे घेण्यात आला. या मेळाव्यास जिल्हाधिकारी विकास मीना, उपवनसंरक्षक धनंजय वायभासे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, अधीक्षक अभियंता विक्रम सोनवणे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# अत्यावश्यक रुग्णवाहिका १०२ ची चाके थांबणार?

## वेतन नसल्याने चालकांची उपासमार

जनमाध्यम प्रतिनिधी



बाभूळगाव : जननी सुरक्षा योजनेसाठी असलेल्या अत्यावश्यक रुग्णवाहिका सेवा १०२च्या सर्व १४ रुग्णवाहिका चालकांना मागील सात महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. ही अतिशय गंभीर व संतापजनक बाब समोर आली असून वेतनाशिवाय सुद्धा ते आजही सेवा बजावत आहेत. रुग्णवाहिका ही अत्यावश्यक व जीवनावश्यक सेवा असतानाही, शासनाकडून चालकांची आर्थिक परिस्थिती बिकट असताना अवहेलना करण्यात येत आहे. या प्रकारामुळे रुग्णवाहिका चालकांवर उपासमारीची वेळ ओढवली आहे. आता मात्र त्यांच्या संयमाचा बांध फुटला असून कुठल्याही क्षणी अत्यावश्यक "रुग्णवाहिका १०२" ची चाके थांबण्याची स्थिती निर्माण झाली आहे. गर्भवती महिलांच्या सेवेसाठी असलेल्या रुग्णवाहिका सेवा १०२च्या चालकांचे वेतन शासनस्तरावरून रखडले आहे. दिवसरात्र कोणतीही तक्रार न करता, न थकता हे चालक आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत आहेत, परंतु त्यांच्या समस्यांकडे यंत्रणेकडून सातत्याने दुर्लक्ष होत आहे. नवे पोशाख-कपडे तर दूरच, मुलांच्या शिक्षणाची फी भरायची की घर चालवायचं हा प्रश्न त्यांच्या समोर उभा ठाकला आहे. काही चालक तर खाजगी कर्ज काढून संसाराच्या मुलभूत गरजा भागवित आहेत. या संदर्भात संबंधित विभागाने वेळेत वेतन दिले नसल्यामुळे रुग्णसेवा थांबण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने तात्काळ याची दखल घेऊन वेतन अदा करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी सर्व चालकांकडून करण्यात येत आहे. या प्रकारामुळे रुग्णांच्या जिवाशी खेळ करणाऱ्या व्यवस्थेवर रोष व्यक्त करत, नागरिकांनी देखील प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संबंधित प्रशासन व व्यवस्थापनाने या गंभीर समस्येची दखल घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

# ओबीसी प्रवर्गात समावेश करून मराठ्यांना आरक्षण दिल्यास ओबीसी कदापी सहन करणार नाही : अरविंद वाढोणकर

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - महाराष्ट्रात अनेक दिवसांपासून मराठा समाज आरक्षण मागण्यांसाठी आंदोलन, उपोषण करीत आहेत. परंतु आरक्षण ओबीसीमध्ये समाविष्ट करून घेण्यासाठी आता नुकताच मुंबईत मराठा समाजाचे मनोज जरांगे मराठा समाजाच्या लाखो लोकांच्या उपस्थितीत आमरण उपोषण केले असताना दिनांक 2/9/2025 रोजी शिंदे समितीच्या वतीने उपोषणकर्ते मनोज जरांगे यांच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन त्यांना आरक्षण देण्याचे लेखी आदेश दिले.

मराठ्यांना सरकारने आरक्षण दिल्यास आमची हरकत नाही परंतु हे आरक्षण ओबीसीमधून दिल्यास हा एक प्रकारचा ओबीसीच्या अस्तित्वाशी खेळण्याचा प्रकार असून यामध्ये कुठेतरी राज्य सरकारची कुटनिती दिसून येत असून समाजा समाजात तेढ निर्माण करण्यासाठी ही सरकारची खेळी असल्याचे दिसून येते. अशातच आज दिनांक 3/9/2025 रोज बुधवारला सकाळी बारा वाजता भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यवतमाळ जिल्हा ओबीसी सेलच्या वतीने यवतमाळ जिल्हा अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.त्या निवेदनात म्हटले आहे की सरकार मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची तयारी करत असून त्याला आमचा ओबीसी प्रवर्गात लोकांचा विरोध असून अशातच जर मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण दिल्यास संपूर्ण महाराष्ट्रातील ओबीसी समाज पेटून उठल्याशिवाय राहणार नाही.आणि सरकार मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देऊन महाराष्ट्रातील भाजपा सरकार, विशेषतः महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मराठा समाज आणि ओबीसी समाजात संघर्ष निर्माण करण्याचे प्रयत्न करत असून ही मराठा समाज आणि ओबीसी समाजासाठी अतिशय घातक आणि दुर्दैवी बाब असून मराठ्यांना आरक्षण देताना ओबीसी प्रवर्गातून न दिल्यास आमची हरकत नाही . याबाबत शासनापर्यंत आमची हाक राज्य सरकारपर्यंत पोहचवण्यासाठी जिल्हा अधिकारी यवतमाळ यांना निवेदन देण्यात आले असून परत . ओबीसी प्रवर्गाला आंदोलनाला सुरवात करावी लागेल असा इशारा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे यवतमाळ जिल्हा ओबीसी सेल यवतमाळ जिल्हा अध्यक्ष अरविंद वाढोणकर यांनी दिला असून निवेदन सादर करते वेळी इंजिनिअर अरविंद वाढोणकर अध्यक्ष यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमेटी ओबीसी विभाग, इंजिनिअर प्रकाश जानकर, प्राध्यापक बबलू देशमुख, इंजिनिअर अशोक रिंगे , अशोकराव बोबडे प्रदेश सरचिटणीस, उत्तमराव खंडारे,मोहन बनकर, मनोज पायघरे विवेक, शैलेश गुल्हाणे ,रवी ढोक,श्रावणसिंग वडते अंकुश मुनेश्वर, प्रविण नरडवार किशोर धामंदेयांच्या सह अनेक ओबीसी समाजाचे लोक उपस्थित होते.

# माझा बाप्पा' घरगुती गणेश सजावट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

जनमाध्यम प्रतिनिधी



बाभूळगाव - लहान मुलांमध्ये पारंपारिक सण-उत्सवाचे महत्व वाढावे, घराघरात आनंदी, धार्मिक वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने बाभूळगाव शहरातील घरगुती गणेश मुर्तीची प्रतिस्थापना करणाऱ्या भाविकांसाठी 'माझा बाप्पा' घरगुती गणेश सजावट स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे आयोजन नगर सेवक अक्षय राऊत मित्र परिवार व शहर काँग्रेस कमेटीच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. हि स्पर्धा २७ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत घेण्यात आली. यामध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद देत ३१ कुटुंबांनी सहभाग नोंदविला असून दि ३ सप्टेंबर रोजी स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला.

या स्पर्धेमध्ये श्री.गणेशाची सजावट, इकोफ्रेंडली गणेश, देखावे, सुशोभीकरण, विद्युत रोषणाई या प्रमाणे निवड करण्यात आली. या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक रोहित नानाजी मोहनकर वार्ड क्र.१, द्वितीय पवन हिवरकर वार्ड क्र.१६, तृतीय सुनिता आनंद वर्मे वार्ड क्र.९, तसेच चतुर्थ चंदा सुनील माटोडे वार्ड क्र.१० यांनी पटकाविले. यशस्वी स्पर्धकांना चांदीचे नाणे व सन्मानचिन्ह देण्यात आले. स्पर्धेत सहभागासाठी स्पर्धकाने देखाव्यासोबत सेल्फी काढून, आपले नाव, आपला वार्ड क्रमांक पाठवने आवश्यक होते. यावेळी माजी सरपंच भारत इंगोले, खरेदी विक्री संघ अध्यक्ष श्रीकांत कापसे, डॉ. रिखबचंद तातेड, उपनगराध्यक्ष श्याम जगताप, काँग्रेस कमेटी शहर अध्यक्ष भरत भूराने, नगरसेवक अक्षय राऊत, धरमचंद छललानी, शशिकांत थोटे, प्रदीप नांदूरकर, अंकुश सोयाम, पप्पु तातेड, सचिन बेलसरे, चंद्रकांत तुरणकार, अजमत मुल्ला उपस्थित होते.

# रक्तदान करुन दिग्रसमध्ये ईद साजरी होणार!

## डॉ. कलाम फोरम आणि गोदावरी अर्बनचे संयुक्त आयोजन

जनमाध्यम प्रतिनिधी



दिग्रस - इस्लाम धर्माचे अंतिम प्रेषित हजरत महंमद पैगंबर यांची जयंती अर्थातच ईद-ए-मिलादच्या पावन पर्वावर, शिक्षक दिनाचे औचित्य साधून डॉ. एपीजे अब्दुल कलाम फोरम, गोदावरी अर्बन बँक, सफिया - रहेमान शैक्षणिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि दिग्रस तालुका पत्रकार संघ यांचे वतीने रक्तदान शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात समाजातील सर्व जाती धर्माच्या युवक, युवती, महिला व पुरुषांनी रक्तदान करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

ईद ए मिलादच्या पवित्र पर्वावर रक्तदान शिबिर आयोजित करण्याचे हे डॉ. कलाम फोरमचे पाचवे वर्ष आहे. आतापर्यंत सुमारे चारशे रक्त पिशव्यांचे संकलन करून शासकिय रक्तपेढी यवतमाळ यांना देण्यात आल्या आहेत. शिवाय वर्षभर गरजूंना मोबाईल रक्तदाते उपलब्ध करून देण्याचे कार्यही डॉ. कलाम फोरम करीत असते. डॉ कलाम फोरमचे मुख्य कार्यवाह मिर्झा अफजल बेग, अध्यक्ष फिरोज खान, सचिव अमीन चौहान, प्रकल्प प्रमुख फारुक अहेमद, आमीन नौरंगाबादे, कार्याध्यक्ष मिर्जा नासीर बेग, उपाध्यक्ष अजीम खान, आसिफ शेख, फारुक चव्हाण, गोदावरी अर्बन बँकेचे राहुल कोल्हे पाटील, दिग्रस तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष पी पी पप्पुवाले, सफिया-रहेमान शैक्षणिक, सांस्कृतिक प्रतिष्ठानचे मजहर अहेमद खान यांनी शिबिरात रक्तदान करून सक्रिय सहभाग घेण्याचे आणि शिबिर यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे.

दिग्रस येथील ग्रामीण रुग्णालय (सरकारी दवाखाना) येथे सोमवार दिनांक 5 सप्टेंबर रोजी दुपारी 11 ते 4 या वेळात आयोजित रक्तदान शिबिरात दिग्रसकरांनी मोठ्या संख्येत रक्तदान करून या पवित्र, जीवनदायी महान कार्यात सहभागी होण्याची विनंती आयोजकांनी केली आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. कलाम फोरमचे सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत. तसेच शिबिर आयोजनात गोदावरी अर्बन बँकेचे कर्मचारी, आर डी एजंट, गुरुकुल इंग्लिश स्कूलचे शरीफ शेख, प्रियंका मेमोरियलचे सदानंद आठवले, विमा सल्लागार अभय नानोटे, दिग्रस तालुका पत्रकार संघटनेचे पदाधिकारी, लक्ष्यवेध क्रीडा अकॅडमीचे सुरेंद्र राठोड, शारीरिक शिक्षक संघटनेचे सदस्य क्रीडा शिक्षक, शेतकरी मित्र संतोष चव्हाण, विविध पत्रकार संघटना, टॅक्सी चालक मालक संघटना, केमिस्ट संघटना, शिक्षक संघटना, विविध समाज संघटना आणि दिग्रसकर नागरिक हातभार लावत आहेत.

# विदर्भाला अतिवृष्टीचा इशारा, अमरावतीला पावसाचा ऑरेंज अलर्ट

**अमरावती/का.प्र.**

बुधवारी अमरावती येथे ऑरेंज तर विदर्भातील अन्य जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. तसेच गुरुवारी विदर्भातील सर्वच जिल्ह्यांना यलो अलर्ट आहे. त्यानंतर पावसाचा जोर काहीसा कमी होणार आहे. शुक्रवारी अमरावती, वाशीम व बुलढाणा या जिल्ह्यांना यलो अलर्ट आहे. इतर जिल्ह्यांना कोणताही अलर्ट नाही. तसेच गणेश विसर्जन अर्थात शनिवारी कोणत्याच जिल्ह्यांना कसलाही अलर्ट घोषित करण्यात आलेले नाही. त्यामुळे गणेश विसर्जनापर्यंत पाऊस कमी होण्याची किंवा थांबण्याचीही शक्यता आहे.श्री गणरायाची भव्य आणि सुरेख मूर्ती आणि त्यासमोर हनुमान आणि गरुडदेवाची मूर्ती. श्री गणेशाचं हे स्वरुप चांदूरबाजार बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे सध्या मध्य भारतात पर्जन्यमानासाठी चांगली स्थिती

## गणपती विसर्जनावर पावसाचे सावट?

तयार झाली आहे. मंगळवारी विदर्भात सर्वत्र चांगल्या पावसाची नोंद करण्यात आली. मंगळवारी नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला होता. त्यानुसार सोमवारी मध्यरात्रीनंतर चांगल्या पावसाला सुरुवात झाली. यात मंगळवारी सकाळी ८.३० पर्यंत चंद्रपुरात सर्वाधिक ११५ मिमी त्या खालोखाल ब्रह्मपुरी येथे ८१ मिमी तर भंडाऱ्यात ६८ मिमी आणि वाशीममध्ये ६६.६ मिमी पावसाची नोंद करण्यात आली. याखेरीज नागपुरात ३०.८ मिमी पाऊस झाला. त्यानंतर मंगळवारी दिवसभरही पावसाच्या हलक्या सरींची हजेरी होती.दोन आठवड्यांपूर्वीपर्यंत विदर्भातील काही जिल्ह्यांमधील पर्जन्यमानाची स्थिती चिंताजनक होती. मात्र, अलीकडेच झालेल्या पावसामुळे ती सुधारली आहे. केवळ अकोला (१९ टक्के तूट) वगळता इतर सर्वच जिल्ह्यांमधील पर्जन्यमानाची स्थिती समाधानकारक आहे.



त्यातच आता सप्टेंबर महिन्यात विदर्भात चांगल्या पावसाची अपेक्षा आहे. त्यामुळे अकोल्यातीलही तूट भरून निघण्याची आशा व्यक्त केली जाते आहे. यंदा पावसाळ्याच्या सुरुवातीच्या काळात विदर्भात समाधानकारक पाऊस झाला. मात्र, त्यानंतर पर्जन्यमान घटले. त्यानंतर परत एकदा पावसाने जोर पकडला. त्यामुळे आता पर्जन्यमानाची स्थिती समाधानकारक आहे. दोन आठवड्यांपूर्वी पर्यंत अमरावती (३१ टक्के तूट), अकोला (२८ टक्के तूट) आणि वाशीम (२१ टक्के तूट) या जिल्ह्यांतील तूट चिंताजनक होती. याखेरीज इतर सर्वच जिल्ह्यांमध्ये सरासरीच्या आसपास पाऊस झाला होता. मात्र, गेल्या पंधरा दिवसांत झालेल्या पावसामुळे आता केवळ अकोला येथील (१९ टक्के) तूट काहीशी चिंताजनक आहे. सध्या अमरावती जिल्ह्यात १६ टक्यांची तूट असून वाशीम जिल्ह्यात तर २ टक्के अतिरिक्त पर्जन्यमान नोंदविण्यात आले आहे. आतापर्यंत गडचिरोली येथे सर्वाधिक १६ टक्के अतिरिक्त पाऊस झाला असून त्याखा लोखाल वर्धा येथे १० टक्के तर नागपूर व यवतमाळ येथे प्रत्येकी तीन व सहा टक्के अतिरिक्त पर्जन्यमानाची नोंद झाली आहे.

## संक्षिप्त

### विद्यापीठातील विद्यार्थीनींचे सेट परीक्षेत यश

**अमरावती -** महाराष्ट्र स्टेट एलिजिबिलिटी टेस्ट एम-सेट परीक्षेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील गृह विज्ञान विभागाच्या माजी विद्यार्थीनी डॉ. रविशा आंबेकर व सीमा कदम यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे.डॉ. रविशा आंबेकर यांनी एम.एस.सी (गृहविज्ञान) कम्युनिकेशन अँड एक्सटेंशन यात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. तसेच सहाय्यक प्राध्यापक पदासाठीची पात्रता परीक्षा नेट देखील उत्तीर्ण केली आहे. पदव्युत्तर पदवी परीक्षेत प्रथम मेरिट असून त्यांनी आचार्य पदवी प्राप्त केली आहे. सद्यस्थितीत त्या शासकीय ज्ञान-विज्ञान संस्थेत तासिका तत्त्वावर शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. सीमा कदम एम.एस.सी ( गृहविज्ञान) फुड सायन्स अँड न्युट्रिशन विषयात पदव्युत्तर पदवीप्राप्त असून सद्यस्थितीत त्या एनआरसी, रूरल हॉस्पिटल मोखाडा, पालघर येथे आहारतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत.या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विभाग प्रमख डॉ. वैशाली धनविजय, डॉ. संयोगीता देशमुख, सुमित गेडाम, शिल्पा इंगोले, दिपाली भैसे, दिव्यानी नवले, आयतल कामदार, सुमेध वडुरकर, अनुश्री आडे, ए. डी. हिरे,इंगळे यांनी अभिनंदन केले आहे.

### ज्येष्ठ कलाकार मानधन निवड समितीवर प्रमोद पोकळे



**अमरावती -** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई द्वारा राबविण्यात येत असलेल्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेच्या जिल्हा निवड समितीवर अशासकीय सदस्य म्हणून जिल्ह्यातील दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवड समितीत पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी बडनेरा येथील श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे जीवन-प्रचारक प्रमोद पोकळे गुरुजी यांची निवड केली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### आज तालुकास्तरीय कार्यशाळा

**मोर्शी -** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने ६ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयानुसार राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्याबाबत निर्णय घेतला आहे.सदर अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या विविध विभागाच्या योजना मोहीम स्वरूपात राबविणे, जागतिक शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी ग्रामीण भागात चळवळ निर्माण करणे, ग्रामीण भागाचा शाश्वत विकास करणे व यासाठी ग्रामपंचायत मध्ये स्पर्धा निर्माण करून पंचायतराज संस्था अधिक गतिमान करणे हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे. सदर अभियानाचा १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर असा कालबद्ध कार्यक्रम दिलेला आहे. या अभियानाच्या व्यापक प्रचार प्रसिद्धीकरिता पंचायत समिती मोर्शी च्या वतीने तालुक्यातील सर्व सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत अधिकारी ग्रामरोजगार सेवक आणि केंद्र चालक यांची ४ सप्टेंबर २०२५ रोजी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. सदर कार्यशाळेला तालुक्यातील सर्व विभाग प्रमुख यामध्ये माननीय उपविभागीय अधिकारी, गट विकास अधिकारी,तहसीलदार,तालुका कृषी अधिकारी, पशुधन विकास अधिकारी,तालुका आरोग्य अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी आणि माननीय गटशिक्षणाधिकारी हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

### छायाचित्रकारांसाठी महापालिकेची फोटोग्राफी स्पर्धा

**अमरावती -** अमरावती महानगरपालिका व विधिमंत्र संस्थेच्या संयुक्त विद्यमाने अमरावती फोटोग्राफी स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत शहरातील तसेच परिसरातील सर्व छायाचित्रकारांना आपले कलागुण सादर करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.अमरावतीचे सांस्कृतिक, नैसर्गिक व शहरी सौंदर्य छायाचित्रणाच्या माध्यमातून प्रदर्शित करणे, हा या स्पर्धेचा उद्देश आहे. स्पर्धेसाठी गणेश उत्सवातील अमरावती, अमरावतीचे शहरी व सांस्कृतिक सौंदर्य व अमरावती परिसरातील निसर्ग व वन्यजीव, या विषयांवर आधारित छायाचित्रे स्वीकारली जाणार आहेत. विजेत्यांना आकर्षक बक्षिसे व सन्मानचिन्ह देण्यात येणार असून निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन अमरावती महानगरपालिका यांच्यावतीने संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात येणार आहे.

ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असून सहभागासाठी छायाचित्रांची जेपीजी सॉफ्टकॉपी amc. pro 1959 @ gmail. com या ई-मेलवर २१ सप्टेंबर पर्यंत पाठवणे आवश्यक आहे.

### रविवारी चंद्रग्रहण

**अमरावती -** चंद्र पृथ्वीभोवती आणि पृथ्वी सूर्याभोवती फिरताना जेव्हा एका रेषेत येतात, तेव्हा निसर्गातील सावल्यांचा खेळ अर्थात ग्रहण स्थिती निर्माण होते. ही स्थिती ७ सप्टेंबर रोजी निर्माण होणार असून चंद्र सुमारे साडेतीन तास पृथ्वीच्या छायेत राहणार आहे. त्यामुळे खगोलप्रेमींना चंद्रग्रहणाचा आनंद घेता येणार आहे.

यापैकी फक्त एकच ग्रहण आपल्या भागात मात्र रविवारी खंडग्रास चंद्रग्रहण बघता येईल. या आधीचे १४ व २९ मार्चला झालेले चंद्र-सूर्य ग्रहण, तसेच येणाऱ्या अमावस्येला होणारे सूर्यग्रहण आपल्या भागात बघता येणार नाही.भाद्रपद शुध्द पौर्णिमेला रात्री ९.५७ वाजता आपल्या डाव्या बाजूकडून चंद्रबिंब पृथ्वीच्या सावलीत येताना ग्रहण आरंभ होईल.

# जिल्ह्यातील १० नगर पालिका आणि २ नगर पंचायतींच्या प्रभाग रचनेवर ५२ आक्षेप

**दोन नगर पालिका क्षेत्रातून एकही आक्षेप नाही, सर्वांचे लक्ष सुनावणीकडे आहे**

**सुनावणीकरीता आज शेवटचा दिवस**

**२६ ते ३० सप्टेंबर दरम्यान अंतिम प्रभाग रचनेची घोषणा**

**अमरावती/का.प्र.**

निर्धारित वेळेपर्यंत म्हणजेच ३१ ऑगस्टपर्यंत एकूण ५२ आक्षेप आणि हरकती नोंदवण्यात आल्या आहेत, अमरावती जिल्ह्यातील १० नगर परिषदांच्या प्रभाग रचनेवर ४४ आणि दोन नगर पंचायतींच्या प्रभाग रचनेवर ८ आक्षेप नोंदवण्यात आले आहेत. त्यामुळे सुनावणीनंतर प्रस्तावित प्रभाग रचनेत कोणते बदल केले जातात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्ह्यातील विविध नगरपालिका आणि नगर पंचायत क्षेत्रांच्या प्रभाग रचनेबाबत आजपासून सुरू झालेली हरकती आणि आक्षेपांवरची सुनावणी ४ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार असल्याचे कळले आहे.

आवश्यक त्या सुधारणा आणि सुधारणांसह प्रभाग रचनेचा प्रस्ताव संबंधित मुख्य अधिकाऱ्यांमार्फत नगरविकास विभागाकडे सादर केला जाईल आणि नगरविकास विभाग तो राज्य निवडणूक आयोगासमोर सादर करेल. त्यानंतर, आयोगाने मंजुरी दिल्यानंतर, अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना संबंधित मुख्याधिकाऱ्यांकडून २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान प्रकाशित केली जाईल. ङ

अंजनगाव सुर्जीमधून जास्तीत जास्त १२ हरकती - चिखलदरा आणि शेणघाट नगर पालिका क्षेत्रातून एकही हरकत नाही जिल्हा नगर परिषद प्रशासनाला मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील विविध नगरपालिका आणि नगर पंचायत क्षेत्रांमधून प्राप्त झालेल्या ५२ हरकती आणि आक्षेपांपैकी अंजनगाव सुर्जी नगर पालिकेच्या प्रभाग रचनेबाबत सर्वाधिक १२ हरकती प्राप्त झाल्या आहेत. तर वरुडमधून ४, मोर्शीमधून ६, अचलपूरमधून ८, चांदूर रेल्वेमधून ३, दर्यापूरमधून ९ आणि धामणगाव रेल्वे आणि चांदूर बाजारमधून प्रत्येकी १ आक्षेप प्राप्त झाला आहे. तर चिखलदरा आणि शेंदुरजना घाट नगरपालिकेच्या विभाग रचनेबाबत एकही आक्षेप प्राप्त झाला नाही.

याशिवाय नांदगाव खंडेश्वर आणि धारणी नगरपंचायतीच्या विभाग रचनेबाबत प्रत्येकी ४ आक्षेप प्राप्त झाले आहेत. तुम्हाला सांगतो की, तिवसा आणि भातकुली नगरपंचायत वगळता जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वायत्त संस्थांमध्ये प्रभाग रचनेचे काम सुरू आहे. यासोबतच, निवडणुकांबाबत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बराच गोंधळ सुरू आहे.

# पोस्टाची 'नोंदणीकृत' सेवा आता 'स्पीड' मध्ये

## पुढील महिन्यापासून लागू होईल

**अमरावती/का.प्र.**

काळाच्या ओघात सातत्यपूर्ण सेवा देणाऱ्या टपाल विभागाच्या नोंदणीकृत पोस्ट सेवेने बऱ्याच काळापासून ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. परंतु आता ही सेवा स्पीड पोस्टमध्ये विलीन होणार आहे. त्याबाबत भारतीय टपाल विभागानेही अधिकृत घोषणा केली आहे.१ ऑक्टोबरपासून ही सेवा अमलात येणार आहे.

माहितीनुसार, नोंदणीकृत पोस्ट सेवेचे स्पीड पोस्ट सेवेमध्ये विलीनीकरण करण्यापूर्वी, टपाल विभागाने सरकारच्या विविध विभागांसह, सरकारी आणि निमसरकारी आस्थापना आणि न्यायालयांसह सर्व संबंधित संस्थांना त्यांची सेवा नोंदणीकृत पोस्टवरून स्पीड पोस्टमध्ये हस्तांतरित करण्याच्या सूचना जारी केल्या आहेत. टपाल वितरणाच्या बाबतीत, कुरिअरसारख्या समांतर सेवांच्या तुलनेत नोंदणीकृत टपाल सेवेचा खर्च खूपच कमी होता. त्या तुलनेत, स्पीड पोस्टचा खर्च २० टक्क्यांहून अधिक आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून नागरिक, व्यापारी, शेतकरी आणि इतर आस्थापना नोंदणीकृत टपाल सेवेचे लाभार्थी होते. परंतु गेल्या काही वर्षांत, आधुनिक संप्रेषण माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे, नोंदणीकृत टपाल सेवेचा वापर मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. ज्यामुळे टपाल विभागाने ही सेवा विलीन करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. असेही सांगण्यात आले आहे की, वरिष्ठ स्तरावरून मिळालेल्या सूचनांच्या आधारे, हा निर्णय १ ऑक्टोबरपासून लागू केला जाईल.

टपाल विभागाच्या नोंदणीकृत सेवेची किंमत देशातील कोट्यवधी ग्राहकांशी जोडली गेली. नोंदणीकृत टपालाद्वारे तरुणांना मिळालेल्या नोकरीच्या ऑर्डरपासून ते व्यवसाय आणि उद्योग क्षेत्रातील व्यवहारांच्या पावत्या, न्यायालयांनी जारी केलेल्या नोटिसा आणि महत्त्वाच्या पत्रव्यवहारापर्यंत अनेक व्यवहार नोंदणीकृत टपालाद्वारे केले जात होते. त्यामुळे तीन पिढ्यांपासून नोंदणीकृत टपाल सेवेचा ग्राहकांशी भावनिक संबंध होता. आता या सेवेऐवजी, टपाल विभागाने स्पीड पोस्ट सेवेला पर्यायी पर्याय उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे ग्राहकांची गैरसोय काही प्रमाणात टळेल, परंतु स्पीड पोस्टच्या जास्त दरांमुळे ग्राहकांना पूर्वीपेक्षा जास्त पैसे द्यावे लागतील.

# राष्ट्रमाता जिजाऊ अर्बन को ऑप.क्रे. सोसायटीचा उद्‌घाटन सोहळा

## प्रथम दिवशीच ११लाखाची ठेवी

**अमरावती/का.प्र.**

मराठा सेवा संघाच्या स्थापना दिनाच्या औचित्यावर राष्ट्रमाता जिजाऊ अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लि.अमरावती, म. न .पा.शाळा क्र.१९ जवळ , रुक्मिणी नगर, अमरावतीचा उद्घाटन समारंभ सोहळा मान्यवरांच्या हस्ते पार पडला.



पहिल्याच दिवशी अकरा लाख रुपयाची ठेवी, २६१२ सभासदांकडून ४५ लाख रुपये जमा झाले असून ग्रामीण भागात बँकेचे विस्तार वाढवणार आहे.शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर यांच्या स्वप्नातील पंचसूत्री प्रत्यक्षात अंमलात आणणार असून ४५कोटी रुपयांची तरतूद येणारा दिवसात पूर्ण होईल, असा मानस संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष खा. बळवंत वानखडे,उद्घाटक म्हणून आमदार सुलभा खोडके,तर विशेष उपस्थिती वरिष्ठ सभागृहाचे आमदार संजय खोडके,राज्य माहिती आयुक्त रवींद्र ठाकरे अरविंद गावंडे ,प्रदेश उपाध्यक्ष मराठा सेवा संघ,मधुकर मेहेकरे, अध्यक्ष , जिजाऊ सृष्टी, सिंदखेड राजा, सुरेंद्र आडे,जिल्हाध्यक्ष,मराठा सेवा संघ, सीमा बोके,प्रदेशाध्यक्ष, जिजाऊ ब्रिगेड,अश्विन चौधरी ,अध्यक्ष, राष्ट्रमाता जिजाऊ अर्बन,प्रफुल्ल गुडघे,उपाध्यक्ष राष्ट्रमाता जिजाऊ अर्बन,तसेच सर्व संचालक व गणमान्य सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शिवमती सीमा देशमुख, संचालक यांनी तर आभार प्रदर्शन प्रकाश राऊत,संचालक यांनी मानले.कार्यक्रमाला जिल्ह्यातील गणमान्य नागरिक समाज बांधवांनी आपली उपस्थिती दर्शविली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, मराठा उद्योजक कक्ष,तसेच अमरावती जिल्ह्यातील सर्व समकक्ष संघटनेच्या पदाधिकाऱ्याने अथक प्रयत्न केले.

# आंतरराष्ट्रीय नवसाक्षरता सप्ताह

**अमरावती** -नवसाक्षरता सप्ताहनिमित्त सालनापूर येथे आंतरराष्ट्रीय नवसाक्षरता सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. या आठवड्यात साक्षरतेचे महत्त्व पटवून देणे, निरक्षरता निर्मूलनासाठी जनजागृती करणे तसेच समाजातील सर्व घटकांना साक्षरतेच्या प्रवाहात आणणे या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.ग्रामपंचायत सावळा सालनापूर येथील सरपंच यानी साक्षरतेचे सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनातील महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी व स्वयंसेवकांनी गावातील रस्त्यांवर घोषवाक्ये देत रॅली काढून साक्षरतेचा संदेश दिला.शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, आणि घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन गावातील निरक्षर प्रौढ व्यक्तींना अक्षर ओळख करून देण्यासाठी विशेष सत्र आयोजित करण्यात आले असून साक्षर व्यक्तींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.शाळा व सार्वजनिक ठिकाणी भिंतपत्रिका, पुस्तके व माहितीपर फलकांचे प्रदर्शन लावण्यात आले.सप्ताहामुळे गावातील नागरिकांमध्ये साक्षरतेबद्दल जागृती निर्माण झाली. निरक्षरांनी शिकण्याची तयारी तर शालेय मुलांमध्ये ज्ञानार्जनाबद्दल अभिमान व उत्साह निर्माण झाला.आंतरराष्ट्रीय नवसाक्षरता सप्ताहामुळे सालनापूर गावात साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित झाले. समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा संदेश या उपक्रमांतून प्रभावीपणे पोहोचला.

या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी पिंटूभाऊ दरवळकरगजानन ठाकरे सचिन चौधरी, अनिल डोंगरे,वासूदेव सहारे तसेच प्रियंका खरकाटे, सुरज ठाकरे सहभाग नोंदविला.

# शहरात वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर

**अमरावती/का.प्र.**

रेल्वे पुलावरील वाहतूक बंद असल्याने अमरावतीतील शहरात वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या सणासुदीच्या काळात वाहतूक कोंडीच्या समस्येचा सामना करावा लागत आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. कार्यालयीन वेळेत वाहतूक कोंडीसारखी परिस्थिती निर्माण होते. सकाळी कार्यालयात जाणाऱ्या लोकांची गर्दी आणि संध्याकाळी घरी परतणाऱ्या लोकांची गर्दी यामुळे संध्याकाळी इर्विन चौकातून जयस्तंभ चौकात पोहोचण्यासाठी १.५ ते २ तास लागतात. या काळात वाहने हलत नाहीत, उलट ती अधूनमधून रेंगाळताना दिसतात. राजकमल रेल्वे पुलावरील वाहतूक बंद करण्याच्या दुसऱ्या दिवसापासून, राजकमल चौकातून रेल्वे स्टेशन, बस स्थानक, बस स्टँड, जिल्हाधिकारी कार्यालय आणि कॅम्पकडे जाणारे आणि या दिशेने येणारे लोक इर्विन चौकात जमतात. यामुळे इर्विन चौकात वाहनांमध्ये एकमेकांना ओव्हरटेक करण्यासाठी शर्यत सुरू होते आणि वाहतूक कोंडी होते. या काळात, या चौकात थोडा वेळ जरी वाहतूक विस्कळीत झाली तर वाहतुकीची स्थिती इतकी बिकट होते की ती सामान्य होण्यास तासन्तास लागतात.



रेल्वे स्टेशनहून गाडगे नगरकडे जाणाऱ्या वाहनचालकांची अवस्था आणखी बिकट होते. त्यांना प्रथम माचुरीजवळून डावे वळण घेऊन मालवीय चौकात जावे लागते आणि तेथून यू-टर्न घेऊन इर्विनकडे परत यावे लागते. यामुळे नागरिकांना सुमारे दीड तास लागतो. कारण इर्विन चौकातून डावे वळण घेऊन पंचवटी चौकाकडे जाणाऱ्यांनाही गर्दीमुळे उभे राहावे लागते.काही वर्षांपूर्वी डॉ. पंजाबराव देशमुख बँकेसमोरील दुभाजक बंद असल्याने लोकांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. सध्या या वाहतूक कोंडीतून अमरावतीवासीयांना कोणतीही सुटका होताना दिसत नाही.

**नवरात्रीत वाहतूक कोंडीची गंभीर होणार**

गणेशोत्सवादरम्यान वाहतुकीची स्थिती पाहता, नवरात्रीत या ठिकाणची वाहतूक देवाच्या दयेवर असेल असे म्हणायला हरकत नाही. कारण या काळात अंबादेवी मंदिरात नवरात्रीच्या मेळ्यामुळे जिल्ह्यातीलच नव्हे तर अनेक जिल्ह्यांतील लोक अमरावतीला येत राहतात. पूर्वी लोक बसस्थानकावर उतरत असत आणि तेथून राजकमल रेल्वे पुलावरून थेट अंबादेवी मंदिरात जात असत. पण आता त्यांना इर्विन चौक, मालवीय चौक, जयस्तंभ चौक मार्गे राजकमल चौक गाठावे लागेल. यामुळे या मार्गावरील वाहतूक देवाच्या दयेवर असेल.

**मालवीय चौक अतिक्रमणमुक्त**

दरम्यान, अतिक्रमणे आणि पार्क केलेली वाहने हटवण्यात आली आहेत आणि मालवीय चौक स्वच्छ दिसत आहे. इर्विन चौकात अजूनही अतिक्रमणे आहेत. त्यामुळे वाहतुकीलाही त्रास होत आहे.

# श्री गणेश उत्सवामुळे आरक्षण जाणार, केवळ अफवा!

विविधतेने नटलेला आपला हिंदू समाज उत्सवप्रिय समाज म्हणून जगात ओळखला जातो. देशात जेव्हा जेव्हा हिंदू सणउत्सव सुरू होतात तेव्हा तेव्हा देशातील तमाम सेक्युलर पोंगापंडीत आणि स्वयंघोषित विचारजंताच्या टोळ्या हिंदू समाजात संभ्रम निर्माण करण्यासाठी कार्यरत असतात. या कारस्थानी टोळ्या हिंदू सणउत्सवा मध्ये वेगवेगळे प्रयोग करून हिंदू समाजाला पर्यावरण पासून प्रदूषणच्या गोंडस नावाखाली संभ्रमित करतात तसेच याच काळात 'आम्ही हिंदू नाही आमचा स्वतंत्र धर्म आहे' अशी पोपटपंची करून हिंदू समाजा मध्ये फोडफाडी पासून बाटवाबाटवी करण्याचा प्रयत्न सुद्धा करतात. त्यासाठी सर्व प्रकारची इको सिस्टिम वापरली जाते.टेलिकास्ट आणि प्रिंट मीडियामध्ये बसलेल्या डाव्या चळवळीचे म्होरके मिडियाचा वापर करून आपल्या इकोसिस्टम द्वारे हिंदू समाजाची धर्मावरील श्रद्धा कमी संभ्रम निर्माण करतात.आता याच टोळ्यांनी हिंदूसमाजाचा अविभाज्य घटक असलेला आणि देश, देव,धर्मा सदैव लढणाऱ्या आदिवासी समाजा मध्ये श्री गणेशउत्सव साजरा केल्यास आरक्षण जाईल. घरामध्ये श्री गणेश मूर्ती दिसल्यास आरक्षण मिळणार नाही अशी खोटी अफवा पसरवून भीतीचे वातावरण तयार केले आहे.

आरक्षण जाण्याच्या भीतीपोटी अनेक गावांत अनेक आदिवासी बांधवांनी अनंत चतुर्थीची वाट न पाहता घाई घाईने श्री गणेश विसर्जन केले आहे.तसेच काही आदिवासी बांधवांनी भीतीपोटी अक्षरशः देवघरातील श्री गणपतीचे विसर्जन करून आपल्या घरातले देव सुद्धा बांधून ठेवले.वास्तविक पाहता भारतीय राज्य घटनेने कलम २५ नुसार प्रत्येक व्यक्तीला उपासना करण्याचे स्वातंत्र संविधानाने दिले असल्याने श्री गणेश उत्सव साजरा केल्याने आरक्षण कसे समाप्त होईल? या वर्षी महाराष्ट्र सरकारने श्री गणेशउत्सवास राज्य महोत्सव गौरविले आहे.त्यामुळे दुर्गम भागात अफवा पसरविणे हा कायदेशीर गुन्हा असून आरक्षण जाईल अशी अफवा पसरविणाऱ्या विरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ५०५ नुसार कारवाई करण्यात आली पाहिजे. आदिवासी बांधवांमध्ये खोट्या अफवा पसरविण्यासाठी कोणते हात आहेत किंवा कोणाचा मेंदू कार्यरत आहे ? याचा शोध घेऊन शासन प्रशासना कडून कठोर कारवाई झाली पाहिजे

विदर्भातील अकोला, बुलढाणा, यवतमाळ जिल्ह्यासह



अनेक ठिकाणी जुन्या वर्तमान पत्रातील कात्रण मा.न्यायालयाचा हवाला देत एक खोटा मेसेज दुर्गम भागातील आदिवासी बंधु मध्ये मोठ्या प्रमाणात फिरला नव्हे जाणीवपूर्वक फिरविला गेला आहे.सप्टेंबर महिन्यात आदिवासी संशोधन संस्था वतीने आदिवासी जमातीचा सर्वे होणार आहे. आदिवासी बंधूंची संस्कृती तपासण्यासाठी संस्था आपल्या भागात दाखल होईल.तेव्हा आपल्या घरात श्री गणेश उत्सव दिसू नये किंवा श्री गणेश उत्सव साजरा करू नये.तसेच हिंदू देव देवता आपल्या घरात दिसू नये अन्यथा आपले आरक्षण पूर्णपणे बंद करण्यात येईल अशी खोटी अफवा दुर्गम भागातील आदिवासी बंधू मध्ये पेरली गेली.त्यामुळे दुर्गम भागातील अनेक गांवात आदिवासी बंधूंनी श्री गणेश विसर्जन केले आहे.सोबत घरातील देव सुद्धा लपवून ठेवले आहेत. सदर खोट्या अफवेचा विचार केल्यास असे लक्षात येते की आदिवासी बंधूंना हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृती परंपरा पासून दूर करण्यासाठी रचले गेलेले खोटे षड्यंत्र आहे. या षड्यंत्र मागे हिंदू विरोधी मोठ्या अदृष्य शक्ती कार्यरत असल्याचे लक्षात येते तसेच येणाऱ्या काळात नवरात्र उत्सव येणार आहे त्यामुळे आदिवासी बांधवांनी नवरात्र उत्सव मध्ये आपल्या घरात देवी भगवतीची घटस्थापना करून देवीची उपासना करू नये असे षड्यंत्र रचले जात आहे.

भगवान बिरसा मुंडापासून तंटया मामा भील यांची मोठी आदर्श परंपरा लाभली आहे.आदिवासी निसर्ग पूजक आहेच पण त्या सोबत खंडोबा ते देवी काळूआईचा सुद्धा पूजक आहे.अनेक आदिवासी घराणे खंडोबा व देवी काळूआई यांच्या चरणी नवस करीत असतात.एकूणच आदिवासी बंधूं कट्टर हिंदू धर्म प्रेमी आहे.त्यामुळे मोठ्या समाजाला हिंदू धर्मा पासून तोडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर षड्यंत्र सुरू असून त्यामध्ये परकीय शक्ती सुध्दा कार्यरत आहेत.श्री गणेश उत्सव काळात उपरोक्त प्रमाणे फिरत असलेला मेसेज षड्यंत्रचा भाग असून आदिवासी बंधूंनी घाबरून जाण्याचे काहीच कारण नाही.भारतीय संविधानाने राज्यघटनेच्या कलम २५ नुसार प्रत्येक व्यक्तीला उपासना पद्धतीचे संपूर्ण स्वातंत्र दिलेल असून आदिवासी बंधूंनी आपले सर्व सण उत्सव साजरे करावे.श्री गणेश उत्सव आणि येणाऱ्या काळात देवीची उपासना सुद्धा करावी.त्यामुळे एखाद्या देवाची उपासना केल्याने घटनादत्त आरक्षण कसे समाप्त होईल? याचा विचार करावा.देशातील कोणतीही शक्ती संविधानाने आदिवासी बंधूंना दिलेल आरक्षण बंद करू शकत नाही.हे त्रिवार सूर्य प्रकाशाएवढे सत्य असून त्याचा विचार आदिवासी बंधुंनी करावा.तसेच सण उत्सव काळात चुकीच्या अफवा पसरवून संभ्रम निर्माण करणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई व्हावी.आदिवासी बंधूंनी महाराष्ट्र शासना कडे भारतीय दंड संहिता ५०५ नुसार दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली पाहिजेत.

**अशोक राणे**
अकोला,
.९४२४६५८३८५

# प्रज्ञाचक्षु तत्वज्ञ संत गुलाबराव महाराज

महाराष्ट्राच्या थोर संत परंपरेतील अलीकडच्या काळातील ज्ञानेशकन्या म्हणून संत ज्ञानेश्वरांच्या तत्व चिंतनाला जीवन समर्पित करणारे संत गुलाबराव महाराज होय. त्यांचा जन्म सन१८८१ला आजोळघरी लोणी टाकळी,जि. अमरावती येथे गोंडूजी आणि आलोकाबाई मोहोड या दांपत्याच्या पोटी झाला. वयाच्या नवव्या महिन्यातच त्यांच्या डोळ्याला जंतूसंसर्ग झाल्यामुळे अंधत्व आले. संत भूतलावर जन्म घेतात ते जीवांच्या कल्याणासाठी, त्यांना लाभलेले आयुष्य जरी कमी असले तरी समाजाप्रतीचे योगदान अफाट व अतुलनिय असते. संतांचा जीवनक्रम आणि कार्याची भिन्नभिन्न वैशिष्ट्ये असतात.

संत गुलाबराव महाराजांना 'ज्ञानेशकन्या' आणि 'प्रज्ञाचक्षु' या संबोधनाने ओळखल्या जातात. श्रीकृष्णाच्या प्रेमात रममान झालेले व संत ज्ञानेश्वरांच्या वांग्मयावर अफाट प्रेम करणारे गुलाबराव महाराज स्वतःला ज्ञानेशकन्या मानतात.तर दुसरे प्रज्ञाचक्षु म्हणजे अशी व्यक्ती जी जन्मानांतर आंधळी झालेली असली तरी बुद्धीच्या आणि बुद्धिमत्तेच्या बळावर सर्व गोष्टींचे मर्म जाणतो अशांना प्रज्ञाचक्षु म्हणतात. हाच स्वरूपधर्म संत गुलाबराव महाराजांच्या बाबतीत तंतोतंत लागू होते.



संत गुलाबराव महाराजांचा जीवनपट बघता अतिशय प्रतिकुल परिस्थितला आहे. नऊ महिन्याचे असताना त्यांच्या डोळ्याला जंतू संसर्ग झाल्यामुळे त्यांना कायमचे अंधत्व आले. वयाच्या चौथ्या वर्षी आई वारली. पुढे लोणी टाकळीहून माधान येथे आले.त्यांच्यात थोर प्रज्ञाशक्ती त्यांच्या प्रगट झाली. त्या बळावरच पुरातन ग्रंथांचे आकलन ते सहज करीत गेले. मनकर्णिका सोबत विवाह झाला. लक्ष्मण भटांकडून संस्कृत ग्रंथ ऐकून पाठांतर केले. त्यांनी आकलन, शब्द रूपावली, लघु व्याकरण ही ग्रंथे मुखद्गत करून त्यांनी संस्कृत भाषेतही प्रवेश मिळविला. इतर धर्मांचे ग्रंथांचे श्रवण त्यांनी केले. अल्पावधीत संस्कृत पंडित झाले.जन्मतःअंध असताना; कुठलेही शिक्षण नसताना श्रवण पाठांतराच्या बळावर विपुल ग्रंथ लेखन इतरांकरवी करून घेतले, हे मोठे विलक्षण वाटते.

मराठी, हिंदी, संस्कृत भाषेवर त्यांचे कमालीचे प्रभुत्व होते. गुलाबराव महाराजांनी काव्यशास्त्र, आयुर्वेद, संगितासह अनेक भाषेसोबतच बोली भाषेत अनेक विषयांवर विपुल लेखन केले आहे. सूत्रग्रंथ, भाष्य, प्रकरण, आत्मचरित्र,आख्यान, नाटक, लोकगीते, स्तोत्र, व्याकरण,कोश, आदी वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळले.सहस्त्र ओव्या, श्लोकांची निर्मिती त्यांनी केली. अलौकिक व्याख्याने..धर्म समन्वय... प्रेम निकुंज.. योग प्रभाव.. साधूबोध ही त्यांची प्रचलित पुस्तके होय. महाराजांच्या ग्रंथसंपदेचे जतन करण्याचे कष्ट डॉ. राम पंडितांनी केले होते.

एकही वर्ग शाळा न शिकलेले संत गुलाबराव महाराज एका विलक्षण बुद्धीच्या बळावर अलीकडच्या शास्त्रज्ञांच्या सिद्धांतावर त्यांनी अभ्यास केला. त्यामध्ये डार्विनचा उत्क्रांतीवाद,आईन्स्टाईनचा अणुसिद्धांत, जगदीशचंद्र बोस यांचे वनस्पतीशास्त्र या सर्वांचा सखोल अभ्यास करून सटीक लेखन करून ठेवले.संत गुलाबराव महाराजांचे कार्य ज्ञान, विज्ञान, धर्म,संस्कृती एवढ्या पुरतेच मर्यादित नसून त्यांनी साधुबोध या ग्रंथातून मानवी जीवनाचा उद्धार कसा होईल याचे विवेचन सुद्धा केले आहे. प्रपंच आणि परमार्थ या दोन्हीची सांगड घालून जीवन कसे जगावे? याचे अनमोल मार्गदर्शन लाभलेले आहे. पावसाच्या पाण्यावर जो शेतकरी अवलंबून राहील त्याची पूर्णतः प्रगती आयुष्यात कधी होणार नाही.पाण्याचा अभाव असताना त्याला तांत्रिक पद्धतीने पाण्याच्या शेतीसाठी उपयोग करून घेता येईल, तोच शेतकरी विकासाच्या वाटेने मार्गस्थ होईल. असे ते स्पष्टपणे मांडतात.

वेदांतकेसरी बाबाजी महाराज पंडित या शिष्यावर त्यांचे प्रचंड प्रेम होते.त्यांनी महाराजांची ग्रंथसंपदा जतन केली. त्यांचा ग्रंथसंग्रह आजही अमरावतीच्या परकोटीच्या आत दहिसाथीत असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिरात सुरक्षितपणे जपून ठेवल्याचे सांगितले जाते. संत ज्ञानेश्वर महाराजांचा फेटा घातलेले पहिले तैलचित्र अकोल्याच्या चित्रकारांकडून गुलाबराव महाराजांनी करून घेतले होते. ते तैलचित्र आजही आळंदीच्या संजीवन समाधी मंदिराच्या गाभाऱ्यात दर्शनी भागावर आहे. हे महाराष्ट्रासाठी सर्वात मोठी देणगी आहे. असा हा तत्वज्ञानी समाजाला तत्त्वचिंतनाचे दान सपूर्द करून वयाच्या चौत्तीसाव्या वर्षी जगाचा निरोप घेतला. आज भाद्रपद शुक्ल द्वादशी पुण्यस्मरण दिनाच्या प्रसंगी महात्म्याला शब्दसुमनें समर्पित करुया..!

**शशिकांत म. तोटे**
दारव्हा, जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८
इ-मेल :shashikanttote1979@gmail.com



# करजगावमधील चिंचोक्याच्या मुर्तीला ८६ वर्षांची परंपरा

श्री गणरायाची भव्य आणि सुरेख मूर्ती आणि त्यासमोर हनुमान आणि गरुडदेवाची मूर्ती. श्री गणेशाचे हे स्वरुप चांदूरबाजार तालुक्यातल्या शिरजगाव आणि करजगाव या दोन्ही गावात पाहायला मिळते. विशेष म्हणजे या दोन्ही मूर्ती चिंचोक्यांनी बनवल्या आहेत. गत ८६ वर्षांपासून गणेशोत्सवात या मूर्तीची मिरवणूक काढली जाते. 'नवसाला पावणारे मनाचे गणपती' अशी मान्यता या गणरायाला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात, शिरजगाव येथील मूर्तिकार गंगाराम वांगे यांनी १५ सप्टेंबर १९३९रोजी गणपतींसह हनुमान आणि गरुडदेवाची अतिशय देखणी मूर्ती साकारली. ही मूर्ती शिरजगाव येथील श्री राम मंदिरात स्थापन करण्यात आली. लगतच्या करजगाव येथील रजनी खेरडे या शिरजगाव ला बहिणी कडे आल्या असता, त्यांच्या नजरेत ही मूर्ती भरली. त्यांनी अशीच मूर्ती स्वतःसाठी बनवून मागितली. गंगाराम वांगे आणि त्यांचे शिष्य बळीराम कविटकर यांनी पुन्हा गणपती, हनुमान आणि गरुडदेवाची मूर्ती घडवली. ती मूर्ती रंजना खेरडे यांनी करजगावला नेली. सध्या ही मूर्ती करजगाव येथील श्री गजानन महाराज मंदिरात विराजमान आहे. गणेशोत्सवाच्या काळात या मूर्तीला गावाच्या चौकात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या कार्यक्रमांत स्थापन करून मिरवणूक काढली जाते.

मूर्ती कशी तयार केली- गणपती, हनुमान आणि गरुडदेव या तिन्ही मूर्ती चिंचोक्यांच्या मूर्ती म्हणून प्रसिद्ध आहेत. १९३९ मध्ये मूर्तिकार गंगाराम वांगे यांनी चिंचेमध्ये असणारे हजारो चिंचोके एकत्र केले. या चिंचोक्यांबरोबर कागदाचे तुकडेही एकत्र करून त्यांचा कुटून लगदा तयार केला गेला. या लगद्यात सरस, माती आणि ताग यांचा वापर करून मूर्तीचे विविध अवयव तयार करून एकत्र जोडण्यात आले. या मूर्ती वजनानं हलक्या असून सहजपणे मिरवणूक काढता येतात, अशी माहिती शिरजगाव येथील रहिवासी आणि मूर्तिकार अरुण गवळी यांनी दिली. अरुण गवळी म्हणाले की, अधूनमधून या मूर्तीची रंगरंगोटी करणे आणि कुठं काही भेगा पडल्यास त्यांची दुरुस्ती करण्याचे काम ते करत असतात.

**चिंचोक्यांचा गणपती-** अनंत चतुर्दशीच्या दिवशी निघते मिरवणूक: शिरजगाव येथील श्री राम मंदिर आणि करजगाव येथील श्री गजानन महाराज मंदिरा जवळील गणेशोत्सव मंडळातून अनंत चतुर्दशीच्या दिवशी भव्य मिरवणूक काढली जाते. मिरवणूक गावच्या वेशीपर्यंत जाते, जिथे नदीमध्ये उत्सवमूर्तीचे विसर्जन केले जाते. यानंतर, वाजत-गाजत चिंचोक्यां च्या या मूर्ती शिरजगावमधील श्री राम मंदिरात आणि करजगावमधील संत गजानन महाराज मंदिरात पुनःस्थापित केल्या जातात. चिंचोक्यांच्या या मूर्ती नवसाला पावतात, अशी श्रद्धा आणि विश्वास स्थानिक लोकांमध्ये आहे, असं शिरजगाव येथील सेवानिवृत्त शिक्षक पुंडलिक भुसारी यांनी सांगितले.

**दोन्ही मूर्तींमधला फरक-** शिरजगाव आणि करजगाव या दोन्ही ठिकाणी एकसारख्या दिसणा-या चिंचोक्यांच्या गणपती मूर्ती आहेत. या गणपतींच्या समोर असलेले श्री हनुमान आणि गरुडदेवही समान आहेत. मात्र, दोन्ही मूर्तींमध्ये एकच फरक आढळतो. करजगाव येथील गणपतीसमोर असलेल्या हनुमाना च्या खांद्यावर श्री राम आणि लक्ष्मण बसलेले आहेत, तर शिरजगाव येथील श्री राम मंदिरा तील गणरायाच्या समोर हनुमाना च्या खांद्यावर श्री राम आणि लक्ष्मण नाहीत.

# सणाच्या पार्श्वभूमीवर कथित संदेशावर कितपत विश्वास ठेवावा ?

सध्या देशभरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात सुरू आहे. याच निमित्ताने हिंदू मुसलमान ऐक्याचे अनेक उदाहरणे, प्रसंग दाखविले जात आहे. विशेष स्तंभलेखन आणि आता रिल्स मोठ्या प्रमाणात प्रसारीत होत आहे. लोकमान्य टिळक यांनी चालू केलेला सार्वजनिक गणेशोत्सवाचा मूळ उद्देश भारतीयांचे संघटन हा होता त्यामुळे भारतीयांच्या स्वतंत्र लढ्याला संघटनांचे बळ लाभले आणि त्याची परिणीती म्हणून भारत स्वतंत्र झाला. देशवासियांचे आराध्य असलेल्या आणि प्रथम पूजला जाणारा गणपती हा भारतीय मनांना एकत्र आणणारा दुवा असल्याचे हेरून लोकमान्य टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला प्रोत्साहन दिले. सार्वजनिक गणेशोत्सवाची एकीची, संघटनांची ही परंपरा आजतागायत सुरू आहे.हिंदू समाजाचे शक्तीस्थान आणि संघटन यांचे प्रतीक असलेला गणेशोत्सव हा अलीकडच्या एक-दोन दशकापासून हिंदू मुसलमान सौहार्दाचे प्रतीक म्हणून दाखविला जात आहे.

हिंदू धर्म सहिष्णू असल्याने आतापर्यंत हिंदुंना संख्या प्रबळल्याच्या आधारे कुणावरही वर्चस्व ठेवण्याची अथवा दाखवण्याची शिकवण दिलेली नाही. त्यामुळेच कधीही कुठल्या पंथीयांवर कोणत्याही प्रकारची बळजबरी केल्याचे उदाहरण इतिहासात पाहायला मिळत नाही तरीही आज गणेशोत्सव, होळी,दिवाळी या सणांच्या वेळी हिंदूंपर्यंत हिंदू-मुसलमान ऐक्याचा संदेश पोचवण्याचा प्रयत्न केला केला जातो. साम्यवादांनी जाणीवपूर्वक हिंदूंच्या बुद्धिभेद केल्याची अनेक उदाहरणं आहेत. हा बुद्धिभेद हिंदूंच्या मनावर इतका बिंबला आहे की आपण आत्मघात करत आहोत याची साधी जाणीवही हिंदूंना होत नाही. त्यामुळे भारतीय संस्कृतीवर व्हिडिओ बनवणारे 'रील स्टार' कथित हिंदू मुसलमान ऐक्याला प्रसारीत करतात आणि हिंदू त्याला भुलतात त्यामुळेच हिंदूंनी हिंदू-मुसलमान ऐक्याच्या पिशाच्चदीपिकांना म्हणजेच ढोंगी सौंदर्याला भुलू नये. सामाजिक माध्यमांवरील प्रत्येक व्हिडिओ डोळसपणे पाहावा आणि आंधळेपणाने हिंदू मुसलमान ऐक्याच्या कथित संदेशावर विश्वास ठेवू नये, कारण प्रत्यक्ष वस्तुस्थिती वेगळी असू शकते. हिंदुंच्या श्रद्धेचा अपमान करून त्याला सौहार्द अशी रंगीत झुल लावणाऱ्यांचा खरा हेतू समजून घ्यावा.

**लीना गाडगीळ**

# विदर्भातील अष्टविनायक चिंतामणी, वरदविनायक



## चिंतामणी, कळंब

भक्तांच्या सर्व चिंतांचे हरण करणारा चिंतामणी वसला आहे कळंब या गावी. प्रसिद्ध २१ गणपती क्षेत्रांपकी एक पीठ असलेले प्राचीन कदंबपूर म्हणजेच आजचे कळंब होय. इथले गणपती मंदिर काहीसे निराळे आहे. अंदाजे १५ फूट जमिनीखाली ही मूर्ती प्रस्थापित केली आहे. त्यासाठी तीन जिने उतरून आपल्याला तिथे जावे लागते. येथे जमिनीखाली पाण्याचे प्रवाह आहेत. त्या पाण्याची पातळी वाढायला लागून या गाभाऱ्यात पाणी साठू लागते आणि गणेशमूर्तीच्या पायाला पाणी लागले की पुन्हा ते ओसरते. असा प्रसंग बारा वर्षांतून एकदा घडतो. या मंदिरात काही प्रतिमा कोरलेल्या दिसतात. एका खांबावर चारही बाजूंनी गणेश प्रतिमांचे अंकन केलेले पहायला मिळते. मंदिरासमोर उभारलेल्या ध्वजस्तंभाचा हा अवशेष असल्याचे जाणवते.

## वरद विनायक, केळझर

रामायण आणि महाभारत हे प्रत्येक भारतीयाचे जिव्हाळ्याचे ग्रंथ आहेत. एकचक्रा हे नावसुद्धा पांडवांशी संबंधित आहे. बकासुर नावाच्या राक्षसाचा भीमाने वध केला आणि याच एकचक्रा गावातील लोकांची त्या राक्षसाच्या तावडीतून सुटका केल्याची कथा सर्वपरिचित आहे. नागपूर-वर्धा रस्त्यावर सुमारे २५ कि.मी. अंतरावर केळझर किल्ला आहे. या केळझर किल्यावरच हे प्राचीन गणेशाचे देवालय वसले आहे. स्थानिक याला पांडवकालीन गणेशस्थान असेही म्हणतात. पांडवांनी बकासुर वधाची स्मृती म्हणून या गणपतीची स्थापना केली, अशी येथील लोकांची श्रद्धा आहे. प्राचीन काळी केळझर या गावालाच एकचक्रानगरी म्हणून ओळखले जायचे. अर्थातच या गणेशालासुद्धा एकचक्रा गणेश असे म्हणतात. केळझरच्या किल्ल्यावर उंच जागेवर हे गणेश मंदिर आहे. मंदिराच्या मागच्या बाजूला एक पुष्कर्णी आहे. गणेश मंदिरातील गणेशमूर्ती उजव्या सोंडेची असल्यामुळे याला सिद्धिविनायक असे म्हणतात. भाद्रपद आणि माघी चतुर्थीला इथे मोठा उत्सव असतो.

नागपूरचा 'टेकडीचा गणपती', वर्धा जिल्ह्यातील केळझरचा 'एकचक्रा गणेश', नागपूरपासून ३५ कि.मी. अंतरावर असणाऱ्या आदासा गावचा 'वक्रतुंड शमी विघ्नेश', यवतमाळपासून २० कि. मी. अंतरावर असणारा कळंबचा 'श्री चिंतामणी', भंडारा शहरात



असलेला 'श्री भृशुंड गणेश', रामटेक येथील गडाच्या पायथ्याशी असलेला 'वीर विघ्नेश', चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती येथे असलेला 'श्री गौराळा गणेश', भंडारा जिल्ह्यातील पवनीचा 'पंचानन गणेश' असे विदर्भातील अष्टविनायक आहेत. बहुतेक मंदिरांना निसर्गसुंदर परिसर लाभला आहे. त्यामुळे एकदा या मंदिरांना भेट दिलीच पाहिजे, अशी ही गणपती स्थाने आहेत.

**विकास धुळेकर,** सातारा.

## दिवाळी विशेषांक-२०२५

**दरवर्षी प्रमाणे यंदाही आम्ही 'जनमाध्यम'दिवाळी विशेष अंक प्रकाशित करणार आहोत. या अंकाच्या माध्यमातून आम्ही नवसाहित्यीकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यीकांचे राजकीय, सामजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद, प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपावावा असा नसून एक संग्राह्य असा आहे. तरी या दिवाळी अंकाकरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश करावा अशी दैनिक 'जनमाध्यम' तर्फ विनंती...आपले साहित्य atimadham@gmail.Com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सअ‍ॅप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार 'जनमाध्यम'कडे राखीव राहील.इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि.१० ऑक्टों.२०२५ पर्यंत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.**

# गणेशमुर्तींचे विसर्जन घरीच करुन पर्यावरणाचे रक्षण करा

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

आपले सर्वच सण,उत्सव हे पर्यावरण पुरक आहेत मात्र कालांतराने आता त्यात कालानुरूप बदल घडून ते पर्यावरणाला पोषक असे राहले नाही तर ते मारक झाले आहे. गणेश उत्सव साजरा करतांना गणेश भक्तांनी गणेश मुर्तीचे विसर्जन घरीच किंवा समुहाने एकत्र येऊन परिसरातच व्यवस्था निर्माण करून विसर्जन करावे नदी,विहरी,नाले,तलाव हे प्रदुषणमुक्त ठेवण्यास मदत करावी असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

सुरवातीच्या काळात गणेश मुर्ती या प्रामुख्याने मातीच्या किंवा शाडुच्याच कारागिर बनवत होते ती छोटी होती तसेच काही कुटूंबातच ती परंपरेने बसवल्या जात होती हि संख्या अल्प होती.यामुर्ती परिसरातील फुले,पाने यांच्या रंगाने रंगविल्या जात होती त्याची आरास हि फुले, पाने,रंगिंन कागद यांचा वापर करून सजावट केली जात असे आज गणेश मुर्ती मोठी झाली, गणेश मुर्ती बसवणा-यांची संख्या दरवर्षी वाढत आहे, मुर्तीची उंची वाढली,ती आता प्लॅस्टर ऑफ पॅरिसची पण मार्केट मध्ये मिळायला लागली त्यामुळे




अनेक गणेश मुर्ती आकर्षक, सुंदर दिसण्यासाठी औद्योगिक वापरात येणा-या रासायनिक रंगांनी रंगवलेली जावू लागली ज्यात पारा,शिसे,कॅनेनियम हे घटक अत्यंत घातक असतात जे पाण्यात विरघळत नाही याचा गंभीर परिणाम पर्यावरणावर, नदी, नाले, विहिरीतील पाणी प्रदूषित होवून पाण्यातील झरे बुजतात जलचर, पाणवनस्पती यांच्यासह मानवावर सुध्दा व्हायला लागला आहे.

ज्यात प्रदूषण झालेले पाणी पिण्यात आले, आंघोळीसाठी वापरले तर डोळे, त्वचा,श्वशन,व पचनसंस्था यावर गंभीर परिणाम होतात गणेश हा बुध्दीचा देवता मानल्या जातो त्यामुळे गणेश भक्तांनी सारासार विचार करून पर्यावरण पुरक गणेश विसर्जन घरीच करावे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या गेल्या अठरा वर्षाच्या अथक प्रयत्नानंतर पवणार येथे नदी काठावर विसर्जनसाठी कुंभ तयार केले आहे, तर शहरात समितीच्या वतीने व अनेकांत स्वाध्याय मंदिर येथे विसर्जन केन्द्र दरवर्षी उपलब्ध असते यासह नगर परिषद, वर्धा व्दारे अनेक ठिकाणी तसेच वर्धेतील अनेक संस्था संघटना या मोहिमेत सहभागी होवून अशी केन्द्र उपलब्ध करून सहकार्य करतात त्या केन्द्रावर गणेश मुर्ती विसर्जित करावी, सामुहिक रित्या ड्रम,पाण्याची टाकी या विसर्जन करावे किंवा घरीच टब,बादली यात पाणी भरून मुर्ती घरीच विसर्जित करावी पाणी झाडांना तर विरघळलेल्या मातीत झाडे लावावे परिसरात समुहाने येवून मोठे टब,ड्रम यात पाणी भरून त्यात गणेश मुर्तीचे विसर्जन करावे पाणी झाडांना टाकून उरलेली माती कुंभारांना द्यावी व या पर्यावरण पुरक गणेश विसर्जन मोहिमेत सर्वच गणेश भक्तांनी सहभाग घ्यावा असे आवाहन गजेंद्र सुरकार, का.यशवंत झाडे, डॉ हाशम शेख, दिलीप उटाणे, अरूण कुमार हर्षबोधी,मनिष फुसाटे सारिका डेहनकर प्रकाश कांबळे बाबाराव किटे, डॉ सिध्दार्थ बुटले अरुण चवडे, अनिल मुरडीव अरुण भोसले सुनिल ढाले आदींनी केले आहे.

# संक्षिप्त

## ऑनलाईन १ लाखा ३६ हजाराने फसवणुक

**वर्धा-** ऑनलाईन १ लाख ३६ हजार ९९५ रुपयांनी अज्ञात इसमाने फसवुणक केली. ही घटना वर्धा येथील शास्त्री चौक पोद्दार बगीचा जवळ घडली. याप्रकरणी सायबर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्राप्त माहितीनुसार, आशिष किरीट भायाणी वय ३७ वर्ष रा.शास्त्री चौक, पोद्दार बगीचा हे घरी हजर होते. यादम्यान त्यांच्या मोबाईलवर चुकीने रिचार्ज झाल्याचा फोन आला. त्यानंतर आशिषने परत संपर्क केला असता त्याला ओटीपी येऊन १ लाख ३६ हजार ९९५ रुपये ऑनलाईन काढाले. याप्रकरणी सायबर पोलिसांनी अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सायबर पोलिस करीत आहे.

## संर्पदशांने महिलेचा मृत्यू

**वर्धा -**संर्पदशांने ६०वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. ही देवळी तालुक्यातील घटना मौजा दुर्गडा येथे घडली. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी सदर घटनेची नोंद घेतली आहे. पुढील तपास पुलगाव पोलिस करीत आहे.माहितीनुसार, प्राप्त कौशल्या कवडूजी कुमरे वय ६० वर्ष रा. दुर्गडा असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. सदर महिलेला संर्पदशं झाल्याने तिचा मृत्यू झाला. सदरचे घटनास्थळ हे पुलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने पुलगाव पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे. पुढील तपास पुलगाव पोलिस करीत आहे.

## मोटारसायकलची चोरी

**पुलगाव-**येथील पंचधारा रोडवर असलेल्या बढे प्लॉट येथील घराच्या आवारातून रात्रीच्या सुमारास किमती भावाची मोटरसायकल चोरून नेण्यात आली सकाळी ही चोरी लक्षात येतात परिसरात खळबळ उडाली.स्थानिक बढे प्लॉट येथील रहिवासी जगदीश सिताराम बघेल यांनी जवाई राजेंद्रकुमार बघेल यांना २०१८ मध्ये युपी ९२ झेड ०५३३ क्रमांकची मोटरसायकल दिली होती. पंचधारा रोड बढे प्लॉट येथिल घराच्या अंगणात उभी होती. चोरट्याने रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत ती चोरून नेली.चोरीची तक्रार पुलगाव पोलीस स्टेशन देण्यात आली. दोन महिन्यांपासून शहरात मोठ्या प्रमाणावर चोऱ्या होत आहे. सराफा दुकान फोडण्यात आले अद्याप चोरटे सापडलेले नाहीत. त्यानंतर गाडगे नगर येथे चोरी झाली. लगेच भारतीय जनता पक्षाचे वर्धा जिल्हा अध्यक्ष संजय गाते यांच्या घरी चोरी झाली. या सर्व चोऱ्यांळे भीतीचे वातावरण असताना जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या बार मध्ये देखील मोठी चोरी झाल्याचे वृत्त आहे. घराच्या आवारात ठेवलेल्या मोटरसायकल चोरून नेण्यापर्यंत हिम्मत चोरट्यांची वाढल्याने सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**वर्धा-** स्थानिक हवालदारपुरा परिसरात जुन्या शासकीय शौचालयाच्या जागेवर अनधिकृत डंपिंग यार्ड नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी तयार केला. पाऊस आल्यानंतर येथील केरकचरा कुजतो व त्याची सुटणारी दुर्गंध या भागातील रहिवाशांना घरात बसणे कठीण करते. हल्ली या दुर्गंधीमुळे या भागातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे.ठाकरे मार्केट ते धंतोली चौक जाणाऱ्या मार्गावर कधीकाळी सार्वजनिक शौचालय होता. नागरिकांना त्याच अति त्रास होत असल्याने नगरपरिषदे द्वारा हा शौचालय तोडण्यात आला. त्यानंतर त्या जागेवर व्यापारी संकुल तयार करण्यात आले. त्या संकुलाच्या मागील भागात असलेल मोकळी जागा नगर परिषद कर्मचाऱ्यांनी कचरा टाकण्याकरित उपयोगात आणली. वेगवेगळ्या भागातून संकलित करून आणलेला केरकचरा याच परिसरात आणून फेकल्या जातो विशेष म्हणजे या जागेच्या चारही बाजूला उंच इमारती असून दाट लोकवस्ती आहे. अशा ठिकाणावर अनधिकृत डंपिंग यार्ड निर्माण करण्यात आला तो सणासुदीच्या दिवसात त्रासदायक ठरू लागला आहे.

## कारच्या धडकेत आजी व नातू जखमी

**हिंगणघाट-** आजीला दुचाकीने मावशीकडे घेऊन जात असलेल्या नातवाच्या दुचाकीला भरधाव कारने धडक दिली. यात दुचाकीवरील आजी व नातू जखमी झाले.हिंगणघाट येथील संत तुकडोजी वार्ड भागातील रहिवासी स्वप्नील परचाके (३३) हा एम. एच. ३२ ए. ए. ९४३७ क्रमांकाच्या दुचाकीने आजीला मावशीकडे घेऊन जात होता. दरम्यान वेगात आलेल्या एम. एच. ४० सी. ए. ०८३८ क्रमांकाच्या कारने हिंगणघाट शहरातील प्राध्यापक कॉलनीजवळ आजी व नातू प्रवास करीत असलेल्या दुचाकीला जबर धडक दिली. यात स्वप्नील व त्यांची आजी हे दोघे जखमी झाले. अपघात झाल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेत जखमीला रुग्णालयाकडे रवाना केले. तक्रारीनंतर हिंगणघाट पोलिसांनी कारचालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

# दहेगाव ग्रामस्थांनी दिला आंदोलनचा इशारा

**सेलू/जनमाध्यम**

दहेगाव गोसावी ते केळझर रस्त्याच्या बांधकामा करीता अनेक वेळा अर्ज निवेदन देऊन सुद्धा मागील १० ते १२ वर्षापासून रस्त्यावरील खड्डे बुजवण्या व्यतिरिक्त पक्के बांधकामाचे आश्वासन देऊन अजून पर्यंत बांधकाम सुरू करण्यात आले नाही, जर चार दिवसात कामाला सुरुवात झाली नाही तर ८ सप्टेंबर पासुन दहेगाव फाट्यावर चक्काजाम करून बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. नागपूर येथे जाण्याचे एकमात्र मार्ग आहे.

या रस्त्याला अनेक वर्षापासून पांदन रस्त्याचे स्वरूप आले आहे. आजघडीला चिखल, खड्डा,अशामुळे साधी दुचाकी सुद्धा जाण्यास अडचण होत असून नेहमी अपघात होत राहतात. एकूण २२ गावातील नागरिकांना बुटीबोरी, नागपूर,केळझर रोज येणे जाणे करावे लागते. त्यामुळे



नाईलाजास्तव नागरिकांनी लोकशाही मार्गाने सोमवार पासून प्रत्यक्ष रोडचे सिमेंटीकरण बांधकाम सुरू करेपर्यंत केळझर रोडवरील फाट्यावर चक्काजाम करून बेमुदत उपोषण करून आंदोलन करण्याचा ईशारा सेलूचे तहसीलदार यांना निवेदनाद्वारे देण्यात आला, यावेळी संदिप वाणी, सचिन महाबुधे, योगेश खाडे, उमेश राऊत, किशोर गलांडे, संजय धंदरे,चेतन अंभोरे, गोपाल पोहटे, भुषण कावळे ,अमोल पिठाले,प्रणाय धंदरे,निखिल राऊत व मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

# कृत्रिम वाळू उत्पादकांकडून अर्ज आमंत्रित

**वर्धा/जनमाध्यम**

नैसर्गिक वाळूला एम-सॅन्ड (कृत्रिम वाळू) पर्याय म्हणुन विकास करण्यासाठी शासनाने धोरण जाहीर केले असून या धोरणाची अंमलबजावणी करण्याकरीता कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. कार्यपध्दतीनुसार शासनाकडे किंवा सार्वजनिक प्राधिकरणाकडे विहित असलेल्य कोणत्याही जमिनीवर लिलावाद्वारे खाणपट्टा मंजूर करुन पात्र लिलाव धारकांना शंभर टक्के एम-सँड (कृत्रिम वाळू) उत्पादक म्हणुन परवाणगी देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक कृत्रिम वाळू उत्पादन करणा-यांकडून खानपट्टा उपलब्धतेसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

जिल्ह्यामध्ये किती प्रमाणात व कोणत्या ठिकाणी जमीन उपलब्ध आहे. याची माहिती एकत्रित करुन जमिनी संदर्भात खाणपट्टा देण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध विभागांचे अभिप्राय प्राप्त करुन घेऊन ज्या जमिनी लिलाव करण्यास योग्य आढळतील अशा जमीनीची महाखनीज या संगणक प्रणालीवर अपलोड करुन महाराष्ट्र गौण खनीज उत्खनन नियमाच्या नियम ९ नुसार लिलावाची कार्यवाही करण्यात येईल. जे लिलावधारक शंभर टक्के कृत्रिम वाळू उत्पादीत युनिअ बसवणार आहेत. त्यांच्याकडून नोंदणीकृत हमीपत्र घेऊन लिलावाद्वारे कार्यवाही करण्यात येईल. एम-सँड युनिटसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून आवश्यक असलेले युनिट स्थापन करण्यास संमती प्रमाणपत्र, संबधीत क्षेत्राचे एन ले आऊट व अकृषक परवाणगी आदेश, उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र व महाराष्ट्र गौण खनीज उत्खनन नियमांतर्गत विविध परवाणग्या व व्यापारी परवाना आवश्यक राहील.खाजगी मालकीच्या जागेवर शंभर टक्के एम-सँड उत्पादीत करण्यासाठी उत्पादक म्हणुन परवाणगी खाजगी मालकीच्या जागेवर शंभर टक्के एम-सँड उत्पादीत करण्यासाठी उत्पादक म्हणुन खानपट्टा मंजूर करण्यासाठी गाव नमुना क्रमांक, आधारकार्ड, अर्ज फी, टोच नकाशा, गाव नकाशा, प्रस्तावित खाणपट्टा करावयाच्या जमीन क्षेत्राचा मोजणी नकाश क पत्रक, संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेची खाणपट्टा करण्यासाठीचे नाहरकत प्रमाणपत्र, ठराव व प्रस्तावित खाणपट्टाचे रंगीत छायाचित्र, प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या आवश्यक परवाणग्या व प्रमाणपत्र आवश्यक असणार आहे.

खाजगी जमीनीवर यापुर्वी अस्तित्वात असलेल्या खाणपट्ट्यावर शंभर टक्के एम-सँड उत्पादनासाठी परवाणगी मिळण्यासाठी प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून आवश्यक असलेले प्रमाणपत्र, एन ले आऊट, व अकृषक परवाणगी आदेश गौण खनीज उत्खनन नियमांतर्गत परवानग्या व व्यापारी परवाणा आदी आवश्यक आहे.गौण खनिजाच्या अवैध उत्खनात, गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीत दोषी आढळलेल्या व्यक्ती व संस्थांना प्रस्तावर सादर करता येणार नाही. शासनाकडून एम सँड युनिटधारकांना उद्योग विभागाकडील सवलती मिळण्यासाठी स्वतंत्ररित्या उद्योग विभागाकडे उद्योग विभागाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार अर्ज करावा लागेल. जिल्ह्यामध्ये प्रथम पुढाकार घेणा-या ५० एम सँड युनिटधारकांना महसूल व उद्योग विभागाकडील सवलतीचा लाभ उनुज्ञेय असेल. सर्व परवाणग्या मिळाल्यानंतर एम सँड युनिटधारकांना ६ महिन्याच्या आत युनिट सुरु करणे बंधनकारक आहे.इच्छुकांनी महाखनीज संगणक प्रणालीवर ऑनलाईन अर्ज सादर करावा,अधिक माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील खनीज शाखेत संपर्क साधावा, असे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

### इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विविध समाजातील

# व्यक्तींना मिळणार ५० लाखापर्यंत व्यवसायासाठी कर्ज

## ओबीसी महामंडळात आता १३ विविध महामंडळाचा समावेश

**वर्धा/जनमाध्यम**

इतर मागास प्रवर्गात समावेश असलेल्या विविध समाजाच्या लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी आता राज्य शासनाने विविध अशा १३ महामंडळाची स्थापना केली आहे. या महामंडळामार्फत संबंधीत समाजातील लाभार्थ्यांना व्यवसायासाठी १ लाखा पासुन ५० लाख रुपयांपर्यंत कर्ज पुरवठाच्या योजना राबविण्यात येत आहे. या योजनांमुळे आता प्रत्येक समाजातील लाभार्थ्यांना उद्योग व्यवसाय सुरु करण्याची तात्काळ कर्ज उपलब्ध होण्याची संधी मिळणार आहे.महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असलेल्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या उपकंपनी म्हणुन नव्याने १३ महामंडळाची स्थापना करण्यात आली असून या महामंडळाचे कामकाम इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत सुरु करण्यात आले आहे.

**नव्याने स्थापन करण्यात आलेले महामंडळ**

संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ, जगद्‌जोती महात्मा बसेश्वर आर्थिक विकास महामंडळ, संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ, संत संताजी महाराज आर्थिक विकास महामंडळ, संत श्री. रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळ, संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ, संत नामदेव महाराज शिंपी समाज आर्थिक विकास महामंडळ, संत भोजलींग काका सुतार आर्थिक विकास महामंडळ, लेवा पाटीदार समाज आर्थिक विकास महामंडळ, आगरी समाज आर्थिक विकास महामंडळ, सरदार वल्लभभाई पटेल गुजर समाज आर्थिक विकास महामंडळ, सोळा कुलस्वामिनी आर्थिक विमास महामंडळ, स्व. विष्णुपंत रामचंद्र दादरे (लोणारी) आर्थिक विकास महामंडळ अशा १३ विविध समाजातील नागरिकांसाठी महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.या महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या योजना बीज भांडवल योजना -५ लाखापर्यंत कर्ज पुरवठा करण्यात येतो.१ लक्ष थेट कर्ज योजना- १ लाखापर्यंत थेट कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते.वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना- १५ लाख रुपयापर्यंतच्या कर्जावरील व्याज परतावा सुविधा उपलब्ध आहे.गट कर्ज व्याज परतावा योजना – गट कर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांना ५० लाख रुपयापर्यंत कर्जावर व्याज परतावा करण्यात येते.शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना – २० लाखापर्यंत शैक्षणिक कर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांना व्याज परतावा करण्यात येणार आहे.अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय विकास महामंडळाच्या कार्यालयाशी किंवा www.msobcfdc.org या संकेत स्थळाला भेट देऊन संबंधीत योजनांचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# साहित्याची जपणूक ही एक सांस्कृतिक चळवळ-खा.काळे



**आर्वी/जनमाध्यम**

भारत हा विविध भाषिक व संस्कृतीने नटलेला असून भारतीयाचे भावनेने एकता व अखंडता जपणारा जगात एकमेव देश असावा. विविधांगी संस्कृतीचे संगोपन व संवर्धन हे भारताचे साप्या जगाला आकर्षित करणारा एक महत्त्वपूर्ण पैलू आहे. साहित्य व संस्कृती या एकच नव्याच्या दोन बाजू आहे. आपली सांस्कृतिक भूमिका कायम राखण्याचे काम साहित्य करते आणि यात लेखक व कवी अशा साहित्यकरांची भूमिका मोलाची ठरते.

कुठलाही राष्ट्राची आपली एक सांस्कृतिक ओळख त्या राष्ट्राचे भवितव्य निश्चित करते. वर्धेचे नामवत साहित्यकार इमरान रही यांना हिंदी उर्दू साहित्याच्या केलेली सेवा आणि संवर्धन सांस्कृतिक चळवळ असून तो राष्ट्रनिर्मितीच्या एक भाग आहे.अशी भावना वर्धेचे खा.अमर काळे यांनी व्यक्त केली. ते ३ सप्टेंबर रोजी साहित्यकार इमरान राही यांनी त्यांच्या निवासस्थानी तिसरे काव्यसंग्रह पायम-ए-राही यांनी भेंट दिली त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी ऑल इंडिया शास्त्रीय सोशल फोरमचे माजी प्रदेश अध्यक्ष विजय नाखले, ज्येष्ठ समाजसेवक नाजीम शेख, राजू लभाने, नामदेव आखाडे आदी मान्यवर उपस्थित होते.



**स्मशानभूमीत जाण्यासाठी शोधावा लागतो मार्ग**

शहरातील सेवाग्राम रेल्वे स्टेशनलगत असलेली सार्वजनिक स्मशानभूमी अनेक समस्यांच्या विळख्यात सापडली आहे. स्मशानभूमीत जाण्यासाठी चांगला रस्ता नाही. पाण्याची सोय नाही तसेच विजेचीही सोय नसल्याने रात्रीच्यावेळी अंत्यविधी करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. मंगळवारी दुपारी अंत्यविधी साठी नागरिकांना स्मशानभूमीत जाण्यासाठी मार्ग शोधावा लागला.

फोटो राहुल तेलरांधे



**हिंदनगर गणेश मंदिर परिसरातील गणेश भक्तांसाठी आशिष आकरे मित्र परिवारातर्फे पर्यावरण पूरक गणेश विसर्जन कुंड उपलब्ध केले आहे. तरी गणेश भक्तांनी या कुंडाचा वापर करून अनंत चतुर्दशी शनिवार रोजी गणेश मूर्ती विसर्जित करावी असे आव्हान आशिष आकरे मित्र परिवाराने केले आहे.**

# वर्धा जिल्ह्यातील ८४२ शिक्षकांच्या बदल्या

## कार्यमुक्त करण्याची प्रक्रिया सुरू

**वर्धा/जनमाध्यम**

शासकीय, विनंती आणि एकत्रिकरणाच्या माध्यमातून जिल्ह्यातील ८४२ शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत संवर्गनिहाय बदल्या करण्यात आल्या आहे. ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया पूर्ण करून शिक्षकांची खांदेपालट करण्यात आली असून त्यांना कार्यमुक्त करण्याची प्रक्रिया केली जात आहे.

जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या संवर्ग १, संवर्ग २, बदलीपात्र आणि विस्थापित शिक्षकांच्या बदल्या, बदली पोर्टलवरून करण्यात आल्या आहे. यामध्ये विनंती बदली, शासकीय तसेच एकत्रिकरणाच्या माध्यमातून अर्ज प्राप्त झाले होते. सुरूवातीला बदली पोर्टलवर सर्व शिक्षकांचे प्रोफाईल अपडेट करण्यात आले. त्यानंतर जिल्ह्यातील रिक्त जागा पोर्टलवर भरून संवर्ग १, संवर्ग २, बदलीपात्र आणि विस्थापित शिक्षकांची संवर्गनिहाय बदलीकरिता प्रत्येकी सहा-सहा दिवसांच्या कालावधीत अर्ज भरण्यात आले.

त्यानुसार बदली पोर्टलवरून बदल्या करण्यात आल्या आहे. या शिक्षकांच्या कार्यमुतीची प्रक्रिया सुरू आहे. एकाच शाळेवर ३ ते ६ वर्षे सेवा दिल्यानंतर शिक्षकांची शासकीय कार्य पद्धतीनुसार बदली केली जाते. त्याचप्रमाणे पती-पत्नी एकत्रिकरण तसेच शिक्षकाच्या विनंतीवरून बदलीसाठी अर्ज केल्या जाते. संवर्ग १ मध्ये १४३, संवर्ग २ मध्ये ६०, अर्ज बदली करिता प्राप्त झाले होते. तसेच बदलीपात्र ६२९ शिक्षक जिल्ह्यात होते. त्यात ती तर काहींनी बदली मागितल्यामुळे यावर्षी ८४२ शिक्षकांचे अर्ज बदली करिता प्राप्त झाले होते.

**ऑनलाइन पद्धतीने झाली प्रक्रिया**

बदली प्रक्रियेसाठी ऑनलाईन बदली पोर्टलवर अर्ज स्विकारण्यात आले. प्रारंभी शिक्षकांचे प्रोफाईल अपडेट करणे, रिक्त जागा पोर्टलवर भरणे त्यानंतर अर्ज स्विकारण्यात आले. या सर्व प्रक्रियेला तीन ते चार महिन्यांचा कालावधी लागला. बदली पोर्टलवर बदल्या झाल्या असून सध्या शिक्षकांना कार्यमुक्त केले जात असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २७८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# शिक्षण समाज व राष्ट्र विकासाचे माध्यम

## -प्राचार्या डॉ.कमल गवई यांचे प्रतिपादन -माध्यमिक विद्यालय गोलाई येथे आयोजन

### -एक पेड़ माँ के नाम अभियान

**धारणी/प्रतिनिधीः-** माध्यमिक विद्यालय गोलाई, ता.धारणी जि.अमरावती (घाट) येथे नुकतेच शिक्षण परिषद व वृक्ष संवर्धन फांउडेशन अमरावती व्दारा एक पेड़ माँ के नाम या अभियानाच्या संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती धारणी येथील शिक्षण विस्तार अधिकारी सुनिल खड़े तर प्रमुख अतिथी प्राचार्या डॉ. कमलताई गवई तसेच वृक्ष संवर्धन अमरावतीचे संस्थापक अध्यक्ष अभियंता हरिहरराव बोचरे, वऱ्हाडी साहित्यिक कडू, विस्तार अधिकारी लादे, सरपंच दिनेश मावस्कर, चेंडो केंद्राचे प्रमुख मंगेश धोंड, सावलीखेडा केंद्राचे प्रमुख संतोष रणविर सामाजिक कार्यकर्ता धोंडीबाजी मुंडे, माजी उपसरपंच गोविंद मुंडे, तंटामुक्ती अध्यक्ष बालाजी मुंडे, उपाध्यक्ष कोहराम मुंडे, ग्रामपंचायत सदस्य नारायण कातकडे, वनपरिक्षेत्र अधिकारी पवार , वनपाल सिध्देश्वर मुंडे, वनरक्षक कास्देकर, कुमारी बेलसरे, मुख्याध्यापक अतुल मैंद, मुख्याध्यापक अशोक बाभुळकर,चेंडो येथील पोलीस पाटील रामुतारा आकवा, व धुळपाट रेल्वे येथील पोलीस पाटील मनोज काटेकर आदि प्रमुख अथिती मंचावर उपस्थित होते.



या कार्यक्रमाची सुरवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळेस सर्व प्रमुख अथिती विद्यार्थी यांनी लेझीम पथकाने स्वागत केले. सर्व मान्यवर महोदयांचा शाल श्रीफळ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक अतुल मैंद यांनी केले. प्रमुख अतिथी डॉ. कमलताई गवई यांनी विद्यार्थी व शिक्षक यांना मार्गदर्शन करताना व्यक्ती समाज व राष्ट्रविकासाकरिता शिक्षण हेच प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. तसेच परिश्रमाशिवाय काहीच साध्य होत नसून विद्यार्थ्यानी आपल्या जीवनाचे लक्ष गाठण्याकरिता खूप अभ्यास करून मेहनत करावी तसेच पर्यावरणाच्या संतुलनाकरिता वृक्षारोपण करण्याचा उपक्रम सर्वांनी एक पेड़ में के नाम याचे पालन करावे, असे सांगितले.

या कार्यक्रमादरम्यान कुमारी समृध्दी मुंडे या विद्यार्थीनीने आपले प्रभावी मनोगत व्यक्त केले व वर्ग ८ च्या विद्यार्थ्यांनी सुंदर स्वागतगीत सादर केले. या शिक्षण परिषदेचे वर्ग दिलेल्या विषयावर सहाय्यक शिक्षक विजय धमाले, श्रीकांत झोडपे, मनोज कांबळे , गजानन भावे, व लिंगोट यांनी घेऊन सर्वांना मार्गदर्शन केले. याच कार्यक्रमादरम्यान सर्व प्रमुख अथितीच्या शुभहस्ते वृक्षदिंडी काढून वृक्षारोपण करण्यात आले. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी पवार यांच्या वन्यजीव विभागाव्दारे समृध्दी मुंडे, आरती गुटे, श्रृष्टी मुंडे, प्रिती कातकडे, वैभव मुसळे या विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेतील नामांकनाबद्दल प्रमाणपत्र व बक्षिसे देवून गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला गावातील सर्व पालक वर्ग, गावकरी मंडळी,मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाला दोन्ही केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक, सर्व पालकवर्गाचे मोलाचे योगदान लाभले. संचालन उत्तम चिंचोळे,तर आभार प्रर्दशन केंद्रप्रमुख मंगेश धोंड यांनी केले. या कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम या राष्ट्रीय गीताने झाली.

## श्री अन्नपूर्णा देवी संस्थानात आज वास्तू पूजन

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील भवानीवेश स्थित पुरातन प्रतिकाशी श्री अन्नपूर्णा देवी संस्थानचे जिर्णोध्दाराचे काम आचार्य जितेंद्रनाथ महाराज, श्री अच्युत महाराज यांचे गुरुप्रसाद मिळालेले सचिन देव महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने सुरु आहे. दरम्यान बुधवारी (दि.३) नगरप्रदक्षिणा होत असून गुरुवार (दि.४) रोजी वास्तु पूजन सकाळी दहा ते अकरा त्यानंतर होम हवन, पुर्णआहुती व नंतर तिर्थप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिर्णोद्धार सुरु असलेल्या मंदिरातील काळ्या पाषाणातील श्री अन्नपूर्णा देवी मुर्ती भक्तगणांचे लक्ष वेधून घेते. आज आयोजित होम हवन, पुर्ण आहुती व तिर्थप्रसादाचे भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन संस्थानचे अध्यक्ष ॲड. अजिंक्य धर्माधिकारी,सचिव प्रशांत देशपांडे, विश्वस्त अनंत उपासने,विश्वस्त किशोर गणोरकर, विश्वस्त पराग मोहोरीर,विश्वस्त ॲड. किरण मोकासदार, विश्वस्त अपर्णा पत्की यांनी केले आहे.

Sipna Shikshan Prasarak Mandal's
**SIPNA COLLEGE OF ENGINEERING & TECHNOLOGY, AMRAVATI**
ESTD-1999
**An Autonomous Institute**
Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)
Accredited by NAAC with A+ Accredited by NBA Accredited by IAO
No.CET/FYBTECH/IL/ADM/898 Date:- 04th September 2025
**Admission Notification (F. Y. B.Tech.) 2025-26 Institute Level Seats & Probable Vacancy After CAP Round**
Applications are invited from the eligible and aspiring candidates for the admissions at the institute level seats & Probable Vacancy After CAP as per the seat matrix given in the Table No. 01

**Table No. 01: Seat Matrix***

| Sr.No. | Branch & Choice Code | Sanctioned Intake (SI) | Institute Level (IL) Seats |
|---|---|---|---|
| 01 | Civil Engineering (0111419110) | 60 | 03 |
| 02 | Computer Science and Engineering (0111424210) | 180 | 36 |
| 03 | Information Technology (0111424610) | 120 | 24 |
| 04 | Artificial Intelligence (AI) and Data Science (0111426310) | 120 | 24 |
| 05 | Electronics and Telecommunication Engineering (0111437210) | 120 | 24 |
| 06 | Mechanical Engineering (0111461210) | 60 | 03 |

*Seat matrix for Probable Vacancy After CAP will be displayed on Institute website **www.sipnaengg.ac.in** after the complete conduction of CAP Round IV.
The candidates are strictly instructed to follow the schedule given in table 2.

**Table 2 : Activity And Schedule**

| Sr.No. | Activity | Tentative Proposed Dates | |
|---|---|---|---|
| | | From | To |
| 01 | Release of advertisement on Institute website & on Institute Notice Board | 04-09-2025 | |
| 02 | Online submission of application form by eligible candidates on the website www.sipnaengg.ac.in | 04-09-2025 | 07-09-2025 till 05.00 PM |
| 03 | Display & publishing of Merit List, information brochure, admission process, schedule and seat matrix on institute website & on Institute Notice Board | 08-09-2025 | |

- Kindly refer to the cap schedule declared by the competent authority from time to time.
- All eligible and aspiring candidates for the admissions should refer the institute website **www.sipnaengg.ac.in** & Institute Notice Board, for the detail schedule.

**Principal**
**Sipna College of Engineering & Technology, Amravati**

# राजे वीर संभाजी गणेशोत्सव मंडळात आरोग्य शिबिर

## -८४ जणांनी हृदयरोग शिबिराचा घेतला लाभ

### -संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलचे सहकार्य



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे राजे वीर संभाजी गणेशोत्सव मंडळाने बुधवारी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. ज्यामध्ये संत अच्युत महाराज हृदय रुग्णालयाचे तज्ज्ञ डॉ. अनुप डोंगरे आणि डॉ. श्याम राठी यांनी ८४ जणांची हृदय तपासणी केली. या कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्व पाहुण्यांचे मंडळाने पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन स्वागत केले.

चांदूर रेल्वे इंदिरा नगर येथील राजे वीर संभाजी गणेशोत्सव मंडळ गणेश प्रतिष्ठापनेपासून ते विसर्जनापर्यंत विविध सामाजिक कार्यक्रम आयोजित करून गणेशोत्सव साजरा करते. या वर्षी बुधवार, ३ सप्टेंबर रोजी श्री संत अच्युत महाराज हृदय रुग्णालय अमरावती द्वारे हृदयरोग निदान शिबिर आयोजित केले आणि गुरुवार, ४ सप्टेंबर रोजी ग्रामीण रुग्णालय चांदूर रेल्वेचे आरोग्य पथक उपस्थित राहून आरोग्य तपासणी करेल. आज झालेल्या हृदयरोग तपासणी शिबिरात एकूण ८४ जणांनी त्यांचे हृदय तपासणी केली. या कार्यक्रमात संत अच्युत महाराज हृदय रुग्णालय अमरावतीचे सचिव प्रा. फासेबंद, वैद्यराज, वायरमन राजेश चर्जन, डॉ. अनुज डोंगरे, डॉ. श्याम राठी, फासेबंद मॅडम, पत्रकार बंडू आठवले, प्रज्ञा मनवर, शिवानी मोटे, प्रांजली भाकरे, दिया टेंभुर्णे, सोनू धुर्वे, कपिल वर्मा, दुर्गेश बायस यांचे मंडळ सदस्यांनी पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन स्वागत केले. कार्यक्रमात उपस्थित लोकांचे हृदय रुग्णालयाचे सचिव प्रा. फासेबंद यांनी संत अच्युत महाराज हृदय रुग्णालयातील उपलब्ध सुविधांबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे उद्घाटन पत्रकार प्रवीण शर्मा यांनी केले तर आभार संस्थापक अध्यक्ष स्वप्नील मानकर यांनी मानले.

आरोग्य शिबीर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोनू मुरयते, अर्पित देशमुख, गोपाल अविनाशे, निखिल बावणे, सुनील सदावर्ते, गौरव शिंदे, अध्यक्ष हृषीकेश आडेकर, उपाध्यक्ष प्रणय खेरकर, सचिव श्रेयस उरकुडे, खजिनदार शुभम डाखरे, मयूर शिवरे, सहअध्यक्ष-शिवरे, सह. पोलाड, तसेच सदस्य सनी गावंडे, चेतन वालदे, क्षीरसागर, अंश दीक्षित, देवेश विटीवाले, यश काळे, भूषण सोनटक्के, गौरव इंगळे, साहिल आडे, लकी पाटील, मन्यक शिंदे, शिवराज शर्मा आणि राजे वीर संभाजी गणेश मंडळाचे अमित सदस्य यांनी अथक प्रयत्न केले.

# केंद्र पुरस्कृत योजनांच्या लाभार्थ्यांनी जीवन प्रमाणपत्र काढावे

**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ, विधवा आणि दिव्यांग योजनांच्या सर्व लाभार्थ्यांना वर्षातून एकदा जीवन प्रमाणपत्र काढणे आवश्यक आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी जीवन प्रमाणपत्र ऑनलाइन काढण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. शासनाने एप्रिल २०२५ पासून योजनांच्या लाभार्थ्यांना अनुदानाचे वितरण थेट त्यांच्या बँक खात्यात करण्यास सुरुवात केली आहे. तसेच दि. २० ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयानुसार, लाभार्थ्यांनी वर्षातून एकदा त्यांची हयात असल्याची तपासणी करणे अनिवार्य आहे. यासाठी, 'आधार आधारित जीवन प्रमाणपत्र प्रणाली' अंतर्गत 'बेनीफिशरी सत्यापन ॲप' विकसित करण्यात आले आहे. या ॲपद्वारे लाभार्थी कोणत्याही अँड्रॉइड मोबाईलवर त्यांचे हयातीचे प्रमाणपत्र विनामूल्य काढू शकतात.

जिल्ह्यात दि. २ सप्टेंबरपर्यंत एकूण ६२,६९१ पैकी ११,९१२ लाभार्थ्यांनी त्यांचे हयातीचे प्रमाणपत्र काढले आहेत, तर अद्याप ५०,७७९ लाभार्थ्यांचे हयातीचे प्रमाणपत्र काढणे बाकी आहे. लाभार्थ्यांचे जीवन प्रमाणपत्र हे पोर्टलवर अपडेटअभावी अनुदान मिळण्यास अडचण येण्याची शक्यता आहे. त्यासाठी सर्व पात्र लाभार्थ्यांनी त्यांचे ऑनलाइन हयातीचे प्रमाणपत्र काढणे आवश्यक आहे.

**CHANGE IN NAME**

ATHARVA ARUN JOSHI
(NEW NAME)

ATHARAVA ARUN JOSHI
(OLD NAME)

ADDRESS - SHYAM NAGAR, CONGRESS NAGAR ROAD, AMRAVATI - 444606

**MAHAVITARAN** **E-Tender Notice**

The Executive Engineer, Morshi Division, on behalf of MSEDCL invites tender through E-tendering for Supply of Tinned Copper Fuse Wire strictly confirming to I.S. 9926/1991 amended upto date made out of Electrolyte grade Copper and tinned coating with running hot process, with tin thickness of 6 to 8 microns. Fuse wire 12 SWG, Fuse wire 16 SWG and DO Fuse wire 29 SWG under Morshi Division. **Tender No.T-07.** The tender document will be available on website from **04.09.2025 to 10.09.2025.** The last date of submission of tender is **10.09.2025 up to** 17.00 Hrs. Please visit our website **http://works.mahadiscom.in/eTender/etender** The Executive Engineer, Morshi Division, on behalf of MSEDCL invites tender through E-tendering for upgradation of office computers and other accessories under Morshi Division for **Rs 5 lakh .(T-06).** The tender document will be available on website from **03.09.2025 to 10.09.2025**. The last date of submission of tender is **10.09.2025 up to 23.55 hrs.** Please visit our website **http://works.mahadiscom.in/eTender/etender**

**PRO No. 154**
**Executive Engineer**
**O&M Dn. MSEDCL Morshi**

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, खालील अर्जदारांनी बाभुळगाव नगर पंचायत क्षेत्रातील मालमत्तेचे घर/खाली जागा नोंदणी वा मालमत्ता हस्तांतरण करण्याकरिता नगरपंचायत कार्यालयात खालील रकान्यात नमूद कागदपत्रासह अर्ज सादर केलेला आहे. तरी नगर पंचायत अभिदप्तरी नोंदणी करण्याकरिता आक्षेप/हरकती सादर करावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आवश्यक त्या कागदपत्रांसह नगरपंचायत कार्यालयांमध्ये सादर करावे. विहीत मुदती नंतर आलेले आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | अर्जदाराचे नांव | मालमत्ता धारकाचे नांव | मालमत्तेचा तपशिल | सादर केलेले दस्तऐवज |
|---|---|---|---|---|
| १ | राजू तानाबाजी फसाटे, कल्पना संजय उमरतकर व इ.२ | राजू तानाबाजी फसाटे | क्षे.२८७.३ चौ.मी. (Pl No.317) क्षेत्रफळ २१९.चौ.मी. | प्रतिज्ञापत्र क्र.वारस नोंद-१६२७, दि.३०/०७/२०२५ |

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, बाभुळगांव**

**दि.अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.**
**मु.का.,इर्विन चौक कॅम्प रोड, अमरावती**
**फोन- ०७२१-२५५२०९९/२६६३३७८/७९**
Email: auditsection@amravatidccbank.com

**- निविदा सुचना -**

दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेची सन २०२४-२५ ची वार्षिक सर्व साधारण सभा मंगळवार दिनांक ३०-०९-२०२५ रोजी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन,मोर्शी रोड, अमरावती येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

१) सन २०२४-२५ चे वार्षिक अहवाल छपाई
२) सभासदांकरिता जेवणाची व्यवस्था
३) स्टेज, मंडप व डेकोरेशनची व्यवस्था इ.कामाकरिता

इच्छुक पात्रता धारक फर्मने कोटेशन बंद लिफाफा मध्ये दिनांक ०९/०९/२०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत मुख्यालयास कोटेशन सादर करावे. तसेच सभासदा करीता जे भोजन द्यावयाचे आहे त्याची यादी मुख्यालयास पाहावयास मिळेल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**No. 5**
**DISTRICT AND SESSIONS COURT AMRAVATI**
**IN THE COURT OF Ritesh Gorakhnath Waghmare**
**District Judge-1 A.S.J. Amravati , Amravati, Amravati.**

**NOTICE TO PERSON WHO, THE COURT CONSIDERS, SHOULD BE ADDED AS CO-PLAINTIFF**
**(O, 1, R. 10)**

**R.C.A. /48/2022**
**Vasant Ramdas Dhoke and other Vs Ramdas Narayan Dhoke**
**NEXT DATE: 20.09.2025**

**To,**
**Satish Sureshrao Adgulwar**
**R/o. Raghunandan Palace, Mudliyar Nagar, Amravati**

Whereas **Vasant Ramdas Dhoke and other** has instituted the above suit against Ramdas Narayan Dhoke for and, whereas it appears necessary that you should be added as a plaintiff in the said suit in order to enable the Court effectually and completely to adjudicate upon and settle all the questions involved.

Take notice that you should on or before the **20-09-2025** signify to this Court whether you consent to be so added.

Given under my hand and the seal of the Court, this **13.08.2025**

sd/-
Assistant Supertendent
Judicial Branch,
District Court, Amravati

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app **"eCourts Services"** from Android or IOS.

The process is system generated and transmitted in secured manner by authorised user as such physical signature not applied.

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय (व.स्तर).अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.ए.बी.कटटे,२ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - १९५४/२०२५**
**चंद्रकला वि.निरंक**
**पुढील तारीख ०४.१०.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :- १. **चंद्रकला केशव आसरे** वय ७६ वर्षे, धंदा - घरकाम
२. **गजानन केशव आसरे** वय ५१ वर्षे, धंदा - मजुरी
क्र.१ व २ रा.यावली शहिद, ता.जि.अमरावती
३. **चंदु केशव आसरे**, वय ४६ वर्षे, धंदा - मजूरी रा.प्लॉट नं.२२, अनुसया माता मंदिर जवळ, अर्जुन नगर, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत केशव सहदेवराव आसरे हे दि.२८/०९/२०१५ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार चंद्रकला केशव आसरे व इतर यांनी** वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चंद्रकला केशव आसरे व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०२.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

**जाहिर नोटीस**
**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार जि. अमरावती**

आर.एम.जे.श्री. ५३५/२०२५ ने.ता. २९/०९/२०२५

**अर्जदार १. दिशा केशवराव राजस, वय . ३२ वर्ष** व्यवसाय .घरकाम घाटलाडकी, ता चांदुर बाजार जि अमरावती
**२. अश्विनी केशवराव राजस, वय २९ वर्ष** व्यवसाय . घरकाम घाटलाडकी, ता चांदुर बाजार जि अमरावती

**गैरअर्जदार**
**निरक**

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत.**

अर्जदार क्र. १ व २ वरील ठिकाणी राहतात **मृतक श्रीमती सुनंदा केशवराव राजस** हिचा मृत्यु दि.१७/०५/२०२२ रोजी स. पाटलाडकी ता. नांदुरबाजार जि. अमरावती येथे झाला, तसेच **मृतक केशव नथ्युजी राजस यांचा मृत्यु दि. ०२/०४/२००० रोजी** घाटलाडकी, ता चांदुर बाजार जि अमरावती येथे झालेला आहे.

अर्जदाराना मयताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे त्या **विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) नांदुर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी. नं. ५३५/२०२५ नुसार अर्ज दाखल केला आहे.**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अधना व्यक्तीमी दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दि. १८/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार
**सहायक अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय चांदूर बाजार**

**जाहिरनामा / सायटेशन**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि. श्रीमती.एन.सी.सोरटे ६ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक १९७३/२०२५ पुढील तारीख ३०.०९.२०२५

**प्रविण अधिक दोन विरूध्द निरंक**

**अर्जदार-1. Pravin Babanrao Madghe**Age-45 yrs. Occu. Agriculturist **2. Sandip Babanrao Madghe** Age 41 yrs. Occu. Agriculturist 3. Babanrao Champatrao Madghe Age-76 yrs. Occu. Agriculturist No.1 to 3 R/o Near Hanuman Mandir Ravi Nagar, Amravati Tq. & Dist. Amravati.

**विरुध्द**
**गैरअर्जदार**
**निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत कुसुम बबनराव मडघे** हे १२.०२.२०२५ रोजी अमरावती ता. जि अमरावती येथे मयत झाले. अर्जदार प्रविण अधिक दोन विरूध्दध निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदई मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे

त्यापेक्षा श्री, प्रविण अधिक दोन विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. ०३.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का
आदेशानुसार
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय**
व. स्तर, अमरावती

**तहसिलदार, चांदुर बाजार यांचे कार्यालय, मेन रोड अमरावती ता. चांदुर बाजार जि. अमरावती -४४४८०४**
**जाहीरनामा**

ज्याअर्थी या महसुल न्यायालयात **अर्जदार श्री. शेख रहिम शेख दिसमील्ला रा. पिंपरी तळेगांव ता. चांदूर बाजार जि. अमरावती** यांनी मौजा पिंप्री तळेगांव ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथील अर्जदार यांचे शेत गट नं. ३२ क्षेत्र ०.६२ हे. आर. तसेच शेत गट न. ३५ क्षेत्र ०.९१ हे. आर. भोगवटदार वर्ग-१ या शेताच्या दोन्ही ७/१२ वर शेख मन्नु शेख बिसमिल्ला हे नाव चुकीने नोंद झाले आहे असा अर्ज तहसिल कार्यालय चांदुर बाजार येथे दाखल केला आहे. त्याकरीता संबंधितांनी अर्जासोबत शेत गट न. ३२ क्षेत्र ०.६२ हे. आर, तसेच शेत गट न. ३५ क्षेत्र ०.९१ हे. आर, या शेताचा ऑनलाईन ७/१२. फेरफार नक्कल, ९/३ व ९/४ ची प्रत, शेख बिसमील्ला शैव मन्नु यांचा मृत्यु दाखला, आधार कार्ड च्या छायाकित प्रती इ. दस्ताऐवज दाखल केले आहे.

त्याअर्थी या बाबतीत ज्या कोणालाही काही आक्षेप हरकत असेल, तर त्यानी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत आपले आक्षेप/हरकत लेखी स्वरुपामध्ये कार्यालयीन वेळेवर कार्यालयामध्ये दाखल करावे मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप/हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का
**तहसिलदार, चांदूर बाजार**

**सायटेशन/ जाहिरनामा -**
**विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क. ५६४/२०२५ ने.ता. ३०/०९/२०२५

**अर्जदार १) श्रीमती मैनाबाई गोमाजी कलसरे,** वय-८२ वर्ष, व्यवसाय -घरकाम
**२) श्री. रामदास गोमाजी कलसरे,** वय-६१ वर्ष, व्यवसाय -मजुरी
**३) श्री. संजय गोमाजी कलसरे,** वय-३८ वर्ष,व्यवसाय -मजुरी
**४) सौ. कांता श्रीकृष्णराव बसले,** वय-४० वर्ष, व्यवसाय -घरकाम सर्व रा. खानापूर, ता. मोर्शी, जि. अमरावती.
**५) सौ. सुमन ओंकारराव वानरे,** वय ५० वर्ष, व्यवसाय -घरकाम रा. अंबाडा, ता. मोर्शी, जि. अमरावती.

**// विरूध्द //**
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ५ चे वडील नामे गोमाजी हिरामण कलसरे हे दिनांक १२/०९/२०२२ रोजी त्यांचे Khanapur, Tq.Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप यही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

शिक्का
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय, मोर्शी**

**जाहिरनामा / सायटेशन**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्रीमती. एन.सी.सोरटे ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांकः १८१३/२०२५ पुढील तारीख १८.०९.२०२५

**श्रीमती. चित्रा अधिक दोन विरुध्द निरंक**

**अर्जदार.१. Chitra Dilip Sayare** Age 55 yrs, Occu. Household 2. Swapnil Dilip Sayare. Age 35 yrs, Occu. Civil con. R/o. House No.105 Gajanan Township-1, Kathora Road P.R. Pote Patil College Near Amravati. Tq. & Dist. Amravati. 3. Priya Tushar Thakare Age-29 yrs, Occu. House R/o. Kiran No.1, Line No.7 Amt. Amravati Tq. & Dist. Amravati.

**विरुध्द**
**गैरअर्जदार**
**निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत दिलीप महादेवराव सायरे हे २३.१०.२०२२ रोजी अमरावती ता.जि. अमरावती येथे मयत झाले. अर्जदार चित्रा अधिक दोन विरूध्यध निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदछु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा श्रीमती. चित्रा अधिक दोन विरूध्दध निरंक वरीलप्रमाणे सदछु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. २५.०८.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय**
व. स्तर, अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

### डीजेच्या कर्कश आवाजामुळे उद्भवणाऱ्या समस्या लक्षात घेता

# ७० डेसिबलपर्यंत डीजेचा आवाज ठेवण्यास परवानगी

**अमरावती/का.प्र.**

डीजेच्या कर्कश आवाजामुळे उद्भवणाऱ्या समस्या लक्षात घेता, काही अटी व शर्ती घालून डीजेची परवानगी दिली जाते. यामध्ये ७० डेसिबलपर्यंत डीजेचा आवाज ठेवण्यास परवानगी आहे. परंतु, काही दिवसांपूर्वी शहरात स्पर्धेमध्ये डीजेचा आवाज हा ७० डेसिबलपेक्षा जास्त राहिल्याचे बोलले जात आहे. परंतु, प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई या आवाजाच्या अनुषंगाने झालेली नाही. सध्या सण, उत्सवांचे दिवस असल्याने डीजेच्या आवाजावर नियंत्रण ठेवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. डीजेच्या मोठ्या आवाजामुळे श्रवण शक्तीवर परिणाम होऊन कमी ऐकू येणे. तसेच कायमचा बहिरेपणा येऊ शकतो.

हृदयावर कर्णकर्कश डीजेचा विपरीत परिणाम होऊन हृदयविकार, चिडचिडेपणा, मानसिक विकार, होण्याची दाट शक्यता आहे. जास्त डेसिबल आवाज असणाऱ्या डीजेमुळे लहान बालके, गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिक, हृदयविकार असणाऱ्यांना



मोठा त्रास होतो. कानाचा पडदा कायमचा निकामी झाल्याच्या घटनाही ताज्या आहेत, दवाखाना, शाळा, आदी ठिकाणी डीजे वाजवण्यास प्रामुख्याने बंदी असली, तरी त्या ठिकाणी बिनधास्तपणे डीजे वाजवला जातो. अनेक वेळा विविध कार्यक्रमांमध्ये परवानगी न घेताही डीजे वाजवला जातो. शहरात तसेच ग्रामीण भागात काही राजकीय पुढाऱ्यांकडून दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. परंतु, डीजेच्या आवाजाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले होते.

डीजेसाठी औद्योगिक परिसरात ७५ डेसिबल, व्यावसायिक परिसरात ६५, रहिवासी परिसरात ५५ शांत परिसरात ५० डेसिबलपर्यंत परवानगी देण्यात आली आहे. परंतु, या नियमांचे कुठेही पालन होत क्ष नसल्याचे दिसून येत आहे.

#### मोठ्या आवाजामुळे कानाच्या नसा कमजोर होतात

मनुष्य सर्वसाधारणपणे ४५ डेसिबल आवाज आरामात ऐकतो. ७० ते ८० डेसिबल आवाज सहन करू शकतो. ८० ते ९० डेसिबल्चा आवाज सतत ऐकल्ला तर बहिरेपण येऊ शकते. डीजेच्या मोठ्या आवाजामुळे कायमचा बहिरेपणा येऊ शकतो. कानाच्या नसा कमजोर होतात. हृदयाचे ठोके वाढतात. कानात शिट्टीसारखा आवाज येतो, अशी माहिती कान, नाक व घसा तज्ज्ञ डॉ. मंगेश मेंढे यांनी दिली.

# सुरक्षेच्या कारणावरून पुलाखाली रेल्वे उभी राहणार नाही

### शहर पोलिसांकडून भुसावळ मंडळ प्रबंधकांना पत्र

**अमरावती/का.प्र.**

रेल्वे स्टेशन ते राजकमल हा रेल्वे पूल अत्यंत कमकुवत झाल्याचे सांगून प्रशासनाने २३ ऑगस्टला मध्यरात्री साडेअकरा वाजता या पुलावरून सर्व वाहनांसह पादचाऱ्यांनाही प्रवेश बंद केला. अशावेळी सुरक्षेच्या कारणावरून या पुलाखाली कोणतीही रेल्वे उभी राहणार नाही,अशी उपापयोजना रेल्वेने तत्काळ करावी, असे पत्र शहर पोलिसांकडून रेल्वेच्या भुसावळ मंडळ प्रबंधकांना देण्यात आले.

राजकमल ते रेल्वेस्टेशन हा पूल शहरातील अतिशय महत्वाचा आहे.

मात्र ऑडिट रिपोर्टनुसार हा पूल कमकुवत झाल्याने पायी जाणारांसाठी तो बंद केला. यावरून पुलाची स्थिती दयनीय असून कोणत्याही क्षणी तो कोसळणार असा त्याचा अर्थ निघत असल्याची चर्चा शहरात सध्या सुरू आहे. एखादा रेल्वे पूल पायी चालणाऱ्या माणसाचेही वजन पेलू शकत नसेल, तर इतक्या 'नाजूक' पुलाखालून दररोज रेल्वेची ये जा सुरू कशी आहे.

वास्तविक धावत्या रेल्वेमुळे होणारे कंपन्तपुलासाठी धोकादायक ठरू शकते. मात्र असे असतानाही दररोज या पुलाखालून रेल्वे गाड्या धावत आहेत. अमरावती रेल्वे स्थानकावर थांबणारी प्रत्येक रेल्वे याच पुलाखाली थांबते. अशावेळी काही हानी झाली तर मोठे नुकसान होऊ शकते.

दरम्यान, पुलाखाली उभ्या राहणाऱ्या रेल्वे आणि रेल्वेची वाहतूक धोकादायक असून ती त्या खालून होऊ नये तसेच पुलाखाली रेल्वे उभी करू नये, यासाठी उपाययोजना करावी, असे पत्र पोलिस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी रेल्वेच्या भुसावळ मंडळाच्या रेल्वे प्रबंधकांना दिले आहे.

# पुरवठा खंडित करूनही बिल न भरणारे ग्राहक रडारवर

### विशेष पथकाच्या माध्यमातून तपास मोहिम ● ४५ कोटी रूपयाच्या थकबाकीसाठी ४० हजार ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित

**अमरावती/का.प्र.**

महावितरणच्या अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यातील ४० हजारापेक्षा जास्त वीज ग्राहकांचा ४५ कोटी रूपयाच्या वीज बिलाच्या थकबाकीसाठी वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे.परंतू ३७ हजारापेक्षा जास्त ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला याला दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधी होवूनही या ग्राहकांनी वीज बिलाचा भरणा केलेला नाही. ग्राहक विजेशिवाय कसा राहू शकतो याची खात्री करण्यासाठी विशेष पथकाच्या माध्यमातून या ग्राहकांची तपासणी करण्यात येणार आहे.

महावितरणकडून वारंवार विनंती पाठ पुरावा करण्यात आल्यानंतरही वीज ग्राहकांचा चालू अथवा थकीत बिल भरण्यात प्रतिसाद न मिळाल्याने परिमंडलातील ४० हजार ७३७ वीज ग्राहकांचा ४५ कोटी ८० लाख रूपयाच्या थकीत बिलासाठी



वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे.यामध्ये अमरावती जिल्ह्यातील १३ हजार ३४३ ग्राहकाचा समावेश असून त्यांच्याकडे १२ कोटी ८० लाख रूपयाचे वीज बिल थकीत आहे.यवतमाळ जिल्ह्यातील २७ हजार ३९४ ग्राहकांचा ३३ कोटी रूपयाच्या थकबाकीसाठी वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे.

#### चोरी आढळल्यास होणार फौजदारी

वीजे शिवाय जगण्याची कल्पना करणे आजच्या घडीला शक्य नाही असे असतांना ग्राहक वीजेशिवाय कसे राहू शकतात. त्यामुळे अशा ग्राहकांची तपासणी करण्यासाठी महावितरणने यासाठी महावितरण परिमंडळ कार्यालयांकडून विभागानुसार वेगवेगळी विशेष पथके कार्यरत केली आहेत. वाढलेल्या थकबाकीमुळे आर्थीक अडचणीचा सामना करणाऱ्या महावितरणकडून वसूलीसाठी सर्वच स्तरातून प्रयत्न केले जात आहे. त्यामुळे सरप्राईज चेकींग दरम्यान वीज ग्राहकांकडे वीज पुरवठा सुरू असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर वीज कायदा २००३ अंतर्गत वीज चोरीच्या विविध कलमान्वये फौजदारी दाखल करण्यात येणार आहे.

**शेजारधर्म पाळतांना कायदा हातात घेवू नये**

अनाधिकृत वीज देऊन शेजारधर्म पाळणाऱ्यांवरही विद्युत कायदाअंतर्गत वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे.त्यामुळे शेजा-यांनी आपण कायद्याचे उलंघंन तर करत नाही ना? याची काळजी घेणे गरजेचे आहे.

## संक्षिप्त



#### वाढदिवसानिमित रुग्णांना फळवाटप

**अचलपूर**-काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वाढदिवसानिमित्त अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना अचलपूर तालुका काँग्रेस कमिटी शहर व ग्रामीण तर्फे फळ व नाष्ट्याचे वाटप करण्यात आले.यावेळी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष नामदेव तनपुरे व शहराध्यक्ष श्रीकांत झोडपे यांच्या सह उपस्थितीत पदाधिकारी ,कार्यकर्त्यांनी रुग्ण व नातेवाईकांशी सवांदही साधला.यावेळी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष नामदेव तनपुरे ,शहराध्यक्ष श्रीकांत झोडपे ,अल्पसंख्यांक चे माजी जिल्हाध्यक्ष अजीज खान , सेवादल काँग्रेस चे अध्यक्ष कादीर पहिलवान ,मतीन खान जलील पठाण ,प्रमोद कांबळे, संजय समुंद, प्रवीण हूड, अबिद खान, फिरोज खान, शाहबाझ इलियासी आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.



#### मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**खल्लार**-महर्षी वाल्मिकी गुरुदेव सेवा गणेशत्सोव मंडळ, सायतच्या वतीने गावात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गावातील एकुण ४८ नागरिकांनी तपासणी करुन सहभाग घेतला. बीपी, शुगर, ताप,सर्दी,खोकला यांची तपासणी यावेळी करण्यात आली. मंडळाच्या वतीने आरोग्य तपासणीसाठी उपस्थित असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहल निवाने, आरोग्य सेविका नंदा गावंडे, आरोग्य सेवक ढोमणे, आशा वर्कर रर्मा नितनवरे, कडू, पोलिस कर्मचारी ,निलेश अवघड यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.आरोग्य तपासणी शिबिराच्या यशस्वीतेकरिता मंडळाचे पदाधिकारी विक्रम मानकर,अमोल थोरात, अनिकेत इंगळे, नितीन ठाकरे, अमोल मानकर, रोशन मानकर ,कोमल नि. ठाकरे, दर्षाली ग. मानकर यांनी परिश्रम घेतले.

# मंडळांच्या गणपती विसर्जनासाठी ८ सप्टेंबरची मागणी

**अचलपूर/वार्ताहर**

शहरातील अनेक सार्वजनिक गणेश मंडळांचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी करण्यात येते.परंतु यावेळी ७ सप्टेंबर रोजी चंद्रग्रहण असल्यामुळे हिंदू रीतीरिवाजाप्रमाणे गणपतीचे विसर्जन करण्यात येणार नाही. त्यामुळे अचलपूर शहरातील अनेक सार्वजनिक गणेश मंडळांचे विसर्जन ७ सप्टेंबर ऐवजी ८ सप्टेंबर रोजी करण्यास परवानगीची मागणी ग्रामीण पोलिस अधीक्षकांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

अचलपूर येथील श्री बाल गणेश मंडळ, एकलव्य गणेश मंडळ, शंभूराजे गणेश मंडळ, संत रविदास गणेश मंडळ, बालवीर गणेश मंडळ,महात्मा जोतिबा फुले गणेश मंडळ, श्री हमानाव ज्योत गणेश मंडळ, नंदवंशी गणेश मंडळ, जय हनुमान गणेश मंडळ यांच्यासह इतर गणेश मंडळांचे विसर्जन पोलिस ठाण्याच्या परवानगीनुसार यावेळी ७ सप्टेंबर रोजी होणार आहे.अचलपूर पोलिस ठाण्याने ८सप्टेंबर रोजी विसर्जनाची मागणी नाकारली. त्यामुळे मंगळवारी सर्व गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांना निवेदन दिले. यामध्ये ८ सप्टेंबर रोजी सर्व गणेश मंडळांच्या मूर्तीचे विसर्जन करण्याची परवानगी मागितली आहे.

# मुला-मुलींना होणार जंतनाशक गोळयांचे वाटप

### जिल्ह्यातील २ लाख ७८ हजार

**अमरावती/का.प्र.**

मुलांमधील दोष निवारण्यासाठी आरोग्य विभागामार्फत दरवर्षी शाळांमध्ये जंतनाशक गोळयांचे वितरण करण्यात येते. २०२४ मध्ये या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील २ लाख ७८ हजार मुला-मुलीना जंतनाशक गोळी देण्यात आल्या होत्या. जिल्ह्यात अडीच लाख मुलांना जंतनाशक गोळयांचे वाटप करण्याचे नियोजन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. याकरिता विभाग सज्ज झाला असून शासनाच्या वेळापत्रकाची प्रतीक्षा लागली आहे. खानपानाद्वारे विविध प्रकारचे जंतू मुलांच्या पोटात



जातात. या जंतूंमुळे अन्नातील पौष्टिक तत्त्वच मुलांच्या शरीराला मिळत नाहीत.

त्यामुळे मुलांचा शारीरिक विकासही खुंटतो, तसेच विष्ठेद्वारेही जंत बाहेर पडू लागतात. त्यामुळे मूल आजारी राहते. याकरिता दरवर्षी त्यामुळे राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत १९ वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांना शाळेतच गाळा दिल्या जातात. दरवर्षी शाळा सुरू झाल्यानंतर साधारणतः ऑगस्ट सप्टेंबर आणि फेब्रुवारी मार्च महिन्यातामध्ये हा उपक्रम आरोग्य विभाग सज्ज शासनाच्या वेळापत्रकावी प्रतीक्षा राबविला जातो. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे मुलांमधील आजारांवर नियंत्रण मिळविणे हा आहे. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली देशभर ही मोहीम राबविली जाते. शाळा व अंगणवाडी केंद्रांतून मुलांना जंतनाशक गोळ्या वाटप केल्या जातात. यंदा देखील आरोग्य विभागाकडून अडीच लाख मुलांना जंतनाशक गोळ्या देण्याचे नियोजन केले आहे.

**जंतांमुळे मुलांना होतो त्रास**

पोटात वारंवार दुखणे, भूक न लागणे, अतिसार व मळमळ, शरीरात दुर्बलता, रक्तक्षय व कुपोषण आदींची समस्या मुलांमध्ये जाणवते.

#### सप्टेंबरमध्ये जाहीर होणार वेळापत्रक?

जंतनाशक गोळ्या वितरणाचे वेळापत्रक अद्याप वरिष्ठ स्तरावरून जिल्हास्तरीय आरोग्य यंत्रणेला मिळालेले नाही. सप्टेंबर महिन्यात जंतनाशक गोळी वाटप मोहीम राबविण्यात येणार असल्याची शक्यता आहे.

# 'फाटलेल्या चड्डीला ठिगळ, पण कायमस्वरूपी उपाय कधी?'

### शनिवारपेठ नागरिकांचा सवाल

**वरूड/वार्ताहर**

शहरातील शनिवारपेठ, देशमुखपुरा, साखरपुरा व संत्रा लिलाव व्यापारी परिसरातील नागरिकांनी आमदार यावलकर साहेब व नगरपालिका प्रशासनाबद्दल रोष व्यक्त केला आहे. रेस्ट हाऊस ते गजानन महाराज मंदिर मार्ग तसेच शनिवारपेठेत दगडी मुरूम टाकून गड्डे बुजवले असले तरी हा केवळ तात्पुरता उपाय असून, 'फाटलेल्या चड्डीला ठिगळ लावल्यासारखी कामे करून नागरिकांची फसवणूक होते आहे' असा आरोप नागरिकांनी केला आहे.

नागरिकांचा सवाल आहे की, 'आमदार साहेब, निवडून येऊन एक वर्ष पूर्ण झाले, पण



शनिवारपेठ व आसपासच्या भागातील नागरिकांना आजही सावत्र भावासारखी वागणूक मिळते आहे. निधी आणणार केव्हा? आणि कायमस्वरूपी डांबरी रस्ता कधी होणार?' असा प्रश्न उपस्थित केला आहे.

येत्या गणेशोत्सवात प्रसिद्ध शनिवारपेठ राजा आदर्श गणेश मंडळच्या मिरवणुकीस हजारो भक्त अनवाणी पायाने सहभागी होणार आहेत. पण रस्त्यांवर टाकलेले धारदार दगडी मुरूम भक्तांच्या पायांना इजा पोहोचवू शकतात. 'गणपती बाप्पाच्या मिरवणुकीत भक्तांच्या पायाचं रक्त काढण्याचा पाप करू नका साहेब' अशी हाक नागरिकांनी दिली आहे. नागरिक म्हणतात की, आतापर्यंत त्यांनी संयम बाळगला आहे. मात्र, 'शहरातील नागरीक अजून पूर्णपणे जागृत झालेले नाहीत, पण जर आम्हाला दुर्लक्षित केले तर आंदोलन अपरिहार्य होईल' असा इशारा देखील देण्यात आला आहे.नगरपालिका प्रशासन व आमदारांनी तातडीने लक्ष घालून कायमस्वरूपी उपाय करावा, हीच सर्वांची अपेक्षा आहे.


## जाहीरनामा/सायटेशन

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती श्री. एस. बी. कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्रमांक १९१८/२०२५ पुढील तारीख ०७/१०/२०२५**

निर्मला वि निरंक

अर्जदार-१. निर्मला जिवनपंत चर्जन, वय-६८वर्ष, व्यवसाय घरकाम
२. कृष्णकुमार जिवनपंत चर्जन, वय-४०वर्ष, व्यवसाय व्यापार
३. मेघाली जिवन चर्जन, वय-३८, व्यवसाय घरकाम
न. १ ते ३ रा.३७,पंचवटी हाउसिंग सोसायटी हर्षराज कॉलनी विमवी रोड अमरावती
४. रूपाली विवेक जवारकर वय-४१ वर्ष व्यवसाय घरकाम
रा. सासन रामापूर त. दर्यापूर जि अमरावती

विरुध्द

गैरअर्जदार

NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **जिवन रामचंद्र चर्जन** हे दि. १४ ०६.२०२५ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार निर्मला जिवनपंत चर्जन व इतर यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सबर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे,
त्यापेक्षा निर्मला जिवनपंत चर्जन व इतर वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सबर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दि.२९.०८.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक,**
(शिक्का) **दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**


## 'अन्नाची कदर, शेतकऱ्याचा आदर, जनआरोग्याची दखल'

# आठ वर्षांपासून योग्य मार्गाने अन्नाची विल्हेवाट लावणारा उपक्रम

**अमरावती/का.प्र.**

'अन्नाची कदर, शेतकऱ्याचा आदर जनआरोग्याची दखल' आणि, स्वच्छ पर्यावरणा करिता सादर म्हणून,आठ वर्षांपासून योग्य मार्गाने अन्नाची विल्हेवाट लावणारा उपक्रम संपूर्ण शहरात राबणे आजची गरज असल्याचे मनोगत सहाय्यक आयुक्त व उपअभियंता नितीन बोबडे आणि, सहा. क्षेत्रीय अधिकारी नरेंद्र देवरणकर यांनी व्यक्त केले.

एम. एच.-२७-एटीएस ग्रुप तर्फे श्री गणेशोत्सव, महालक्ष्मी माता, नवरात्री उत्सव दरम्यान, शिल्लक राहणारे अन्न ईतरत्र कुठेही टाकल्या जाऊ नये



याकरिता, प्रमोद पांडे, प्रा. प्रविण गुल्हाने, प्रा. समिर चौधरी, किशोर कडु, वासुदेव अवसरे, आनंद केने, अनिरुद्ध क्षीरसागर, छाया कडू, संगिता गजभिये, वंदना भटकर, जयश्री निंभोरकर, मोनाली आगाशे, सह शेकडों सदस्यांतर्फे कित्येक वर्षांपासून, वर्षभर जनहितार्थ अनेक उपक्रम राबविण्यात येत असतात.

छत्री तलाव पुलाजवळ स्वच्छताप्रिय जागरूक नागरिक संदीप गुल्हाने, समर्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक धनंजय पाठक, यांचे घरी महालक्ष्मी माता प्रसादानंतर शिल्लक राहिलेल्या अन्नाचे पुजन करून ते अन्न धरती मातेला अर्पण करण्यात आले. यावेळी, संदीप गुल्हाने, अंजली पांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे, झोन क्र. तिनचे कर्मचारी व जागरूक नागरिक हजर होते. मनपाच्या प्रत्येक झोन कार्यालया अंतर्गत, हा उपक्रम राबविण्यात यावा, अशी अपेक्षा अनेक नागरिकांनी व्यक्त केली आहे.


## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार, जि. अमरावती.**
**आर.एम.जे.सी. ५४६/२०२५ ने.ता. ३०/०९/२०२५**

अर्जदार-१. निर्मला प्रभाकर भोंगाडे, वय ७६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा. पो. देऊरवाडा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती
२. ज्योत्स्ना प्रशांत माहोरे, वय ५० वर्षे, व्यवसाय गृहिणी, रा.कृष्णा विहार कॉलनी, शेगाव राहटगाव रोड, शिवाजी नगर, अमरावती, ता. जि. अमरावती
३. माया महेशराव राऊत, वय ४१ वर्षे, व्यवसाय - गृहिणी, रा. शोभा नगर, विदर्भ महाविद्यालय पो. व्ही. एम. व्ही. अमरावती, ता. जि. अमरावती
४.जया गजाननराव धोटे,वय ४७ वर्षे, व्यवसाय-गृहिणी, रा.आनंदवाडी, पो.चीस्तुर, ता. आष्टी जि. वर्धा
५. ज्योती देवानंद ठाकरे, वय ७४ वर्षे, रा. पो. माधापुरी, माना, ता. मुर्तीजापूर जि. अकोला

**....... विरुध्द......**
**गैरअर्जदार :-**
**निरंक**

**बॉम्बे स्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. मृतक प्रभाकर बसवंतराव भोंगाडे यांचा मृत्यु दि. २५/१२/२००५ रोजी रा. देऊरवाडा ता. चांदूर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक सरस्वती बसंतराव भोंगाडे** हिचा **मृत्यु** ब-याच वर्षापूर्वी झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर चांदुर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं. ५४६/२०२५ नुसार अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. ३०/०८/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

आदेशानुसार
**सहायक अधीक्षक,**
(शिक्का) **दिवाणी व फौजदारी चांदूर बाजार**



## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती श्री.एस.बी. कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक १९७५/२०२५ पुढील तारीख १४.१०.२०२५

शिल्पा वि निरंक

**अर्जदार**
शिल्पा शिबा संकार बेनर्जी
वय ३५ वर्ष व्यवसाय नोकरी
रा. ४ था माळा राजकलश अपार्टमेंट, स्वस्तीक नगर, साई नगर अमरावती

**विरुध्द**
**गैरअर्जदार निरंक**

सर्वत्र लोकांस सूचित करण्यात येते की मयत **शिबा संकार बेनर्जी** दि ०४/०६/२०२५ रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार शिल्पा शिबा संकार बेनर्जी** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.
त्यापेक्षा **शिल्पा शिबा संकार बेनर्जी** वरीलप्रमाणे सदर्हू मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महित्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दि. २९/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
(शिक्का) **दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती.**


# तिवस्यात मुलासह आईची चाकूने भोसकून हत्या

**-आरोपीने दिली हत्येची कबुली**

**-वडिलाच्या हत्येचा घेतला 'सूड'**

## धारदार चाकूसह आरोपी पोहचला ठाण्यात

**तिवसा/प्रतिनिधीः-** हत्येप्रकरणी कारागृहातुन जामिनावर परत आलेल्या ४० वर्षीय इसमाची धारदार चाकूने सपासप वार करून हत्या करण्यात आली तर मुलाला वाचविण्यासाठी गेलेल्या ६५ वर्षीय आईवर सुद्धा चाकूने वार केल्याने तिचा सुद्धा रुग्णालयात नेताच मृत्यू झाला.आज ३ सप्टेंबर रोजी भरदिवसा सकाळी ११ वाजताच्या सुमारास तिवसा शहरातील अशोकनगरात ही दुहेरी हत्याकांडाची धक्कादायक घटना घडली. अमोल वसंतराव डाखोरे(वय ४०)☞ (पान २ वर)





# पत्नीने प्रियकराच्या मदतीने केली पतीची हत्या

## -पथ्रोट येथील घटना

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील पथ्रोट परिसरात कौटुंबिक वादाने विक्राळ रूप धारण केले. काल (२ सप्टेंबर) रात्री साडेदहा वाजता अरविंद सुरत्ने यांची पत्नी ज्योत्स्ना आणि तिचा परिचित अमित मिश्रा (वय ३३) यांच्याकडून खून करण्यात आला. पत्नीचे अनैतिक संबंध हे वादाचे मूळ कारण असल्याचे पोलिसांनी सांगितले. वाद तीव्र झाल्यानंतर ज्योत्स्ना आणि अमित या दोघांनी मिळून अरविंदला बेदम मारहाण केली. यात त्यांचा मृत्यू झाला. अरविंदच्या भाच्याने नातेवाईकांना घटनेची माहिती दिल्यानंतर प्रकरण उघडकीस☞ (पान २ वर)



# पाच देशी कट्टे, रिव्हॉल्वसह ८ जिवंत काडतुस जप्त

**दोघांना अटक- अमरावतीत गुन्हे शाखेची कारवाई**



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात अवैध शस्त्रांची विक्री करणाऱ्या दोन गुन्हेगारांना गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले. अहफाज खान उर्फ ओटू शफाकत खान (वय ३१, रा. नूर नगर) व अमन कैलास चंडाले (वय ३२, रा. रतनगंज) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या जवळून ५ देशी कट्टे, १ रिव्हॉल्वर आणि ८ जिवंत काडतुसे असा १ लाख ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईनंतर शहरात खळबळ उडाली आहे.

३ सप्टेंबर रोजी पोलिसांना माहिती मिळाली की अहफाज खान उर्फ ☞ (पान २ वर)

# अचलपुरात १४१ वर्षांपासून सुरु आहे फुलडोल महोत्सव

**भव्य शोभायात्रेची परंपरा आजही कायम**

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर शहरातील प्रसिध्द श्रीभक्त बिहारी संस्थान येथे गेल्या १४१ वर्षांपासून सुरु असलेला फुलडोल महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी अचलपूर शहरातील महिला, पुरुष,तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. या महोत्सवात भजन, कीर्तन मंडळी ची सुद्धा उपस्थिती ती होती. गेल्या ☞ (पान २ वर)





# केंद्र सरकारच्या आयात धोरणाला विरोध

## शेतकऱ्यांची निदर्शने, तहसीलदारांना निवेदन

**नांदगांव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** केंद्र सरकारने कापसावरील आयात करात सवलत देऊन ३१ डिसेंबर पर्यंत कापूस आयातीला करमुक्त परवानगी देण्याची अधिसुचना जारी केल्याच्या विरोधात नांदगाव खंडेश्वर येथे महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी केंद्र सरकार विरोधात निदर्शने केली .

केंद्र सरकारने १९ ऑगस्ट २०२५ रोजी कापसावरील ११% आयात कर माफ करण्याची अधिसूचना काढली आहे . यापूर्वी ३० सप्टेंबर पर्यंत लागू असलेल्या अधिसूचनेला आता ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली. हा निर्णय देशातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा असून अगोदरच अस्मानी आणि सुलतानी संकटाने बेजार झालेला कापूस उत्पादक शेतकरी या निर्णयामुळे प्रचंड आर्थिक संकटात सापडणार आहे. देशातंर्गत बाजारात दबावात असलेले कापसाचे भाव या निर्णयामुळे ☞ (पान २ वर)




# मोरांगणा मार्गावर भीषण अपघात

## पुलावर डंपर कोसळून २ ठार

**वर्धा/प्रतिनिधीः-** वर्धा-आर्वी मार्गावरील मोरांगणा (खरांगणा) येथे मंगळवार दि. २ सप्टेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास अनियंत्रित डंपर उलटून भीषण अपघात झाला. या घटनेत चालक सुरेश बाबुलाल कुमार (रा. कोलूखेरी कला, राजस्थान, ह.मु. तरोडा) आणि वाहक दीपचंद (रा. कोलूखेरी कला, राजस्थान, ह.मु. तरोडा) या दोघांचा घटनास्थळी मृत्यू झाला.

आर्वी तालुक्यातील तरोडा येथून चुरी भरून येणारा डंपर आर.जे. १९ जी.जे. ३११२ च्या वाहन चालकाचे मोरांगणा येथे वळणावर नियंत्रण सुटल्याने डंपर नाल्याच्या पुलाच्या भिंतीवर आदळला आणि उलटला. धडकेनंतर डंपरच्या केबिनमध्ये चालक व वाहक अडकले होते. घटनेची ☞ (पान २ वर)



# राधे गणेशोत्सव मंडळाच्या आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** गणेशोत्सवा निमित्त राधे गणेशोत्सव मंडळाने मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन केले होते. शेकडो गरीब रुग्णांची डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालय अमरावती येथील तज्ञ डॉक्टरांनी आरोग्य तपासणी केली तर अनेक रुग्णांना अमरावती रेफर करण्यात आले. राधे गणेशोत्सव मंडळ मागील ☞ (पान २ वर)



# सीईओ संजीता मोहपात्रा यांनी दिली जिल्हा परिषद माध्यमिक शाळेला भेट




## 'गप्पा विथ CEO उपक्रम झाला कार्यान्वीत

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** स्थानिक चांदूर रेल्वे येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय येथे दि.३ सप्टेबर २०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती संजीता मोहपात्र यांनी नुकतीच भेट दिली. या भेटीदरम्यान 'गप्पा विथ CEO' या उपक्रमांतर्गत शाळेतील इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला व विद्यार्थ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन केले.

सद्यस्थितीत अमरावती जिल्हा परिषदेच्या २२ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सुरु आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच मानसिक आरोग्याच्या दृष्टीने इयत्ता १० वी व १२ वी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. या काळात योग्य मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरची दिशा निश्चित करण्यात मदत होते. याच हेतूने सीईओ यांनी 'गप्पा विथ CEO' हा उपक्रम सुरु केला आहे.


या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमध्ये थेट भेट देऊन विद्यार्थ्यांसोबत संवाद साधण्यात येणार असून त्यांच्या शंका, समस्या ☞ (पान २ वर)

# तनिष्क फ्रेंचायझीच्या नावाखाली फसवणूक

## आरोपीला मध्यप्रदेशातून अटक

**-परतवाडा पोलिसांची कारवाई**

**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाड्यातील सिव्हिल लाईन येथील ६३ वर्षीय व्यक्तीला तनिष्क कंपनीची फ्रेंचायझी मिळवून देण्याचे आमिष दाखवत तब्बल १ लाख ९९ हजार ९९९ रुपयाची ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या आरोपीस परतवाडा☞ (पान २ वर)



# वाघाच्या हल्ल्यात वन मजूर ठार

## चिखलदरा-राजदेव बाबा कॅम्प परिसरातील घटना

**चिखलदरा/प्रतिनिधीः-** गुगामल वन्यजीव विभाग चिखलदरा अंतर्गत खोंगडा वर्तुळातील धामणीखेडा बीट कंपार्टमेंट नं. ९४४ मध्ये गस्त करीत असताना मंगळवारी सायंकाळी सात वाजताच्या सुमारास तारूबांधा येथील वनमजूर प्रेम मुन्ना कासदेकर (वय ३०) याच्यावर वाघाने अचानक हल्ला केला, तर सोबत असलेला आकाश कास्देकर सुदैवाने वाचला. या हल्ल्यामुळे तारूबांधा परिसरातील ८ ते १० गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. माहितीनुसार चिखलदरा अंतर्गत खोंगडा वर्तुळात राजदेवबाबा कॅम्प आहे. या कॅम्प मध्ये संपूर्ण जंगलाची पाहणी करण्यासाठी वनरक्षक व वनमजूर मुक्कामी राहतात. प्रेम मुन्ना कार्तिकर व आकाश दयाराम कास्देकर हे दोघे रोजंदारी वनमजूर म्हणून राजदेव बाबा कॅम्पमध्ये गेल्या तीन महिन्यापासून कार्यरत होते. मंगळवारी सकाळी सात वाजता पासून प्रेम कासदेकर व आकाश कासदेकर धामणीखेडा बीट मध्ये गस्तीवर गेले होते. दिवसभर त्यांनी काळीकुंडी कॅम्प व धामणीखेडा बीटची पाहणी केली. सायंकाळी सातच्या सुमारास दोघे आपल्या बीट कडे परत येत होते. आकाश समोर होता आणि प्रेम मागे येत होता. थोड्या वेळानंतर प्रेमचा आवाज बंद झाला. यामुळे आकाशने वळून पाहिले ☞ (पान २ वर)






# भारत जनसंग्राम पक्षाला निवडणूक आयोगाची नोटीस

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्ह्यातील 'भारत जनसंग्राम पक्ष' या राजकीय पक्षाला भारतीय निवडणूक आयोगाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. पक्षाने गेल्या सहा वर्षांपासून, म्हणजेच २०१९ पासून, कोणत्याही निवडणुकीत उमेदवार उभा केला नसल्याने ही कारवाई करण्यात येत आहे. आयोगाने पक्षाला नोंदणीकृत पक्षांच्या यादीतून वगळण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. या पक्षाला ४ सप्टेंबरपर्यंत म्हणणे सादर करावयाचे आहे. लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१☞ (पान २




# एमआयडीसी परिसरात ट्रकमध्ये आढळला मृतदेह

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती एमआयडीसीतील एका फॅक्टरीसमोर उभ्या असलेल्या ट्रकमध्ये मृतदेह आढळल्याने बुधवारी सकाळी परिसरात एकच खळबळ उडाली.

प्राप्त माहितीनुसार, राजापेठ पोलिसांना सकाळीच या घटनेची माहिती मिळाली. तत्काळ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. चौकशीत मृतदेहाची ओळख मोना सिंह ऊर्फ छोटू सिंह ठाकूर (वय ५३, आसेंगाव, पुर्णा निवासी) अशी पटली. मृत व्यक्ती ठाकूर एमआयडीसी परिसरातील एका कारखान्यात काम करत ☞ (पान २ वर)

